१५ फेब्रुआरी १९६६


चाळीस पैसे

# माणूस



आर्क दि त्रायंफ
फ्रान्स

## इंदिराजींनंतर कोण ?



'शंकर्स वीकली'च्या सौजन्याने




वर्ष पाचवे : अंक अठरावा : १५ फेब्रुवारी १९६६
किंमत चालीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.



पद्मश्री

साहित्य अकादमीचे पारितोषिक

? ? ? ? ?

'हॅटट्रिक'ची शक्यता......?

श्री. पु. ल. देशपांडे

यांचे हार्दिक अभिनंदन.

ज्येष्ठ व्यंगचित्रकार श्री. शंकर पिलाई यांना 'पद्मभूषण' ही पदवी देण्यात आलेली आहे. त्यांच्या व्यंगचित्रकलेचे दोन नमुने 'शंकर्स विकली'च्या सौजन्याने या अंकात पुनर्मुद्रित केले आहेत. (मुखपृष्ठ २ व ३). श्री. पिलाई यांचे या यशाबद्दल अभिनंदन.

दोन लेख—जे या अंकात देण्याचे ठरविले होते-(प्रा. माधव मनोहर यांचे मॉमचे कथाभाष्य व श्री. रा. म. शास्त्री यांचे निवेदन) ते या अंकात काही कारणास्तव देता आले नाहीत. ते पुढील अंकातून येतीलच. क्षमस्व. — संपादक

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# देश विदेश

## □ व्हिएतनाम

आंतरराष्ट्रीय राजकारण मोठेच विचित्र आहे खरे. शांततेसाठी अगदी मनापासून इच्छा असूनहि परिस्थितीच्या रेटयामुळे अमेरिका आणि रशियाला व्हिएतनामच्या प्रश्नावर परस्परांशी निकराने भांडावे लागतेच. जिनिव्हाच्या शस्त्रकपातीच्या परिषदेनिमित्त परस्परांना शुभेच्छा संदेश पाठवीत असतानाच अमेरिकन अध्यक्ष जॉन्सन यांना "व्हिएतनामी जनतेचे हक्क राखण्यासाठी" उत्तर व्हिएतनामवर पूर्ववत बाँबहल्ले सुरू करण्याची आज्ञा नाईलाजाने द्यावी लागते आणि त्याचवेळी "व्हिएतनामी जनतेचे हक्क राखण्यासाठी" च रशियन पंतप्रधान कोसिजिन यांना अमेरिकन बाँबहल्ल्याला तोंड देण्यासाठी म्हणून उत्तर व्हिएतनाममध्ये आधुनिक शस्त्रास्त्रांचा नव्याने ताफा पाठवावा लागतो. आणि मग संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत, विश्रांतीच्या वेळामध्ये, मद्याचे घुटके घेत, व्हिएतनामच्या प्रश्नाने त्रस्त झालेले या दोन्ही बलाढय राष्ट्राचे प्रतिनिधि जेव्हा समोरासमोर येतात तेव्हा एकमेकाला असहाय व्याकुळतेने विचारतात "यातून सुटण्याचा काहीच मार्ग नाही का ?" राजकारण मोठे विचित्र आहे हेच खरे.

विशेषत: आपल्या परस्पर विरोघी अशा मूलभूत मुद्यांना चिकटून राहून जेव्हा समझोत्याची अपेक्षा केली जाते तेव्हा तर ही विचित्रता अधिकच वाढते. सदतीस दिवस उत्तर व्हिएतनामवरील बाँबहल्ले थांबवून अमेरिकेने आपली 'शांतता मोहीम' यशस्वी करण्याचा निकराचा प्रयत्न केला. परंतु उत्तर व्हिएतनामला अमेरिकेचे दक्षिण व्हिएतनाममध्ये अस्तित्वच नको असल्याने तो यशस्वी होणे शक्य नव्हते. शांततेची बोलणी सुरू करण्यासाठी उत्तर व्हिएतनामच्या हनोई सरकारची पहिली अट हीच, की अमेरिकेने आपले संपूर्ण सैन्य दक्षिण व्हिएतनाममधून काढून घ्यावे. सैन्य काढून घेणे म्हणजे आपला पराभव अमेरिकेने निमूटपणे मान्य करण्यासारखेच होते. दुसरी अशीच अशक्य अट हनोई सरकारने सुचविली ती ही, की कुठल्याहि शांततेच्या वाटाघाटीत दक्षिण व्हिएतनामचे प्रतिनिधित्व दक्षिण व्हिएतनामच्या नॅशनल लिबरेशन फ्रंटनेच (व्हिएत काँग सैनिकांची राजकीय संस्था) केले पाहिजे. ही अट अमेरिकेने स्वीकारणे म्हणजे जे सायगाव सरकार टिकविण्यासाठी एवढा आटापिटा चालविला आहे त्या सरकारचा गळा दाबल्यासारखेच होय. अशा रीतीने वाटाघाटी दृष्टिपथात येणे शक्य नाहीसे पाहिल्यावर बाँबहल्ले पूर्ववत सुरू करणे अमेरिकेला प्राप्त झाले.

अमेरिकेला दक्षिण व्हिएतनाममध्ये कम्युनिस्ट उत्तर व्हिएतनामपासून वेगळे

असलेले स्वतंत्र सरकार हवे आहे तर व्हिएतकाँग, हनोई सरकार व त्यांना पाठिंबा देणारे रशिया यांना दोन्ही व्हिएतनामची एकी हवी आहे. ह्या परस्परविरोधी आणि परस्परमारक भूमिका दोन्ही बाजू जोवर हेक्याने धरून ठेवीत आहेत तोवर निष्पाप व्हिएतनामी जनतेचा रक्तपात तसाच चालू राहणार आहे.

सदतीस दिवस अमेरिकेने आपले बाँबहल्ले थांबविले त्याकाळात हनोई सरकारने आपल्या भूमिकेपासून तसूभरही माघार घेण्याचे नाकारले. यावरून पुढेही हनोई आपली भूमिका सोडणार नाही हे निश्चित. उलट दक्षिण व्हिएतनाम मधील अमेरिकन शस्त्रास्त्र व सैन्यबळ जसजसे वाढत आहे, तसतशी अमेरिका हताश होत असून शेवटचा निकराचा प्रयत्न करते आहे आणि अंती तिला आपला पराभव मान्य करावाच लागेल असा समज हनोईत दृढ होतो आहे.

## माघारीची कारणे

अमेरिकेला निश्चितपणे का माघार घ्यावी लागेल याची उत्तर व्हिएतनामचा संरक्षणमंत्री जनरल व्हो न्गुयेन गियाप याने एका नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या लेखात तीन कारणे दिली आहेत. एक म्हणजे व्हिएटनाममधील आपली सैन्यसंख्या एका निश्चित मर्यादेपलिकडे वाढविणे अमेरिकेला अशक्य आहे, कारण अमेरिकन सैन्य साऱ्या जगभर सर्वत्र विखुरले आहे. दुसरे म्हणजे दक्षिण व्हिएतनाममधील अमेरिकेचा प्रभाव जसजसा वाढेल तसतसा राष्ट्रीय वृत्तीच्या दक्षिण व्हिएतनाम्यांमधील असंतोषहि वाढेल आणि कम्युनिस्टांकडे त्यांचा अधिक ओढा जाईल; आणि तिसरे म्हणजे आतापर्यंत तीन चतुर्थांशाच्यावर दक्षिण व्हिएतनामी भूभाग ताब्यात आणण्यात व्हिएतकाँगनी यश मिळविले आहे.

शत्रूपक्षानेच नव्हे तर खुद्द अमेरिकेतच अनेक राजकीय पुढाऱ्यांनी, वृत्त स्तंभलेखकांनी आणि काही निवृत्त सेनाधिकाऱ्यांनीहि अमेरिकेच्या विफल धोरणावर कडक टीका सुरू केली आहे. लष्करी वास्तवतेकडे लक्ष देऊन अमेरिकेने आता संपूर्ण दक्षिण व्हिएटनाम ताब्यात ठेवण्याचा अट्टाहास सोडून व्हिएतनामच्या किनाऱ्यावरील शहरांची आपली पकड सांभाळून ठवली तरी पुरे, असे ते म्हणू लागले आहेत. याचा अर्थ असा नव्हे, की दक्षिण व्हिएतनाम काबूत ठेवण्याइतके बळ अमेरिकेत नाही. ते निश्चितच आहे. पण वेळोवेळी जाहीर केलेले अमेरिकेचे उद्दिष्ट दक्षिण व्हिएतनामवर स्वतःची लष्करी सत्ता गाजवायचे नसून सायगावमधील जनरल न्गुयेन काओ कीच्या सरकारला केवळ पाठिंबा देण्याचे आहे. आणि लष्करी वस्तुस्थिति पाहता मोठ्या युद्धाचा धोका पत्करल्याशिवाय आणि प्रचंड मनुष्यहानीची किंमत दिल्याशिवाय हे उद्दिष्ट साध्य होणे कठीण आहे, अशी टीका अमेरिकेतच होत आहे. तेव्हा एकंदर वस्तुस्थिति पाहता मोठे युद्ध टाळायचे असेल तर अमेरिकेलाच आपल्या भूमिकेशी थोड्या फार प्रमाणात तडजोड करावी लागेल असे दिसते.

आणि तशा तऱ्हेची चिन्हेहि दृग्गोचर होऊ लागली आहेत. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन आणि दक्षिण व्हिएतनामचे प्रधानमंत्री जन. की व अध्यक्ष जनरल न्गुएन व्हान थीऊ यांच्यात व्हिएतनामच्या प्रश्नांवर नुकतीच होनोलुलूत बोलणी सुरू झाली. त्यांत नॅशनल लिबरेशन फ्रंटला वाटाघाटीत प्रतिनिधित्व देण्याच्या बाबतीत अमेरिकन व दक्षिण व्हिएतनामी सरकारात तीव्र मतभेद असल्याच्या बातम्या येऊ लागल्या आहेत. वाटाघाटी होण्याचा प्रसंग आल्यास व्हिएतकाँगच्या या संस्थेचे प्रतिनिधित्व उत्तर व्हिएतनामी सरकार करू शकेल किंवा फ्रंटचे प्रतिनिधी उत्तर व्हिएतनामच्या प्रतिनिधी मंडळांत असावयास हरकत नाही असे अमेरिकन सरकारचे मत आहे. दक्षिण व्हिएतनामी सरकारला ते अमान्य आहे. हनोई सरकार केवळ आपल्या एकाच अटीबाबत तडजोड करण्याची शक्यता आहे. ती म्हणजे अमेरिकेने दक्षिण व्हिएतनामधून आपले संपूर्ण सैन्य काढून घण्याची. हनोईने ही अट जर मागे घेतली तर अमेरिकन सरकारला वाटाघाटींमध्ये व्हिएतकाँगच्या फ्रंटचे प्रतिनिधी स्वीकारण्यावाचून गत्यंतर उरणार नाही. १९५४ प्रमाणे जिनिव्हा पद्धतीची परिषद भरविण्याचे जोरात प्रयत्न चालू आहेत. दोन्ही बाजूंनी अशी थोडी तडजोड केली तरच कुठे परिषद भरू शकेल ! परिषदेचे यशापयश दूरच.

या सर्व झगड्यामध्ये प्रत्यक्ष व्हिएतनामी जनतेचे काय ? गेल्या २० वर्षांच्या युद्धातहि व्हिएतनामी जनतेला अजून शांति लाभली नाही. दक्षिण व्हिएतनामी जनतेची परिस्थितीहि मोठी केविलवाणी झाली आहे. अमेरिकन सैन्यसंख्या आत्ताच दक्षिण व्हिएतनामच्या बरोबरीची आहे. थोड्याच अवधीत ती दुप्पट होईल. आणि जसजसा दक्षिण व्हिएतनाममधील अमेरिकन प्रभाव, अमेरिकन सैन्यबल वाढते आहे, तसतसे दक्षिण व्हिएतनामच्या ' स्वतंत्र ' सरकारचे महत्त्व व दर्जा कमी होतो आहे. एवढेच नव्हे तर व्हिएतनामी जनरल्सनीही एवढ्यातच अमेरिकेच्या संमतीने प्रचार सुरू केला आहे की " जोवर युद्ध चालू आहे तोवर दक्षिण व्हिएटनाम लोकशाही राजवटीची चैन उपभोगू शकणार नाही. " ज्या स्वातंत्र्यासाठी आणि लोकशाहीसाठी अमेरिका झगडते आहे ते स्वातंत्र्य आणि लोकशाही कुठे आहे ?

व्हिएतनामी जनतेची ही कटुता, व त्यातून निर्माण झालेली साऱ्या युद्धाविषयीची अलिप्तता इतक्यातच अँग्लो अमेरिकन पत्रांचे वार्ताहर वर्णन करून सांगू लागले आहेत. १९५० झाली फ्रेंच राज्यकर्त्यांना आणि बाओ सरकारला जे अनुभव आलेत तेच आता अमेरिकनांना आणि दक्षिण व्हिएतनामी सरकारला जनतेच्या बाबतीत येत आहेत. व्हिएतनामी जनतेचा प्रश्नच मोठा विचित्र आहे. व्हिएतकाँग कम्युनिस्ट जिंकले तर साऱ्या देशाला एका तत्त्वप्रणालीची गुलामगिरी पत्करावी लागेल. परंतु दुसऱ्या बाजूला तरी स्वातंत्र्य, लोकशाही कुठे दिसते आहे का ?

## □ पाकिस्तानची सैन्यवाढ

व्हिएतनामच्या झगड्यावरून धडा घेऊन तरी भारत पाकिस्तानने बाहेरच्या शक्तींच्या कच्छपि न लागता आपापसातले झगडे आपसातच मिटवून गुण्यागोविंदाने रहावे हे उचित होते. पण ताश्कंदमुळे आता बाहेरच्या शक्तींच्या प्रत्यक्ष हस्तक्षेपाचे पर्व सुरू होणार की काय, अशी शंका वाटते. सध्या इंदिरा गांधींनी हा करार नेटाने पुढे नेण्याचे प्रयत्न चालविले आहेत. परंतु पाकिस्तानची एकंदर वागणूक पाहता त्याच्या मनात काही वेगळेच आहे असे दिसते. दोन्ही राष्ट्रांच्या मंत्र्यांच्या नियोजित बैठकीसाठी पाकिस्तानने स्वतःची म्हणून जी कार्यक्रमपत्रिका तयार केली, त्यात काश्मीरचा प्रश्न चर्चेसाठी घातलाच. कार्यक्रम पत्रिकेवर अद्याप एकमत व्हायचे आहे. पण यावरून पाकिस्तानचा अंतस्थ हेतू कळून येतो.

परंतु हे अगदी अनपेक्षित म्हणता येणार नाही. ताश्कंद करारानंतरहि आपल्या शस्त्रास्त्र व सैन्यदल वाढीच्या योजना तशाच पुढे चालू ठेवण्याचे पाकिस्तानने ठरविले आहे हे महत्त्वाचे आहे. विशेष म्हणजे भारत-पाक युद्धानंतर मुद्दाम संरक्षण खर्चात पाकिस्तानने जी वाढ सुचविली होती तीहि कायम ठेवली आहे. चीनची काही मिग विमाने, नौदलाची जहाजे व पाणबुड्या व इंडोनेशियापासूनहि काही

[ पृष्ठ ७१ वर चालू ]



# विचार धारे

समीर

## • चित्रपट सेन्सॉर कसा करावा ?

चित्रपट–कलेवर गेल्या वेळी एका पोलिश तज्ज्ञाचे विचार पाहायला मिळाले. याच विषयाच्या एका महत्त्वाच्या अंगावर एका ब्रिटिश चित्रपट–तज्ज्ञाकडूनही काही मौलिक विचार ऐकायला मिळाले. तो तज्ज्ञ म्हणजे डॉ. रॉजर मॅन्व्हेल, आणि तो विषय म्हणजे 'सेन्सॉरशिप'. 'चित्रपट कसा काढावा' यावर दिल्ली, कलकत्ता, मद्रास, बंगलोर, मुंबई व पुणे येथे भाषणे देण्यासाठी हिंदुस्थानात आलेले डॉ. मॅन्व्हेल परवा दिल्लीत म्हणाले, "सेन्सॉरशिप् अधिक तर्कशुद्ध असायला हवी. प्रगल्भ प्रेक्षकांना सर्व चित्रपट न कापता दाखविले तर त्यात त्यांचे काही नुकसान होईल, असे मला वाटत नाही."

ते म्हणतात, "जगात सर्वत्र उच्च दर्जाच्या चित्रपटात मानवी संबंधांची गुंतागुंत दाखविण्यात येते. विशेषत:, फ्रान्स, स्वीडन व इटलीतल्या चित्रपटात मानवी परस्परसंबंधाचे प्रगल्भ स्वरूप पाहायला मिळते. स्वीडन व फ्रान्समध्ये ते नेहमीच पाहायला मिळत होते; व इटली अमेरिकेत ते हल्ली दिसू लागले आहे, असे चित्रपट काटछाटीने विद्रूप करणे मला अगदी चुकीचे वाटते. सज्ञान प्रेक्षकांना ते जसेच्या तसे का पाहू देऊ नयेत ?"

आयर्लंडमध्ये खालच्या दर्जाच्या प्रेक्षकांना पाहण्यासाठी जे चित्रपट योग्य असतात, तेच प्रगल्भ वृत्तीच्या प्रेक्षकांना पाहायला मिळतात. ब्रिटनमध्ये एखादा हायकोर्टातला न्यायाधीश सहा वर्षांच्या मुलाच्या पातळीवरच जमा होतो व त्याला न कापलेला चित्रपट पाहता येत नाही. "हे अगदी तर्कदुष्ट आहे." अमेरिकेत प्रचलित असलेली सेन्सॉर पद्धती अनिष्ट आहे. "(अमेरिकेतल्याप्रमाणे) सेन्सॉरशिपचे लेखी नियम असणे घातक आहे. कारण, त्या नियमांनुसार एकदा एखादा चित्रपट पास झाला, की तो सर्व वयाच्या प्रेक्षकांना पाहायला मिळतो. याचा परिणाम म्हणजे गुन्हेगारी व घातपाताने भरलेले व मुलांनी पाहू नयेत, असे चित्रपट त्यांना पाहायला मिळतात."

सेन्सॉरशिपचे नियम हे प्रेक्षकांची बौद्धिक पातळी आणि वयाचे गट लक्षात घेऊन घडविण्यात आले पाहिजेत. जगातले बहुसंख्य चित्रपट सामान्य जनतेच्या अभिरुचीला उतरतील असेच काढण्यात येतात. चांगल्या चित्रपटांची तर फक्त "पातळशी साय" असते, एवढेच. हिंदुस्थानातही हीच परिस्थिती आहे. फिल्म सोसायटीच्या चळवळीने चांगले चित्रपट काढण्यासाठी बरेच उत्तेजन मिळू शकेल, चित्रपट–टीकाकारही या कामी मदत करू शकतील. त्यांनी हिंदी, तामिळ व इतर

भाषांच्या चित्रपटांतही 'सत्यजित रे' तयार होण्यास उत्तेजन दिले पाहिजे. वरच्या दर्जाचे चित्रपट खास निमंत्रित प्रेक्षकांना दाखविण्याची व्यवस्थाही ते करू शकतील. पुढे असे चित्रपट तिकिट लावून दाखवावेत. दिल्लीत प्रगल्भ चित्रपट दाखविण्यासाठी दोन-तीन चित्रपटगृहांची आवश्यकता आहे.

आता नेहमीचा प्रश्न : टी. व्ही. चा चित्रपटावर परिणाम काय ? ब्रिटनचे उदाहरण हे त्याचे उत्तर. टेलिव्हिजनमुळे ब्रिटनमध्ये अर्धी चित्रपटगृहे बंद पडली आहेत. युद्धोत्तर काळात तेथे दर आठवड्याला साडेचार हजार चित्रपटगृहांत तीन कोटी प्रेक्षक चित्रपट पाहत होते, त्याऐवजी आता दोन हजार चित्रपटगृहांत सत्तर लाख पाहतात. सुदैवाने, आजचे ब्रिटिश चित्रपट-शौकीन बरेच अधिक चोखंदळ आहेत. खालच्या दर्जाचे लोक चित्रपटाऐवजी टी. व्ही. पाहतात, कारण, टी. व्ही. कमी खर्चाचा व घरच्या घरी असतो. भारतांतही टेलिव्हिजनची प्रगती झाल्यावर तिचा चित्रपटांवर दूरगामी परिणाम होईल.


## • शास्त्रीय मेळाव्यांची उपयुक्तता

भारतात वरचेवर भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय मेळाव्यात वैज्ञानिक परिषदाही असतात. पण, त्या कितपत उपयोगी ठरतात ? नुकत्याच झालेल्या इंडियन सायन्स कॉंग्रेससाठी हिंदुस्थानात आलेले दोन झेक शास्त्रज्ञ प्रा. जारोस्लाव प्लूहार आणि डॉ. कार्ल सिस्का यांनी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना स्पष्टपणे सांगितले की, अशा प्रकारच्या शास्त्रीय मेळाव्यांचा उपयोग व्हायचा असेल तर तेथे व्यापक व उथळ चर्चा करण्यापेक्षा काही विशिष्ट समस्यांवर लक्ष केन्द्रित केले पाहिजे. उदाहरणार्थ, गेल्या वर्षी झेकोस्लोव्हाकियात 'मायक्रो मोलेक्युलर केमिस्ट्री' या एकाच विषयावर चर्चा करण्यासाठी सर्व जगातून शेकडो शास्त्रज्ञ एकत्र जमले होते. प्रा. प्लूहार हे धातुविशेषज्ञ आहेत; त्यांनी इंडियन सायन्स कॉंग्रेसमध्ये वाचून दाखविलेल्या प्रबंधावर सुबुद्ध चर्चा करू शकेल, असा एकही शास्त्रज्ञ तेथे नव्हता. डॉ. सिस्का हे हृदय-तज्ज्ञ आहेत, त्यांना परिषदेत त्यांच्या विषयाचा दुसरा एकही तज्ज्ञ आढळला नाही. म्हणून त्यांची सूचना : इंडियन सायन्स कॉंग्रेस दरवर्षी भूस्तरशास्त्र, प्राणिशास्त्र, वैद्यक अशा निरनिराळ्या एकाच विषयावर भरवावी.

## • चिनी संस्कृती की भारतीय ?

'चीन आणि भारत यांचे सांस्कृतिक संबंध' या विषयावर परवा दिल्लीत बोलताना दिल्ली विश्वविद्यालयाच्या चीनविभागाचे प्राध्यापक डॉ. टॅन मुन् शॅन म्हणाले : "चिनी संस्कृती पन्नास टक्के भारतीय आहे. चिनी जीवनाच्या प्रत्येक अंगावर भारतीय संस्कृती व सभ्यतेचा न पुसला जाणारा ठसा उमटलेला दिसतो."

• • •



**धन्योऽहम् । धन्योऽहम् कर्तव्यं मे न विद्यते किंचित् ।**
**धन्योऽहम् । धन्योऽहम् प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम् ।।**

व्याधींनी, अपघाताने किंवा अशाच कोणत्यातरी अपरिहार्य कारणामुळे मरण न येता, जीव न जाता, जे लोक कोणत्याही कारणाने जीव नकोसा होऊन स्वतःच स्वतःचे मरण ओढवून घेतात त्यांनी 'आत्महत्या' केली असे आपण म्हणतो. पुष्कळ समाजांतून तो एक दंडनीय अपराधही (गुन्हाही) समजला जातो. आत्मा नि जीव ह्या शब्दांतील तात्त्विक भेद काय मानला जातो याची चर्चा येथे न करता, व्यवहारात आपण होऊन आपला जीव देण्याच्या कृत्यास जो वर सांगितल्याप्रमाणे 'आत्महत्या' शब्द वापरला जातो त्यातला तो आत्मा हा शब्द त्याच व्यावहारिक अर्थी येथे आम्ही वापरीत आहोत. तथापि, काही प्रकरणी आपण होऊन आपला जीव देणाऱ्याच्या, आपल्याच हाताने आपल्या प्राणांचा बळी देणाऱ्याच्या कृत्यांना ती

## ' मरणोन्मुख शय्येवरून '
## स्वा. वि. दा. सावरकर
## यांनी लिहिलेला–
## सध्यातरी शेवटचा असलेला
## हा एक लेख

# ' आत्महत्या आणि आत्मार्पण '

कृत्ये वरील व्यावहारिक अर्थी ' आत्महत्या 'च असतानाही त्यांना मात्र आत्महत्या न म्हणता आत्मार्पण, आत्मविसर्जन इत्यादी संस्कृत शब्द योजून ती कृत्ये प्राचीन कालापासून गौरवार्ह मानली जात आली आहेत. ही भिन्नता का आली ? काही प्रकारच्या आत्महत्यांना मनुष्यसमाजाने तो एक दंडनीय अपराध न मानता, त्याला एक पुण्यकृत्य, महनीय कृत्य, गौरवार्ह कृत्य का मानले, त्याचे मर्म आम्ही येथे दिलेल्या तशा काही उदाहरणांवरून आपोआपच स्पष्ट होईल. ही उदाहरणे देताना आमच्या आजच्या परिस्थितीत त्यांच्या विवरणात काही त्रुटी राहण्याचा संभव आहे. कारण, वयोमानानुसार आम्ही सध्या वार्धक्य नि व्याधी यांच्यामुळे अंथरुणास खिळून पडलेलो आहोत. अशा स्थितीत त्या त्या उदाहरणांसंबंधींची संदर्भ पुस्तके पुन्हा एकदा वाचून पाहण्याची शक्ती नाही, इच्छा नाही, आवश्यकताही वाटत नाही. असलेल्या आठवणींवर काय ते विसंबून त्या

उदाहरणांचे वर्णन दिले आहे; त्यात न्यूनाधिक ज्या काही फुटकळ त्रुटी असतील त्या वजा घालूनही त्या उदाहरणांवरून जो अंतिम निष्कर्ष आम्ही काढू इच्छितो त्याला काही उणेपणा येणार नाही, ही आमची निश्चिती आहे.

## अशी काही ठळक उदाहरणे

प्रथमत:, प्रख्यात मीमांसक आणि वैदिक कर्मकांडाचे कट्टर पुरस्कर्ते श्री. कुमारील भट्ट यांचे उदाहरण घेऊ. वैदिक धर्माचा संपूर्ण पाडाव करू इच्छिणाऱ्या बौद्ध सिद्धान्तांचा कोटिक्रमाने उच्छेद करण्यासाठी अगदी बुद्धांच्याच ग्रंथांतून त्या सिद्धान्तांचा अभ्यास करावा म्हणून त्यांनी त्रिपिटकादिक बौद्धग्रंथांचा अभ्यास केला, त्यांचे आचार पाळले, तसे बौद्धधर्मीय जीवन जगून पाहिले. नंतर त्या मतांचा पराजय करण्याच्या आणि त्या आचारांचा फोलपणा दाखविण्याच्या महत्कार्यास हात घातला. मोठमोठ्या वादविवादांच्या सभांतून, प्रवचनांतून प्रचार करीत करीत साऱ्या भारतभर वैदिक मीमांसकांच्या मतांची पुन्हा प्रस्थापना केली. शेवटी आपले हे मुख्य जीवनकार्य यशस्वीपणे संपले आहे, असे जेव्हा त्यांना वाटले तेव्हा मग वैदिक धर्माच्या विजयाकरिताच का होईना, पण अवैदिक आणि पाखण्डीय अशा बौद्धग्रंथांच्या वाचनाचा आणि त्यांच्या आचार-विचारांचा जो अवलंब करावा लागला, त्या पापसंपर्काचे प्रायश्चित्त घेण्यासाठी नैसर्गिक निधन होण्यापूर्वी तुषाराग्नीत स्वत:चा देह भस्म करून घेण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली. तीप्रमाणे त्यांनी स्वहस्ते चिता पेटवून तीत प्रवेश केला. पाहता पाहता त्या अग्निज्वालांच्या कल्लोळात त्यांच्या देहाचे भस्म होऊन गेले ! !

परंतु, त्या महान् बलिदानास ‘आत्महत्या’ असे

न म्हटले जाता ‘ अग्निदिव्य ’, ‘ आत्मार्पण ’ अशाच शब्दांनी इतिहासात गौरविले गेले आहे.

दुसरे उदाहरण जगद्‌गुरू श्री आद्य शंकराचार्य यांचे देता येईल. अद्वैत मताच्या दिग्विजयासाठी साऱ्या भारतभर संचार करीत ते जेव्हा आसाममध्ये (त्या वेळच्या कामरूपमध्ये) गेले तेव्हा तेथे शाक्त पंथाशी त्यांचा वादविवाद झाला. त्यातही त्यांनी विजयश्री संपादन केली. परंतु, शाक्तांतील उग्रपंथीयांना ते सहन न होऊन त्यांनी शंकराचार्यांवर विषप्रयोग केला. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीला बराच अपाय झाला. तथापि, तेथून ते काश्मीरपर्यंत संचार करीत गेले. काश्मीरला जाताच आपल्या दिग्विजयाची पूर्णता झाली, असे पाहून आपला चौथा प्रमुख मठ त्यांनी स्थापला. शृंगेरी, द्वारका, पुरी आणि हा काश्मीरचा मठ मिळून चार दिशांस अद्वैत मतप्रचारार्थ चार धामे स्थापण्याचे त्यांचे महत्कार्य असे तडीस गेले. श्रीशंकराचार्य त्या वेळेस भर तारुण्यात होते, हे प्रसिद्धच आहे. तथापि, एकतर वर उल्लेखिल्याप्रमाणे खचत चाललेली त्यांची प्रकृती, दुसरे की महाभाष्यादी ग्रंथ लिहून आणि वर दिलेली चार धामे स्थापून आपले अवतारकार्य आपण संपूर्ण केले आहे असे वाटणारे समाधान आणि तिसरे म्हणजे बालवयापासूनच त्यांच्या अंगी ‘ यदहरेव विरज्येत् तदहरेव प्रव्रजेत् । गृहात् वा वनात् वा ।। ’ ह्या त्यांच्या सूत्राप्रमाणे बाणलेली उपजत वैराग्यवृत्ती ह्या तिन्ही कारणांमुळे ज्या आपल्या जीवनाची अशी संपूर्ण कृतकृत्यता झाली आहे, ते ऐहिक जीवन आता संपवून परब्रह्मी विलीन व्हावे, अशी त्यांना आतुरता वाटू लागली. ह्यास्तव त्यांनी स्वतः महान् योग्यांच्या पूर्वपरंपरेनुसार गुहाप्रवेश करण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणे गुहेत जाऊन आपण योगासन घालून बसले आणि

त्यांच्याच आज्ञेप्रमाणे त्यांच्याच शिष्यांनी एका भल्या मोठ्या शिलेने ते गुहेचे द्वार बंद करून टाकले. याप्रमाणे योगमार्गे जगद्गुरु शंकराचार्यांनी मोठ्या समाधानाने प्राणविसर्जन केले.

> आपण होऊन न जाणारा जीव बळाने देण्याची क्रिया ज्याला आपण दंडनीय आत्महत्या म्हणतो तीत आणि अशा यौगिक प्राणविसर्जनात, आत्मविसर्जनात, जरी एक सामान्य घटक असला तरीही जगद्गुरू शंकराचार्यांचा हा गुहाप्रवेश इतिहासात 'आत्महत्या' म्हणून उल्लेखिला न जाता 'आत्मार्पण' ह्या गौरवार्ह नावानेच यथार्थपणे उल्लेखिला जात आला आहे.

अशी योगेश्वरांच्या गुहाप्रवेशाची अनेक उदाहरणे आपल्या प्राचीन इतिहासात सापडतात. आता सापेक्षत: अगदी अर्वाचीन इतिहासातील अशा कृतकृत्यतेच्या समाधानानेच् आपण होऊन स्वदेह विसर्जन केल्याची, आत्मार्पणाची काही उदाहरणे उल्लेखू.

'**गौरांगप्रभू**' अशी प्रेमादरदर्शक नावाने बंगालमधील ज्या वैष्णवाचार्यांची, महाप्रभू चैतन्यांची कीर्ती भारतभर पसरली आहे, त्यांच्या निधनाविषयी अशीच एक कथा सांगितली जाते. श्रीकृष्णाच्या भक्तिसांप्रदायाचा प्रचार करीत करीत हे श्रीचैतन्यप्रभू सामुदायिक भजनात रंगून मोठमोठ्या नगरयात्रा काढीत तेव्हा त्या भक्तिरसाच्या आनंदात वाहात जाऊन त्या त्या नगरांत सहस्रावधी स्त्रीपुरुष त्यांच्या मागे नामाचा गजर करीत चालू लागत आणि भक्तीच्या भावोन्मादात मार्गामार्गांतून नाचत नाचत चैतन्यप्रभू पुढे पुढे चालत. आयुष्याच्या उत्तरार्धापर्यंत साऱ्या बंगालभर भक्तिसंप्रदायाचा असा उत्कट प्रचार करीत करीत ते शेवटी जगन्नाथपुरीला गेले. तेव्हा एकदा तेथील

सागराच्या तटावर ते सामुदायिक भजन-यात्रेत चालले असता त्या सागराच्या सुनील जलाशयास पाहताच भावावेशात येऊन घन:शामल श्रीकृष्णाचेच हे स्वरूप आहे, तो श्रीकृष्णच दिसत आहे, असा उत्कट भास त्यांना झाला. आणि त्या स्वरूपास प्रत्यक्ष आलिंगन देण्याकरिता 'हे कृष्ण! हे शाम!! हे शाम!!!' असा टाहो फोडीत देहभान सुटून त्यांनी अकस्मात् त्या अफाट सागरातच उडी घेतली. ते आत्मविसर्जन करते झाले! परंतु, या देहत्यागास चैतन्याने 'आत्महत्या' केली असे न म्हणता चैतन्यप्रभूने जलसमाधी घेतली, आत्मार्पण केले असेच इतिहास म्हणत आला आहे.

आपल्या महाराष्ट्रात **श्रीज्ञानेश्वर महाराजांची** कथा तर प्रसिद्धच आहे. ह्या अलौकिक विभूतीने अगदी तरुण वयातच ज्ञानेश्वरी, अमृतानुभव यांसारख्या तत्त्वज्ञानाच्या मंदिरांचे सुवर्णकलशच शोभावे, असे दोन ग्रंथ लिहिले. आपले अवतार-कार्य होते ते आता संपले आहे. ह्यापुढे जग त्याप्रमाणे चालो किंवा न चालो; त्याचे उत्तरदायित्व आपणांवर राहिले नाही, अशा कृतकृत्यतेच्या जाणीवेने वयाच्या अवघ्या तिशी-पस्तिशीच्या आतच त्यांनी अंतिम समाधी घेण्याचा निश्चय केला. जे जे योगिजन समाधिस्थ होऊ शकतात, त्यांची ती समाधिस्थ स्थिती अंतिम असते असे नाही. समाधी घेतलेला योगी ती समाधी स्वेच्छेने उतरवूही शकतो. पुन्हा व्यावहारिक, सांसारिक, जागतिक जागृतीत, इच्छा असल्यास तो येऊ शकतो. पण अशी कालावधीची समाधी न घेता ज्ञानेश्वरांनी 'यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमम् मम ।' अशा अंतिम समाधीला घेण्याचे ठरविले. त्यांचे गुरूच असलेले त्यांचे ज्येष्ठ बंधू जे निवृत्तिनाथ, त्यांनी स्वत: ज्ञानेश्वरांच्या त्या निर्धारास अनुमती दिली. अनेक

संत मंडळींच्या समक्ष, भजनाच्या गजरात, स्वत:च बांधविलेल्या समाधिस्थानामध्ये कृतकृत्यतेच्या परम समाधानात श्रीज्ञानेश्वर महाराज उतरले आणि योगासन घालून बसले. स्वत: निवृत्तिनाथांनी त्या समाधिस्थानावर शेवटचा चिरा स्वहस्ते बसविला. अशा प्रकारे ज्ञानेश्वरांनी अंतिम समाधी घेतली.

> जो जीव बाह्य निमित्ताने जात नाही तो आपला जीव आपण होऊन बळाने देणे हे कृत्य, व्यवहारात ज्याला ' आत्महत्या ' म्हणतात तीत आणि ह्या जिवंतपणी आपण होऊन अंतिम समाधी घेण्यात उभयसामान्य असताही त्याला ज्ञानेश्वरांनी ' आत्महत्या ' केली असे न म्हणता श्रीज्ञानेश्वरांनी आत्मार्पण केले, श्रीज्ञानेश्वर समाधिस्थ झाले, असेच संत-महंतांपासून तो सामान्य जनतेपर्यंत सर्वांमुखी म्हटले जात आहे.

तीच गोष्ट **समर्थ रामदासांच्या** आत्मार्पणाची आहे. प्रस्तुत ' यवनांचे बंड । हिंदु उरला नाही चंड । बहुत दिसांचे मुंड । शास्ता न मिळे तयासी ।। ' अशा परिस्थितीने व्याकुल होऊन त्या यवनांच्या बंडाचा समूळ नि:पात करण्याच्या कार्यासच श्रीसमर्थांनी आपले जीवनकार्य मानले. महाराष्ट्रातील हिंदु-समाजात धर्मयुद्धाची आग पेटवून देण्यासाठी आपल्या तपोबळाने प्रचंड संघटना उभारली. त्याला जोडूनच तिकडे त्याच ध्येयाने प्रेरित होऊन श्रीछत्रपतींनी आपल्या शस्त्रबळाने मुसलमानांच्या शहांची नि पातशहांची तक्ते गदगदा हालवीत जेव्हा प्रत्यक्ष औरंगजेबाच्या छातीवरच रायगडाचे स्वतंत्र हिंदुराज्य, हिंदुध्वज नि हिंदू सिंहासन उभारले तेव्हा हिंदुजातीच्या त्या महान् विजयाने प्रफुल्लित होऊन समर्थ गर्जते झाले —

**स्वप्नी जे देखिले रात्री ते ते तैसेचि होतसे**
**बुडाला औरंग्या पापी, म्लेंच्छ संहार जाहला**
**मांडली मोडिली क्षेत्रे, हिंदुस्थान बळावले ! !**

आपल्या प्रतिज्ञेची अशी कल्पनातीत पूर्तता झाली, अशा कृतकृत्यतेच्या भावनेने आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी समर्थ रामदासांना आपले अवतारकार्य संपले असे वाटू लागले. इतक्यात शिवछत्रपतींचा अंतकाल झाल्याची दुष्ट वार्ता समर्थांना कळली. " राजे आम्हांला सोडून गेले " असे शोकाकुल उद्‌गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले. लगोलग संभाजीमहाराजांनी उच्छृंखलपणाने शिवछत्रपतींना अनुकूल असलेल्या अनेक प्रमुख व्यक्तींना बंदीत घातले, कित्येकांना ठार मारले. स्वराज्यात भाऊबंदकीचा वणवा पेटला. स्वतः संभाजी सज्जनगडाच्या पायथ्याशी येऊन समर्थांना भेटण्यासाठी आग्रह धरून बसला. शिवछत्रपतींच्या अनेक विश्वासपात्र मंत्र्यांचा ज्याने घातपात केला, तो शिवछत्रपतींचे राजगुरूच असलेल्या समर्थांनाही काही उपद्रव देण्यास सोडणार नाही हे उघड दिसत असल्याने समर्थांनी कळविले की, वयोमानाने आता गडाखाली उतरण्याची शक्ती आमच्यात राहिली नाही; यास्तव आशीर्वादाचे एक पत्र तेवढे धाडीत आहे, तेच ते खणखणीत, सणसणीत सुप्रसिद्ध पत्र होय, की ज्यात समर्थांनी लिहिले होते– " शिवरायाचे आठवावे रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप। शिवरायाचा आठवावा साक्षेप। जीवित तृणवत मानावे। कष्टे करूनि घसरावे। म्लेच्छावरी ॥. . . आहे तितुके जतन करावे। पुढे आणिक मेळवावे। महाराष्ट्र राज्यचि करावे। जिकडे तिकडे ॥ " त्याच वेळी हिंदूंचे स्वतंत्र राज्य स्थापन झाल्याचे ऐकून चवताळलेला औरंगजेब साऱ्या मुसलमानी शक्ती एकवटून स्वतः मराठ्यां-

वर चालून येत आहे, अशी बातमी आली. अशा या नवीन संकटाला तोंड देण्याची ज्या अर्थी आपल्या ८० वर्षांवर गेलेल्या वयोमानात नि व्याधिग्रस्त शरीरात शक्ती नाही, महाराजांसुद्धा आपली पिढीची पिढी निघून गेली, त्या अर्थी आपले कर्तव्य संपले. " उपाधीचे काम ऐसे । काही साधे काही नासे ।" ह्या न्यायाने स्वतंत्र हिंदुराज्य स्थापनेचे जे महान् कार्य पार पडले, तीच आपल्या जीवनाची कृतकृत्यता ठरावी, अशी भगवंताची इच्छा दिसते! आता नवीन पिढीचे प्रश्न, नवीन पिढीच्या कर्तृत्वावर नि भगवंताच्या कृपेवर अवलंबून! असा विचार करून समर्थांनी प्रायोपवेशन करण्याचा निश्चय केला. आपल्या सर्व शिष्यशिष्यिणींना एकत्र करून सांगितले की, आम्ही आता देह ठेवणार! आमचे अवतारकृत्य संपले, देहाचे सार्थक झाले. ते ऐकताच शोकाकुल झालेल्या आपल्या भक्तांना त्यांनी धीर दिला. " ' जरी माझी वाणी । गेली म्हणाल अंत:करणी । तरी मी असे जगजीवनी । निरंतर! ' आणि मार्गदर्शनाविषयी विचाराल तर हा माझा दासबोध मी मागे ठेवतोच आहे!" असे आश्वासून, अचल आसन मांडून, अन्नत्याग करून रामनामाच्या गजरास समर्थांनी आरंभ केला. अशी कथा आहे की, त्या अखंड नामजपाच्या शेवटी प्रत्यक्ष श्रीरामांनी समर्थांना दर्शन दिले, तेव्हा अत्यंत कृतकृत्य भावनेने श्रीरामाच्याच चरणी समर्थांनी अन्नत्यागाने क्षीणतम झालेला आपला शेवटचा नि:श्वास सोडला!

आपल्या जीवनाची संपूर्ण सफलता झाल्यानंतरही जो जीव समाजाला व स्वत:लाही केवळ भारभूत होऊन रेंगाळत राहतो त्याची आपण होऊन इतिश्री करणे ही क्रिया अशा 'आत्मार्पणा'त आणि आत्महत्येत जरी समानच असली तरी समर्थ रामदासांनी

> आत्महत्या केली असे कोणीही म्हणत नाही, तर समर्थांनी प्रायोपवेशन केले, आत्मसमर्पण केले, असेच इतिहास म्हणत आला आहे.

**एकनाथ**–तुकाराम महाराजांच्या निधनाच्या कथा अशाच प्रकारच्या आहेत. एकनाथ महाराजांनी अनेक उत्कृष्ट ग्रंथ लिहिल्यानंतर आणि हरिभक्तीचा उदंड प्रचार केल्यानंतर वयोमानानुसार त्यांची प्रकृती अत्यंत क्षीण झाली. आपल्या हातून जे व्हायचे ते देवकार्य पूर्ण झाले आहे, आता यापुढे समाजाची कोणती अधिक सेवा घडावी, अशी देवाचीच इच्छा नाही हे आपली प्रकृती क्षीण झाली, अधिक कार्य करण्यास दुर्बल झाली आहे ह्यावरूनच दिसते असे एकनाथ महाराजांना वाटू लागले. एकदा तर त्यांचा व्याधिग्रस्त देह इतका मरणासन्न झाला की, त्यात चेतना म्हणून उरलीच नाही. पण थोड्याच समयानंतर तो अचेतन झालेला देह पुन्हा सचेतन झाला. आपले पारमार्थिक कार्य शक्य तितके पूर्ण झाल्यानंतर असा स्वतःला नि समाजाला भारभूत झालेला देह आपण होऊन ईश्वरार्पण करणे हेच आता आपले अंतिम कर्तव्य आहे, अशा जाणिवेने आणि मोठ्या सुखासमाधानाने एकनाथ महाराजांनी स्नानसंध्या करावयास ते पैठणला ज्या गंगेवर जात त्याच गंगेत शिरून जलसमाधी घेतली.

> ते त्यांचे जलसमाधीचे कृत्य आत्महत्येसारखे निंद्य न मानले जाता इतके वंद्य मानले गेले की, त्यांच्या जलसमाधीच्या स्थानाला पवित्र तीर्थाचे स्वरूप प्राप्त झाले.

एकनाथ महाराजांच्या ह्याच समाधिस्थानाचे दर्शन घेण्याकरिता पुढे स्वतः **श्रीतुकाराम महाराज** एकदा पैठणला गेले

होते. श्रीएकनाथांची ती आत्मविसर्जनाची कथा तुकाराम महाराजांनाही अवगत होती. पुढे जेव्हा तुकाराम महाराजांना आपले भक्तिसंप्रदायाचा प्रचार करण्याचे महत्कार्य पूर्ण झाल्याची जाणीव होऊन मध्यम वयातच परमेश्वराच्या प्रत्यक्ष भेटीची उत्कट आतुरता उत्पन्न झाली, तेव्हा त्यांनीही ऐहिक जीवनाचा त्याग करण्याचे मनात आणून सगळ्यांचा मोठ्या समाधानाने शेवटचा निरोप घेण्यासाठी देहूगावात घरोघर भेट देऊन "आम्ही जातो आमुच्या गावा। आमुचा रामराम घ्यावा।। आता कैचे येणे जाणे। सहज खुंटले बोलणे।।" हा सुप्रसिद्ध अभंग गात गात ते इंद्रायणी नदीवर गेले. भजनानंदात तल्लीन होता होता भगवंताचे विमानच आपल्याला नेण्याकरिता इंद्रायणीच्या 'पल्याड' आले आहे, असे त्यांना भासू लागले. परमोल्हासाने त्यांनी इंद्रायणीत प्रवेश केला! एक कथा सांगते की त्या नदीतच एकनाथांप्रमाणे त्यांनी जलसमाधी घेतली. दुसऱ्या कथेप्रमाणे त्या विमानात बसून ते सदेह स्वर्गास गेले.

> तथापि, दोन्ही कथांचा आशय एकच की, तुकाराम महाराजांनी अत्यंत सुखासमाधानाने आपले ऐहिक जीवन कृतकृत्य झाले असे समजून ऐहिक जगाचा निरोप घेतला, ऐहिक जीवनाचा त्याग केला आणि ते परमात्मस्वरूपी विलीन झाले. म्हणूनच त्यांच्या ह्या ऐहिक अस्तित्वाच्या त्यागाला 'आत्महत्या' न म्हणता 'आत्मार्पण' म्हणूनच गौरविले गेले आहे.

वर तशा शतावधी उदाहरणांपैकी जी काही उदाहरणे दिलेली आहेत, त्या सर्वांवरून जो निष्कर्ष निघतो, तो असा

की, जो जीव आपण होऊन जात नाही तो हेतुपूर्वक बळाने देण्याच्या सर्व कृत्यांना ‘आत्महत्या’ म्हणत नाहीत. तसे कृत्य निंद्यच मानले जाते असे नाही, तर अत्यंत असमाधानाने, विफलतेच्या तीव्र जाणिवेने, संकटांना कंटाळून, इच्छा असताही सुखाने जगता येत नाही म्हणून अत्यंत अतृप्त अशा मनःस्थितीत, वैतागाच्या भरात जे बळाने जीव देतात त्यांच्या त्या कृत्याला साधारणतः ‘आत्महत्या’ म्हटले जाते; परंतु आपले कार्य, जीवनाचे ध्येय, जीवनाचा हेतू संपूर्णपणे सफल झालेला आहे अशा सफलतेच्या, कृतकृत्यतेच्या भावनेने जे आपल्या ऐहिक अस्तित्वाची हर्षभराने समाप्ती करतात, त्यांच्या त्या कृत्यास आत्मार्पण असे म्हणतात. यद्यपि ह्या परिवर्तनशील किंवा अखंड विकसनशील जगात सर्वतोपरी परिपूर्णता अशी केंव्हाही असू शकणार नाही.

जे जीवनात संपादावयाचे होते ते सर्व संपादिलेले आहे म्हणून आता कर्तव्य असे काही उरलेले नाही अशा कृतकृत्य भावनेने रिक्तकाम किंवा पूर्णकाम झालेले धन्य पुरुष आपण होऊन आपले प्राण विसर्जन करतात. ते आपले नश्वर जीवन विश्वाच्या चिरंतन जीवनात विलीन करून टाकतात. योगवाशिष्टात म्हटल्याप्रमाणे–

अंतरिक्तो बहीरिक्तो रिक्तःकुंभरिवांबरे
अंतःपूर्णो बहिःपूर्णो पूर्णः कुंभरिवार्णवे ।।

तथापि, आपल्या या जीवनकार्याची सापेक्षतः परिपूर्णता झाली आहे, अशी आत्मसंतुष्टता वाटल्यानंतर समाजाला किंवा स्वतःला जो देह वार्धक्याने म्हणा, व्याधीने म्हणा, पण केवळ भारभूत असाच राहणार आहे, त्या देहाचा गुहाप्रवेशाने, अग्निदिव्याने, समुद्रसमाधी किंवा अंतिम योगसमाधी घेऊन

किंवा अशाच कोणत्यातरी मार्गाने जे त्याग करतात, ते त्यांचे कृत्य उत्तान अर्थी 'बळाने जीव देणे'च असताही त्याला 'आत्मसमर्पण' म्हणून जे गौरविले जाते ते यथार्थच असते !

**धन्योऽहम् । धन्योऽहम् कर्तव्यं मे न विद्यते किंचित् ।**
**धन्योऽहम धन्योऽहम् प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम् ।।**



# म्यां असतां दिवस नसे व्यर्थ गमाविला....


## वि. दा. सावरकर

ये मृत्यो ! ये तूं ये, यावयाप्रती । निघालाचि असशिल जरि ये तरी सुखें !

सत्कुल, अव्यंग देह, परम दयाळू
जनक आणि जननी ती, त्यांहुनीहि कीं
वात्सल्यें, पुण्यें, प्रतिपाळिता तसा
अग्रज, जो अग्रगण्य तापसांमध्यें;
मूर्त विनय अनुज असा; अद्वितीयसें
प्रेयांचे प्रेमपुण्य; धन्य आणि तें
ध्येय महत्, देई जें जीवनाप्रती
सार्थकत्व मनुजांच्या, काव्यमय करी
जे आयु:कालातें, पूत चरित्रा;
तप कांहीं, जप कांहीं, यश कांहीं तें,
कांहींशी मान्यताहि शारदेचिया
राजसभेमाजी कविरत्न भूषिता--
चाखियले रस नाना; हुंगियले ते
शतभूजलवायु ललित शतसुगंध कीं
पंचाग्नीमधिल तसा प्रखर भाजत्या
उत्तापापासुनि तों प्रीतिच्या मऊ
स्निग्ध परिष्वंगापर्यंत सर्वही
शीतल, शीतोष्ण, उष्ण अनुभवीयले
कटिबंधस्पर्श तसे; परिसिले किती
स्वरशत, शतभाषा, शतगीति नवनवा
शतमंजुल कंठांतिल–आणि मृत्यूच्या
शतकठोर कंठांतिल घोर लागल्या;
नानाजन, जानपदें, जातिविभिन्ना
देश किती दृश्यें तीं, भूमिच्या महा--
संग्रहालयांत परिभ्रमत पाहिलीं,
सुरूप तें, सुरेख तें, सुललित तें असें
पाहिलें डोळ्यांनीं किमपि तरि जया
मृत्यो ! ते डोळे हे झांक तूं सुखें
--झांकणेंचि आवश्यक जरि गमे तरी !
कीं सुरेख पाहियलें-- किमपि परी तें !
प्रीति विफल : विरह चिरंतन ! नवीं वयीं,
प्रौढ धुरंधरहि न जी शकति तोलण्या,
तीच धुरा भर उन्हांत तोलणें घडे !
म्हणुनि असे अजुनी अपुरीच राहिली
खेळाची हौस हंसत चांदण्यामध्यें
या आयुष्याच्या मम ! तरिहि जाणुनी
कीं न ययातीचीहि हौस पुरेशी
झाली जरि आयुष्याचाचि सर्वतो
नृपति करी खेळ एक; आणि पाहुनी
इच्छेच्या बीजा फलभोग लागतां
इच्छेचीं बीजेंची त्यांत फिरोनी;
आणि अनुभवुनी कीं एक भुकेची
एक जेवणानें जी तृप्ति जाहली
तृप्ति सहस्त्रावधी भोजनांमुळें
असते कीं तितुकीची आणि तशीची;
मी दे तुज अनुमोदन संपवूं असा
हा जीवन लेख इथें, पृष्ठि या जरी
पृष्ठें जी पुढलीं ती मागल्या तया
पृष्ठांची असली पुनरुक्तिची तरी !

म्यां असतां दिवस नसे व्यर्थ गमविला
दिवसास्ताचेहि म्हणुनि दु:ख ना मला.

[ 'मरणोन्मुख शय्येवर' या अंदमानकालात लिहिलेल्या कवितेतील काही भाग ]



फ्रान्स खडा आहे

फ्रेंच जनतेने पुन: एकदा आपले सारे भविष्य पुढील सात वर्षांसाठी जनरल चार्ल्स द गॉल याचेवर सोपवून त्याला फ्रेंच अध्यक्षपदी निवडून दिले आहे. निवडणुकीत त्याला मिळालेल्या मतांमुळे जरी त्याच्यावरील फ्रेंचांचा विश्वास कमी होत असल्याचे उघड झाले असले तरी फ्रेंचांचे त्याच्यावरील प्रेम अद्यापही कमी झाले नाही हे निश्चित. बहुसंख्य फ्रेंचांना जनरल द गॉल अजूनही फ्रान्सच्या शौर्याचे आणि प्रगतीचे प्रतीक वाटतो.

दुसऱ्या महायुद्धात फ्रान्सला पराभवाच्या व अपमानाच्या गर्तेतून सन्मानाने ओढून काढणारा नेता म्हणून जरी फ्रेंच जनतेला जनरल द गॉलचे

# फ्रेंच लोकशाहीचा त्राता

# फ्रान्सची मूर्तिमंत अस्मिता

# जनरल द गॉल

अरुण साधू

कौतुक वाटत असले तरी त्याच्याकडे विशेष आदराने पाहते ती फ्रान्सला अस्थिरतेच्या भोवऱ्यातून खेचून काढून राजकीय स्थैर्य आणून देणारा व फ्रान्सच्या सामर्थ्याची प्रतिष्ठा साऱ्या जगाला पटवून देणारा पोलादी पुरुष म्हणून !

परंतु, आता जनरल चार्ल्स द गॉलचे वय ७५ च्या वर गेले आहे. निवडणुकीत त्याच्या विरोधात उभे राहण्याचे त्याच्या विरोधकांना धैर्य होऊ लागले आहे; एवढेच नव्हे तर द गॉलला विचार करायला लावतील एवढी मते त्यांना मिळू लागली आहेत. एके काळी उभ्या फ्रान्सचे जिवंत

प्रतीक असलेला फ्रान्सचा भाग्यविधाता जनरल चार्ल्स द गॉल आता मावळतीकडे झुकू लागला आहे.

## मूर्तिमंत अस्मिता

जनरल चार्ल्स द गॉलची फ्रेंच अस्मितेशी एके काळी झालेली ही एकरूपता एवढी सर्वमान्य झाली होती की, " हा तुमच्यासमोर फ्रान्स खडा आहे, " असे एकदा त्याने स्वत:च एका वार्ताहर परिषदेत सांगून टाकले होते आणि या विधानाला आक्षेप घेण्याची कुणाची हिंमत नव्हती.

स्वत: जनरल द गॉलचाही फ्रान्सशी स्वत:च्या झालेल्या एकरूपतेवर एवढा दृढ विश्वास होता की त्याचे काही टीकाकार कधी कधी कुत्सितपणे म्हणत, " जनरल द गॉलला फ्रान्सचा नकाशा बघायचा असला तर तो आरसाच स्वत:समोर धरतो. "

आणि फ्रान्सच्या इतिहासात असेही काही क्षण येऊन गेले की त्या वेळी काही अंशांनी का होईना, ही वस्तुस्थिती होती. १९४४ च्या ऑगस्टमध्ये विजयोन्मादाने वेडया झालेल्या फ्रेंचांच्या अश्रूंनी भिजलेल्या पॅरिसच्या रस्त्यांवरून भोवतालच्या तुफान गर्दीने जल्लोषात केलेली अभिवादने स्वीकारीत तो जेव्हा चालत गेला, तेव्हा फ्रान्सने भोगलेले सारे दु:ख, कष्ट, फ्रान्सची इभ्रत आणि फ्रान्सचे आशादायी भविष्य सारे सारे त्याच्या ठायी एकवटले होते. आणि जर्मनांच्या पाशवी आक्रमणाखाली दबलेल्या फ्रेंच जनतेला पारतंत्र्याचे जोखड फेकून देण्याचे एकटे आवाहन त्याने ब्रिटिश नभोवाणीवरून १९४० साली केले तेव्हाही फ्रान्सचा तोच आशेचा एकुलता एक किरण होता.

परंतु, राष्ट्रनेत्यांची आपल्या राष्ट्राशी झालेली एकरूपता फार काळ टिकू शकत नाही. विशेषत:, फ्रान्ससारख्या मतविभिन्नतेत विपुलता असलेल्या देशात तर मुळीच नाही; आणि आज फ्रान्सचे राज्यशकट स्थिरतेने हाकण्यास जनरल द गॉलसारखा दुसरा कुणी सामर्थ्यवान नेता न सापडल्यान फ्रेंच जनतेने त्याला जरी पुन: फ्रान्सच्या अध्यक्षपदी निवडून दिले असले तरी फ्रान्सचे वैभव, सामर्थ्य, इतिहास यांविषयीच्या त्याच्या सर्व कल्पनांशी फ्रान्सची बहुसंख्य जनता निश्चितच सहमत नाही. फ्रान्सची बहुसंख्य जनता डाव्या राजकारणाकडे झुकणारी आहे. उजव्या गटाच्या क्रांतीतून जनरल द गॉल १९५८ साली अधिकारावर आला होता आणि गमतीची गोष्ट म्हणजे तरीही फ्रेंच जनता फ्रेंच लोकशाहीचा एकमेव त्राता आणि फ्रान्सला लष्करी हुकूमशाहीपासून वाचविणारा म्हणूनच जनरल द गॉलला मानते.

## फ्रान्स म्हणजे भव्यता

फ्रेंच जनता त्याला मानते ती त्याच्या फ्रेंच सन्मानावरील व फ्रेंच अस्मितेवरील अढळ श्रद्धेमुळे ! जनरल द गॉलचे आपल्या मायभूमीवर पराकोटीचे प्रेम आहे. फ्रान्सच्या मोठेपणावर, वैभवावर, सामर्थ्यावर अपार निष्ठा आहे. जनरल द गॉलने दुसऱ्या महायुद्धावर एक प्रचंड स्मरणग्रंथ लिहिला आहे. त्यात तो म्हणतो,

" उच्चतेशिवाय, भव्यतेशिवाय फ्रान्स हे फ्रान्सच होऊ शकत नाही."

बालपणापासूनच जनरल चार्ल्स द गॉलला फ्रान्सच्या वैभवचिन्हांचे विलक्षण आकर्षण होते. नोत्रे दामवरील रात्र, व्हर्सलिसच्या सागर किनाऱ्यावरील संध्या, पॅरिसमधील आर्क दि त्रांयफवर लकाकणारा सूर्यप्रकाश या गोष्टी त्याला पार भारून टाकीत.

जनरल द गॉलचे आईवडील दोघेही निष्ठावान कॅथॉलिक होते. त्याच्या वडिलांनी तर तत्त्वज्ञानाचा शिक्षक होण्यासाठी सैन्यातील चांगली नोकरी सोडून दिली होती. १८९० साली त्याचा जन्म झाला. शाळेतील शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याने लगेच लष्करी विद्यालयात प्रवेश केला. वयाच्या बाविसाव्या वर्षी विद्यालयातील ७०० विद्यार्थ्यांमध्ये पहिल्या दहा क्रमांकांत येऊन तो लष्करी परीक्षा उत्तीर्ण झाला.

आणि लगेच त्याला लष्कराची खरी परीक्षा देण्याचीही संधी लवकरच चालून आली. पहिल्या महायुद्धाला तोंड लागले. पहिल्या आठ महिन्यांतच लेफ्टनंट द गॉल दोनदा जखमी झाला. १९१६ साली जखमी होऊन बेशुद्धावस्थेत असताना जर्मनांच्या अटकेत गेला. तेथून त्याने पाच वेळा पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण त्याची सव्वासहा फुटांची उंची प्रत्येक प्रसंगी आडवी आली.

## सुसज्ज सेनेचा आग्रह

चार्ल्स द गॉल सुटून मायदेशी परतला तेव्हा युद्धाच्या वणव्यात होरपळून निघालेले फ्रान्स आपल्या जखमा चाटीत बसले होते. १,३५८,००० फ्रेंच नागरीक युद्धात ठार झाले होते आणि ४० लक्षांवर जखमी झाले होते. युद्धाच्या भयानकतेने सारे फ्रान्स दिङ्मूढ झाले होते.

या दिङ्मूढ अवस्थेचाच फ्रान्सच्या संरक्षणविषयक धोरणावर फार परिणाम झाला. बचावात्मक संरक्षणाचे धोरण फ्रान्सने स्वीकारले व त्याच दृष्टिकोनातून जर्मनांच्या संभाव्य आक्रमणापासून बचाव करण्यासाठी म्हणून उत्तर सीमेवर एक स्थिर ' मॅजिनॉट तटबंदी ' उभारण्यात आली. जर्मन सैन्य ही तटबंदी कधीच फोडू शकणार नाही, अशा विश्वासात फ्रेंच राज्यकर्ते व लष्करी तज्ज्ञ होते.

परंतु, जनरल चार्ल्स द गॉलला हा वास्तवात्मक पवित्रा पसंत नव्हता; पराभूत मनोवृत्तीतून या निष्फळ धोरणाचा उगम झाला असे त्याला वाटत होते. आधुनिक यंत्रसामर्थ्याने सुसज्ज अशी चिलखती गाड्यांची, विमानांची मदत असलेली आणि शत्रूप्रदेशात दूरवर मुसंडी मारू शकणारी किमान एक लाख तरी सेना फ्रान्सजवळ हवी असे त्याला वाटत होते. आपली लष्करविषयक मते त्याने एका पुस्तकात मांडली. पण त्या पुस्तकाच्या अवघ्या शंभर प्रतीदेखील फ्रान्समध्ये खपल्या नाहीत. त्याचे जर्मन भाषांतर मात्र चांगलेच उचलले गेले. हिटलरने ते पुस्तक स्वत: वाचून काढले. आणि त्यातील कल्पना लगेच अमलातही आणण्यास सुरुवात केली.

राजकीय नेत्यांच्या अस्थिरतेचाही द गॉल याला कंटाळा यावयास सुरुवात झाली.

१९३२ ते १९३७ च्या दरम्यान जनरल द गॉल फ्रान्सच्या संरक्षण खात्याचा सेक्रेटरी जनरल म्हणून काम पाहात असताना एकूण १४ मंत्रिमंडळे गडगडली. राजकीय नेत्यांची लायकी भ्रष्टाचार, पहिल्या युद्धाच्या दणक्यामुळे निर्माण झालेली जनतेची पराभूत मनोवृत्ती, औद्योगिक आणि आर्थिक घसरगुंडी, बेकारी, भ्रष्ट वृत्तपत्रे या साऱ्या संकटांनी फ्रान्स चौथ्या दशकात अगदी जेरीला आला होता. सैन्यामध्ये तर राजकारण्यांविषयीचा तिटकारा वाढत चालला होता. आणि सैन्यातील काही गट तर उघड उघड असे राज्यकर्ते असल्यापेक्षा फॅसिझम बरा, असे म्हणू लागले होते.

जनरल द गॉलच्या चिलखती सुसज्ज लष्कराच्या कल्पनेला फ्रान्समध्ये कुठेच थारा मिळाला नाही. 'मॅजिनॉट लाईन'च्या भक्कमपणाच्या विश्वासामुळे फ्रेंच लष्करी तज्ज्ञ आणि राज्यकर्ते दुसऱ्या कशाचाच विचार करायला तयार नव्हते. परंतु, द गॉलच्या आग्रहामुळे १९३८ मध्ये एक चिलखती डिव्हिजन निर्माण करण्याचे उशीरा का होईना पण ठरविण्यात आले.

## जर्मनीची मुसंडी

१९४० च्या मे मध्ये जर्मनीने फ्रान्सवर चाल केली. जर्मनांच्या चिलखती पॅन्झर तुकड्या डाईव्ह बॉंबर्सच्या मदतीने उत्तर फ्रान्सचा कालवा पार करून वेगाने आत घुसू लागल्या. ज्या मॅजिनॉट लाईनवर फ्रेंचांचे संरक्षणाचे सारे धोरण टेकले होते तिला धक्काही न लावता जर्मन तुकड्या बेल्जियममधून फ्रान्समध्ये घुसल्या आणि ती निरुपयोगी तटबंदी पार मागे टाकून फ्रेंचांच्या बचावाच्या संरक्षण धोरणाचे त्यांनी पार हसे करून टाकले. जर्मनांच्या या वेगवान मुसंडीपुढे सारे फ्रेंच सैन्य हतबुद्ध होऊन माघार घेत असताना त्याच्याशी खरी नाव घेण्याजोगी टक्कर दिली ती जनरल द गॉलच्या नेतृत्वाखाली असलेल्या एकुलत्या एक चिलखती डिव्हिजनने !

हा वेळपर्यंत त्या वेळच्या फ्रेंच राज्यकर्त्यांमध्ये जनरल द गॉलच्या लष्करी कल्पनांना पाठिंबा देणारा एकुलता एक मुत्सद्दी पॉल रेनॉं हा प्रधानमंत्री झाला होता. युद्धाच्या गोंधळातच त्याने द गॉलला संरक्षण खात्याचा मंत्री म्हणून नेमले. फ्रान्सला शेवटपर्यंत लढवावयाचे असा द गॉल व रेनॉं या दोघांचाही निर्धार होता आणि त्यासाठी ते दोघेही निकराचा प्रयत्न करीत होते.

जर्मन सैन्य पॅरिसजवळ आले. फ्रेंचांची स्वप्ननगरी पॅरिस, तिला धक्काही पोहोचू नये म्हणून काहीही प्रतिकार न करता, द गॉलच्या विरोधाला न जुमानता पॅरिस जर्मनांच्या हाती सोडून राजधानी बोरद्युक्सला नेण्यात आली. फ्रेंच भूमीवरून अशक्यच झाले तर राजधानी अल्जीयर्सला नेऊन तेथून जर्मनांशी लढा द्यावयाचा, असे पॉल रेनॉं आणि जनरल द गॉलने ठरविले खरे, पण चर्चिलची मदत मागण्यासाठी जनरल द गॉल लंडनला जाऊन ब्रिटन व फ्रान्सच्या एकीकरणाची एक

महत्त्वाकांक्षी योजना घेऊन परतला आहे तोवर पॉल रेनॉंचे मंत्रिमंडळ गडगडले होते आणि त्या जागी जर्मनांना शरण जाण्यासाठी उत्सुक असलेले मार्शल पेतॉंचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले होते.

## प्रतिकारयुद्ध

युद्ध सुरू झाल्यावर एका महिन्याच्या आतच फ्रान्सचा प्रतिकार थंडा पडला होता आणि युरोपातील स्वातंत्र्याचे, कलेचे, राजकारणाचे माहेर–फ्रान्स–जर्मनांना शरण जात होते. विजेच्या तडाख्याने सारे घर उध्वस्त व्हावे, तसे फ्रान्सचे झाले होते. फ्रान्सचे स्वातंत्र्य, फ्रान्सचा अभिमान, फ्रान्सची कीर्ती, सारे सारे रसातळाला जात होते.

पण शरणागत फ्रान्समध्ये जनरल चार्ल्स द गॉलला राहावयाचे नव्हते. फ्रान्स-बाहेरून का होईना, पण फ्रान्सच्या स्वातंत्र्यासाठी त्याला लढा द्यावयाचा होता. फ्रान्समधील ब्रिटिश लियॉझॉ ऑफिसर जनरल स्पिअर्स याला निरोप देण्यासाठी म्हणून तो बोरद्यूक्सच्या विमानतळावर गेला. स्पिअर्सशी त्याने हस्तांदोलन केले. विमानाची शिडीही काढण्यात आली आणि अगदी शेवटच्या क्षणी त्याने विमानाच्या दारात उडी मारली. फ्रेंच पोलिस आणि अधिकारी आ वासून बघताहेत तोवर द गॉलच्या विमानाने आकाशात ब्रिटनच्या दिशेने झेपही घेतली होती.

दुसऱ्या दिवशी द गॉलने चर्चिलची ज्या वेळी भेट घेतली त्याच वेळी इकडे पेतॉंचे फ्रेंच सरकार जर्मन तहाच्या शर्ती स्वीकारीत होते. चर्चिलने लगेच द गॉलला स्वतंत्र फ्रान्सचा नेता म्हणून मान्यता दिली आणि ब्रिटिश नभोवाणीवरून फ्रेंच जनतेला स्वातंत्र्यलढ्याचे आवाहन करण्यास परवानगीही दिली. १८ जून १९४० रोजी जनरल द गॉलचा धीरगंभीर आवाज ब्रिटिश नभोवाणीवरून फ्रेंच जनतेच्या कानी पडला, "फ्रेंचांनो, जागे व्हा. जर्मन आक्रमकांच्या जुलमाखाली दबू नका आणि फ्रेंच प्रतिकाराची ज्योत विझू देऊ नका!"

परंतु, हा आवाज किती फ्रेंचांना ऐकू आला कुणास ठाऊक! फ्रान्समधील चर्चेस, सनदी नोकर, लष्करी अधिकारी, विद्वान, बुद्धिवादी आदी सर्व प्रमुख मंडळी त्या वेळी पहिल्या महायुद्धात अपूर्व पराक्रम गाजविलेल्या मार्शल पेतॉंच्या नादी लागली होती. आणि पेतॉंने तर सपशेल शरणागती पत्करली होती. जनरल चार्ल्स द गॉलच्या आवाहनाला प्रतिसादही मोठ्या उत्साहाचा मिळाला नाही. काही आठवड्यांत फक्त सात हजार फ्रेंच स्वयंसेवक स्वतंत्र फ्रान्सच्या सहाय्यासाठी धावून आले. फ्रेंच नाविक दलातील जहाजे पेतॉंच्या तहामुळे जर्मनांच्या हाती लागू नयेत म्हणून ब्रिटिशांच्या रॉयल नेव्हीने त्याच सुमारास एका फ्रेंच फ्लोटवर हल्ला चढविला होता; त्यामुळे तर 'स्वतंत्र फ्रान्स' विषयीची फ्रेंचांची साशंकता अधिकच वाढली.


## संधिसाधू मित्र

स्वतंत्र फ्रान्सच्या चळवळीच्या या सुरुवातीच्या काळात जनरल द गॉलला

खरोखरच अनंत अडचणी आणि असंख्य अपमान सहन करावे लागले. ब्रिटिश आपल्या पारंपरिक संधिसाधुपणाला धरून कधी चार्ल्स द गॉलला उचलून धरीत तर कधी त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करीत. कधी त्याच्या प्रतिस्पर्ध्याला उचलून धरीत तर कधी त्याला न कळविता एखाद्या फ्रेंच कॉलनीवर हल्ला चढवून ती ताब्यात घेत. एकदा तर ब्रिटिशांनी सिरियामधील पेताँ सरकारच्या प्रतिनिधींशी जनरल द गॉलला पत्ताही न लागू देता शस्त्रसंधी करार करून टाकला. सिरिया आणि लेबॅनॉनला स्वतंत्र फ्रान्समध्ये सामील करून घेऊन युद्धानंतर त्या दोन्ही वसाहतींना स्वतंत्र करण्याविषयी त्याने तेथील राष्ट्रीय नेत्यांशी बोलणी केली होती. त्यामुळे ब्रिटिशांच्या या कृत्यामुळे जनरल द गॉलला अतिशय संताप झाला. स्वतंत्र फ्रान्सची अब्रू, सार्वभौमत्व पणाला लावल्यासारखा त्याने या गोष्टीला कडाडून विरोध केला. त्याचा आग्रही हट्टीपणा ही अँग्लो-अमेरिकनांना एक मोठी कटकटीचीच गोष्ट होऊन बसली. पण जनरल द गॉल त्या वेळी म्हणत असे, "आमचे सामर्थ्य आणि आमचे वैभव आता आग्रही हट्टीपणातच आहे." या हट्टीपणामुळे अमेरिकेची तर त्याच्यावर भलतीच नामर्जी झाली.

१९४१ च्या शेवटाला जर्मनांच्या प्रगतीला थोडा पायबंद बसला. त्याच वेळी फ्रान्समध्येही पराभूत मनोवृत्तीची लाट ओसरू लागली होती. नाझी जर्मनांची रशियातून आणि इतरत्र जसजशी पिछेहाट सुरू झाली, तसतशी स्वतंत्र फ्रान्सची चळवळ आपले अस्तित्व फ्रान्समध्ये नाझी विरोधात दाखवू लागली. जनरल द गॉलच्या बी. बी. सी. वरील भाषणांना फ्रान्समध्ये अधिक श्रोते मिळू लागले. जर्मनांना पराभूत करून स्वातंत्र्य मिळविण्याची आशा आता फ्रेंच जनतेला वाटू लागली. दोन वर्षांपूर्वी ज्या जनरल द गॉलने स्वातंत्र्य मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते त्याच्याविषयीचा फ्रेंचांचा आदर व प्रेम विलक्षण वाढले.

जर्मन पराभवाची चिन्हे जसजशी वाढू लागली तसतसा त्यानंतर फ्रान्समधील नाझी सत्तेला स्वतंत्र फ्रान्सच्या विरोधी चळवळींचा शह सुरू झाला. जिवावर उदार होऊन, हृदयशून्य जर्मन गुप्त पोलिसांच्या नजरा चुकवून आपल्या स्वातंत्र्य चळवळी चालविणाऱ्या या विरोधकांमध्ये सर्व थरांतील, सर्व पक्षांतील फ्रेंच जनता होती. त्यांपैकी बरेचजण जनरल द गॉलचे नेतेपण मानीत होते, तर काही त्याला ब्रिटिशांच्या हातचे बाहुले समजत होते. परंतु, त्यामुळे काहीच फरक पडत नव्हता. फ्रान्सवरील अपार निष्ठेमुळे ते सारे एकत्र आले होते. फ्रान्सच्या दक्षिणेकडील डोंगराळ आणि जंगली भागांत तर एक गनिमी सेनाच नाझींच्या विरोधात खडी झाली होती. नाझींचा क्रूरपणाही वाढला होता. स्वतंत्र फ्रान्सच्या चळवळीत जर्मनांनी ३००,००० फ्रेंच विरोधकांना गोळ्या घालून ठार केले. जर्मन कॉन्सेंट्रेशन कँपमध्ये पाठविलेल्या १,१२,००० फ्रेंच विरोधकांपैकी फक्त ३५,००० जिवाने वाचले.



गिरॉड, रुझवेल्ट, द गॉल, चर्चिल [ रुझवेल्ट यांच्या कॅसाब्लँका येथील निवासस्थानी ]

फ्रान्सबाहेरील, स्वतंत्र फ्रान्सच्या जनरल द गॉलच्या भोवती जमलेल्या सैन्याला मात्र अँग्लो-अमेरिकनांकडून अतिशय अपमान सहन करावे लागले. अँग्लो-अमेरिकन फौजांनी कॅसाब्लँका, अल्जिरिया आणि ओरान या जर्मनांच्या हातचे बाहुले झालेल्या पेताँ सरकारच्या हाती असलेल्या फ्रेंच वसाहतींवर हल्ला केला तेव्हा जनरल द गॉलच्या स्वतंत्र फ्रान्सच्या फौजांना मुद्दाम त्यात भाग घेऊ देण्यात आला नाही.

पुढे पेताँ सरकारमधून पळून आलेला फ्रेंच जनरल गिरॉड यास हाती धरून त्याला फ्रेन्चांचा 'नेता' म्हणून पुढे आणण्यास अमेरिकनांनी सुरुवात केली; कारण, त्यांना जनरल द गॉलसारखा फ्रान्सच्या सार्वभौमत्वाविषयी, फ्रान्सच्या मोठेपणासाठी, फ्रान्सच्या इभ्रतीसाठी आग्रही हट्ट धरणारा नेता नको होता. जनरल द गॉलच्या संतापाचा स्फोट झाला. त्याने अमेरिकेच्या प्रेसिडेंट रुझवेल्टला कळविले, "तुम्ही फितुरांकडून फितुरी विकत घेऊ शकाल, पण त्यासाठी फ्रान्सच्या स्वातंत्र्याची

किंमत तुम्ही कधीच देऊ शकणार नाही." जनरल द गॉलचा फ्रान्सच्या मानासाठी कुठलीही तडजोड न करण्याचा निर्धार इतका तीव्र होता की, त्याचा वैताग येऊन चर्चिललाही वाटू लागले की, जनरल द गॉलला मागे सारून जनरल गिरॉडलाच पुढे आणावे.

परंतु, १९४३ मध्ये रुझवेल्ट, आयसेन हॉवर आणि चर्चिल या तिघांनाही कळून चुकले की, जनरल द गॉलला दुर्लक्षून चालता येणार नाही. फ्रान्समध्ये जर्मनांना खरा शह देणारा तोच होता; फ्रान्समधील नाझीविरोधी चळवळीला जन्म देणारा तोच होता; सर्व उत्तर आफ्रिकेत त्याच्या नावाला किंमत होती. गिरॉडला कुणी विचारीतही नव्हते. अल्जियर्स आणि ओरान येथे गिरॉड गेला तेव्हा त्याच्या स्वागतासाठी जमलेली गर्दी " द गॉलचा विजय असो " अशा घोषणा देत होती. फ्रान्समध्ये स्थापन झालेल्या भूमिगत विरोधकांच्या राष्ट्रीय समितीने जनरल द गॉललाच अध्यक्ष करण्याची मागणी केली. थोड्याच दिवसांत गिरॉडला सेवानिवृत्तच व्हावे लागले. ब्रिटनचे परराष्ट्र मंत्री त्यानंतर एकदा द गॉलला म्हणाले, " साऱ्या युरोपियन दोस्त राष्ट्रांनी मिळून जेवढ्या कटकटी करून अँग्लो अमेरिकनांना त्रास दिला असेल त्याहिपेक्षा जास्त फ्रान्सने दिला आहे." त्यावर द गॉल उत्तरला "बरोबर आहे, नाहीतरी फ्रान्स हे एक फार मोठे राष्ट्र आहे."

## सुवर्णदिन

पण तरीही अमेरिकनांनी मात्र अद्याप द गॉलचे नेतृत्व मानले नव्हते. जून १९४४ मध्ये दोस्त सेना नॉर्मंडीवर उतरल्या तेव्हा आपल्या राष्ट्राला मुक्त करावयास निघालेल्या सेनेचा प्रमुख म्हणून मान्यता मिळविण्यास त्याला मोठे कष्ट पडले.

आणि शेवटी पॅरिसच्या व द गॉलच्या आयुष्यातील सुवर्णदिन उजाडला. जर्मन फौजांना २५ ऑगस्ट १९४४ रोजी मागे रेटून फ्रेंच फौजांनी पॅरिसमध्ये प्रवेश केला. जर्मन तोफखान्याचा पॅरिसच्या सीमेवर मारा चालू असतानाच सैन्याच्या पाठोपाठ जनरल द गॉलनेही पॅरिसमध्ये प्रवेश केला.

आल्याबरोबर त्याने आपल्या युद्धखात्याच्या इमारतीत ताबडतोब कामाला सुरुवात केली. पॅरिसमध्ये प्रवेश केल्यापासून पॅरिसच्या जनतेने त्याचे उत्स्फूर्त उत्साहाने स्वागत केले. रस्त्याच्या दुतर्फा दाटीने गर्दी करून उभ्या असलेल्या अश्रुपूर्ण नेत्रांनी विजयाच्या घोषणा देणाऱ्या लोकांची अभिवादने द गॉल जेथे जात होता, तेथे त्याला मिळत होती. पोलिस तुकड्या, गार्डस् तुकड्या त्याला मोठ्या अभिमानाने मानवंदना देत होत्या.

'' नॅशनल कौन्सिल ऑफ रेझिस्टन्स ' आणि ' पॅरिशियन कमिटी ऑफ लिबरेशन ' यांना द गॉलने प्रथम भेट दिली तेव्हाही त्यांनी त्याचे मोठ्या प्रेमाने स्वागत केले. फ्रान्सबाहेर फ्रान्सच्या स्वातंत्र्यासाठी जनरल द गॉल निकराचा प्रयत्न करीत असता

या दोन क्रांतिकारक संस्थांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भूमिगत चळवळी करून द गॉलला फ्रान्समधून साथ दिली होती. या संस्थांच्या सदस्यांना द गॉल प्रथमच बघत होता. पण, ज्या एका ध्येयासाठी जनरल द गॉल आणि ही सारी मंडळी लढली होती त्यामुळे त्यांच्यांत एक वेगळेच जवळचे नाते निर्माण झाले होते. परस्परांची औपचारिक ओळख करून घेण्याची गरजच नव्हती. ओळख एकदमच पटली.

याच वेळी फ्रान्सचे सार्वभौम गणराज्य जाहीर करून टाकण्याची जनरल द गॉलला जेव्हा विनंती करण्यात आली, तेव्हा तो म्हणाला, " कशाला ? सार्वभौम गणराज्य अस्तित्वातून कधीच गेले नव्हते. स्वतंत्र फ्रान्स, फ्रेंच राष्ट्रीय मुक्तीची चळवळ, फ्रेंच कमिटी ऑफ नॅशनल लिबरेशन ' या साऱ्या संस्था सार्वभौम गणराज्याचे निशाणच पुढे नेत होत्या. मार्शल पेताँचे व्हिची येथील ' फ्रेंच ' सरकार खऱ्या अर्थाने कधीच अस्तित्वात नव्हते. सार्वभौम गणराज्याच्या सरकारचा मी अध्यक्ष आहे; मग आता पुन्हा गणराज्य जाहीर करण्याची काय आवश्यकता ? "

दुसऱ्या दिवशी २६ ऑगस्टचे पॅरिसमधील विजय संचलन हा फ्रान्सच्या इतिहासातील अपूर्व क्षण होता. आर्क दि त्रायंफसमोर फ्रेंच जनतेचा अपार महापूर पसरला होता. फ्रेंच लष्कराची मानवंदना स्वीकारून जनरल द गॉल व्यासपीठाच्या खाली उतरला.

विजयाच्या हर्षाने वेडया झालेल्या, गाणी गात, नाचत, अश्रू ढाळीत, त्याच्या नावाचा आणि फ्रान्सच्या स्वातंत्र्याचा उत्स्फूर्त जयजयकार करीत रस्त्याच्या दुतर्फा पसरलेल्या मानवी महासागरातून जनरल द गॉल अभिवादने स्वीकारीत पायी चालत गेला. २० लाखांवर फ्रेंच जनता त्या ठिकाणी फ्रान्सचा हा विजय सोहळा पाहण्यास जमली होती. आणि त्या ८० लाखांचे लक्ष केंद्रित झाले होते, त्यांच्या विषयाचे, त्यांच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक असलेल्या जनरल द गॉलवर. द गॉल लिहितो, " एवढया प्रचंड गर्दीतून मी पायी चालत जावे याला जनरल स्टाफचा विरोध होता. एखादे जर्मन विमान नुसते गोळ्या फेकीत त्या गर्दीवरून गेले तरी प्रचंड गोंधळ होईल असे त्यांना वाटत होते. त्या प्रचंड गर्दीला आवर घालता येणार नाही असे त्यांना वाटत होते. पण आज माझी फ्रान्सच्या दैवावर श्रद्धा होती. गर्दी शिस्तीतच वागेल याची मनोमन खात्री होती. जनतेचे मन आकर्षित होईल, असे काही व्यक्तिमत्त्व , अशा हालचाली मजजवळ नव्हत्या आणि तरीही सर्वांचे लक्ष माझ्याकडे होते. माझ्या जयजयकाराच्या प्रचंड गर्जना कानी पडत होत्या आणि तरीही त्या उच्च रवाच्या कोलाहलातही फ्रेंच जनतेचा अव्यक्त विजयोन्माद पूर्णपणे स्पष्ट होणे शक्य नव्हते. अतिशय भावविवश होऊन आणि तरीही शांत चेहऱ्याने अभिवादनासाठी हात खालीवर करीत मी पुढे जात होतो. गर्दीतील प्रत्येकाच्या नजरेला नजर मिळविण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करीत होतो. राष्ट्रीय जागृतीचा,

शतकाशतकांतून एखादाच चमकून उठणारा असा आज फ्रान्सचा अत्यंत उज्ज्वल दिवस होता.

एक विचार, एक आवाज आणि एकच उत्साह यांनी आज सारी फ्रेंच जनता भारली होती...आणि फ्रेंच एकतेच्या या अपूर्व स्फोटाच्या केंद्रस्थानी मी होतो. माझ्या वैयक्तिकतेपलीकडचे असे काहीतरी कार्य मी करतो असे मला वाटत होते. फ्रान्सच्या भाग्यपूर्तीचे साधन म्हणून मी एक अपूर्व सेवा करतो आहे असे मला वाटत होते."

## गृहकलह

परंतु, पूर्ण आणि निर्भेळ आनंद कुणालाच मिळत नसावा. विजय संचलनात हर्षोत्फुल्ल जनतेची अभिवादने स्वीकारीत असतानाच साऱ्या फ्रान्सच्या भविष्याविषयीच्या चिंता द गॉलला व्यग्र करीत होत्या. त्या वेळी तीनचारदा त्याच्यावर गोळ्या झाडण्याचे प्रयत्न झाले. पण द गॉलने त्याकडे लक्षही दिले नाही.

फ्रान्स स्वतंत्र झाले होते खरे पण युद्धातून निर्माण झालेले अनेक यक्षप्रश्न पुढे आ वासून उभे होते. अन्न, जळण, वाहने यांचा विलक्षण तुटवडा होता. काळ्या बाजाराला ऊत आला होता. फ्रान्सचे चलन फ्रँक, त्याची किंमत सारखी घसरत चालली होती. नाझी राजवटीच्या काळात जर्मनांना मिळालेल्या देशद्रोही फितुरांना शिक्षा द्यायच्या होत्या.

फितुरांना शिक्षा देणे सोपे गेले, पण आर्थिक घडी बसविणे तितके सोपे नव्हते. राजकीय क्षेत्रातही फार गोंधळ होता. जनरल चार्ल्स द गॉल व त्याच्या समवेतच्या मंडळींनी फ्रान्सचे पुनरुज्जीवन करण्याचे आश्वासन दिले होते. पॅरिसमध्ये विजयी प्रवेश केल्यानंतर पहिली गोष्ट द गॉलने कुठली केली असेल तर स्वतःच्या राजवटीविरुद्ध कुणाची चळवळ होणार नाही असा बंदोबस्त केला. सरकार तावडतोब पॅरिसमध्ये आणले.

विरोधकांच्या चळवळीत कम्युनिस्टांनी फार मोठा भाग घेतला होता. त्यामुळे त्यांचा द गॉलच्या राजकारणावर फार मोठा परिणाम पडणार होता. पण सुरुवातीला तरी कम्युनिस्टांनी जनरल द गॉलचे नेतृत्व मानून त्याच्या हाताखाली इमानेइतबारे काम केले.

द गॉलने भराभर सुधारणा घडवून आणण्यास सुरुवात केली. बँका, इन्शुअरन्स कंपन्या, वीज उत्पादन केंद्रें, जर्मनांशी ज्यांनी हातमिळवणी केली होती अशा उद्योगपतींचे धंदे यांचे त्याने एका झटक्यात राष्ट्रीयीकरण करून टाकले. फ्रान्सच्या इतिहासात स्त्रियांना त्यानेच प्रथम मताचा अधिकार दिला.

परंतु, कम्युनिस्टांच्या दृष्टीने आणखी अनेक सुधारणा हव्या होत्या. १९४५ च्या निवडणुकीत तर कम्युनिस्ट पक्षाने सर्वात जास्त जागा जिंकल्या आणि त्यांनी आपल्यासाठी युद्ध, परराष्ट्र व गृह ही तीन महत्त्वाची खाती मागून घेतली. पण

अध्यक्ष द गॉलने त्यांना चक्क नकार दिला. पण तरीही आर्थिक बाजूकडील बरीच महत्त्वाची खाती द गॉलला कम्युनिस्टांना द्यावी लागलीच.

कम्युनिस्टांबद्दल फ्रान्सला प्रथमपासूनच आदर होता. १९४४ मध्ये जनरल द गॉलने स्वतः मॉस्कोला जाऊन स्टॅलिनची भेट घेऊन एक करार केला होता. त्यामुळे तर कम्युनिस्टांकडे ही खाती असण्याबद्दल कुणाचीच तक्रार नव्हती. द गॉल निवृत्त झाल्यानंतरही १९४७ पर्यंत साऱ्याच फ्रेंच जनतेत कम्युनिस्टांबद्दल प्रेम होते. १९४७ मध्ये स्टॅलिनच्या संशयी स्वभावाचा वैताग येऊन फ्रान्स थंडचा युद्धात पाश्चात्त्यांच्या बाजूने पडेपर्यंत हे प्रेम टिकले.

पण या थंडचा युद्धाचे वारे जेव्हा १९४५ मध्येच सुरू झाले होते तेव्हापासूनच जनरल द गॉलची कम्युनिस्टांशी कुरबूर वाढू लागली. १९४५ च्या शेवटास तर द गॉलची कम्युनिस्टांशी वरचेवर भांडणे होऊ लागली. १९४४ नंतरचा युद्धाचा जोष आणि एकी गेल्यानंतर पक्षोपपक्षांच्या कुरापती, दुफळया, काळया बाजाराची चलती पुन्हा एकदा सुरू झाली. खोटे छंद वाढले, भ्रष्टाचार वाढला. आश्वासन दिलेल्या 'नवजीवनाच्या' अपेक्षेने उत्सुकलेली जनता लवकरच पूर्ववत निराश झाली. द गॉललाही वैफल्य आले आणि एकाएकी त्याने जानेवारी १९४६ मध्ये राजीनामा देऊन टाकला.

## अर्धनिवृत्ती

द गॉलला नॅशनल असेंब्लीतील पक्षोपपक्षांची भांडणे पुन्हा स्पष्ट दिसू लागली होती. सोशॅलिस्ट्स, कम्युनिस्ट्स्, रॅडीकल्स, पॉप्युलर रिपब्लिकन्स् आणि त्यांतील भेद यांच्या कारवाया उतू चालल्या होत्या. असेंब्लीमध्ये जेव्हा गणराज्याचा अध्यक्ष द गॉलवरही वैयक्तिक टीकेचे हल्ले होऊ लागले, आणि पुढे जेव्हा द गॉलच्या ध्यानात आले की आपण मांडलेले बिल असेंब्लीत अमान्यही होण्याचे दिवस लवकरच येतील, तेव्हा त्याने सत्तात्याग करण्याचे ठरवून टाकले. त्याला लादलेला पराभव नको होता.

२० जानेवारी १९४६ ला त्याने आपल्या मंत्रिमंडळाची बैठक बोलावली. सर्वांशी हस्तांदोलन केले आणि मंडळी खुर्च्यांवर स्थानापन्न होण्यापूर्वीच तो बोलला "केवळ पक्षसत्तेचे दिवस पुन्हा आले आहेत. मला ही गोष्ट खरे म्हणजे मान्य नाही. परंतु, मला दंडुक्याच्या जोरावर हुकूमशाही स्थापावयाची इच्छा नाही आणि तसे मी केले तर ती फार दिवस टिकणारही नाही. त्यामुळे तुमचे पक्षसत्तेचे प्रयोग रोखण्याचे मजजवळ काहीच साधन नाही. मला आता गेलेच पाहिजे. माझा राजीनामा मी आजच धाडीत आहे."

कम्युनिस्ट नेता थोरेझ म्हणाला, "हा खरा सत्तात्याग, थोरपणाला साजेसा."

लगेच १९४६ मध्ये फ्रान्सची नवी घटना करण्यात आली. तीत जनरल द गॉलसारख्या प्रबळ माणसाची हुकूमशाही येऊ नये म्हणून मुद्दाम तरतूद करण्यात आली.

परंतु, युद्धपूर्व काळातील फ्रेंच रिपब्लिकचे झाडून सारे दोष नवीन रिपब्लिकमध्ये उतरले. १९४६ नंतरच्या ५ वर्षांत एकूण १२ मंत्रिमंडळे गडगडली आणि एकूण १९५६ पर्यंत २० मंत्रिमंडळे अधिकार गाजवून गेली. त्यांपैकी बहुतेक मंत्रिमंडळांत परराष्ट्रमंत्री म्हणून असलेल्या बिडॉलवर तर कित्येक आंतरराष्ट्रीय परिषदांमधून त्याचे मंत्रिमंडळ गडगडल्यामुळें काम मध्येच टाकून घरी परत जाण्याचे अनेक प्रसंग आले. इंडोचीन युद्धाच्या सुरुवातीस आणि कोरिया युद्ध आणिबाणीला पोचले असताना आणि इतर कित्येक महत्त्वाच्या जागतिक घडामोडींच्या वेळी मंत्रिमंडळ गडगडल्यामुळे फ्रान्समध्ये कुठलेच सरकार अस्तित्वात नव्हते. १९४६ ते १९५६ पर्यंत सर्व मिळून एकूण २४१ दिवस फ्रान्सने सरकाररहित घालविले.

द गॉल निवृत्त झाला, तेव्हा फ्रान्सला अतिशय वाईट दिवस आले होते. नाझी राजवटीचे दिवस बरे होते, असे लोक बोलू लागले होते. किंमती भराभर वाढत होत्या. कम्युनिस्टांच्या ट्रेड युनियन्स मोठ्या प्रमाणावर ठिकठिकाणी संप घडवून आणीत होत्या. अन्नाचा रेशनिंगचा कोटा भलताच खाली आला होता.

अशा वातावरणात द गॉलने आपला रॅली ऑफ द फ्रेंच पीपल (आर. पी. एफ.) हा पक्ष राष्ट्रीय फ्रान्सचे एकीकरण घडवून आणण्याच्या हेतूने काढला. कम्युनिस्ट पक्षाला कायद्याने बंदी घालणे, कामगार संघटनांचे अधिकार कमी करणे आणि पक्षसत्तेचे दुर्बळ राजकारण नाहीसे करण्यासाठी प्रबळ अध्यक्ष असणारी घटना निर्माण करणे असा कार्यक्रम या पक्षातर्फे जाहीर करण्यात आला. राष्ट्रीय निवडणुका त्या वेळी चार वर्षांनंतर होणार होत्या; पण लगेच १९४७ साली झालेल्या म्युनिसिपल निवडणुकांमध्ये या पक्षाने प्रचंड विजय मिळविला, द. गॉलची हुकूमशाहा होण्याची महत्त्वाकांक्षा असती तर या निवडणुकांमुळे ते त्याला सहज शक्य झाले असते. बऱ्याच निरीक्षकांना या वेळी फ्रान्समध्ये नागरी युद्ध जुंपते की काय अशी भीती वाटत होती. परंतु तसे काही झाले नाही.

गॉलिस्ट पक्ष जसा अचानक फोफावला तसाच तो सुकूनही गेला. १९४७ मध्ये अमेरिकन गोटात फ्रान्स गेल्याने अमेरिकेची मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत मिळू लागली; कम्युनिस्टांपासूनचा धोका कमी होऊ लागला, मंत्रिमंडळे गडगडत राहिली तरी अर्थव्यवस्था हळूहळू सावरली जाऊ लागली. द गॉलचे तेवढे आकर्षण आता फ्रेंच जनतेला वाटणे कमी झाले. फ्रान्सच्या वैभवाच्या व मोठेपणाच्या त्याच्या निष्ठा तर काहींना हास्यास्पदही वाटू लागल्या आणि हां हां म्हणता १९५३ पर्यंत त्याचा पक्ष पार लयाला गेला. द गॉलचा फ्रेंच जनतेला विसर पडू लागल्यासारखे झाले होते.

पण द गॉलला मात्र आपण संपलो असे वाटत नव्हते. तो अर्धनिवृत्तीत होता. राष्ट्राला आपली गरज आहे आणि केव्हाना केव्हा तरी फ्रान्स आपणास साद घालून बोलावून घेईलच असे त्याला मनापासून वाटत वाटत होते. आपण फ्रान्सचे

स्वाभाविक नेते आहोत आणि फ्रान्सला पुनरुज्जीवन देण्याची महान जबाबदारी आपणावर केव्हातरी पडणारच अशी त्याची मनोमन श्रद्धा होती.

आणि तो दिवस दूर नव्हता. फ्रान्सला खरोखरच पुनरुज्जीवन प्राप्त करून घेण्याची गरज निर्माण झाली होती. पश्चिम युरोपांतील रशियाविरुद्ध उभारण्यात येत असलेल्या लष्करी आघाडीत फ्रान्सला भाग घ्यावा लागला होता. जनरल द गॉलला एकीकरण झालेली युरोपियन सेना नको होती. पण पाश्चात्य गटात करारानें स्वतंत्र आणि समर्थ अशी सामील झालेली फ्रेंच सेना त्याला हवी होती. एकजीव युरोपियन सैन्याची कल्पना मागे पडली ती द गॉलच्या अर्धनिवृत्तीमधील आग्रहामुळेच. पण तरीही पुढे नाटोसारख्या संघटनेत फ्रान्सला सामील होऊन ज्या जर्मनीनें तीनदा फ्रान्सवर पाशवी आक्रमण केले, त्या पश्चिम जर्मनीशी हातमिळवणी करावीच लागली.

वसाहतींच्या कारभारातही फ्रान्सची सपशेल घसरगुंडीच होत होती. ब्रिटनने काळाची पावले ओळखून भारत, ब्रह्मदेश, सिलोन, पाकिस्तान अशा राष्ट्रांना भराभर स्वातंत्र्य देऊन आपले साम्राज्य कमी करण्यास सुरुवात केली होती; पण फ्रान्सने दुराग्रह सोडला नाही. त्यामुळे व्हिएटनाममध्ये त्यांना सपशेल हार खावी लागून फार मोठी नामुष्की सहन करावी लागली. मोरोक्को, ट्युनिशिया येथील राष्ट्रीय चळवळींचा अर्थ ओळखून शांततेने त्यांना स्वातंत्र्य बहाल करावयाचे सोडून फ्रेंच राज्यकर्ते आपल्या साम्राज्याच्या कल्पनांना चिकटून राहिले आणि शेवटी त्यांना जबरदस्तीने या वसाहतींना पूर्ण स्वराज्य द्यावेच लागले.

**अल्जिरिया......**

परंतु, फ्रान्सच्या पक्षीय राज्यकर्त्यांना जेरीला आणून त्यांना जनरल द गॉलच्या पायांशी लोळण घेत पाठविले ते अल्जिरियाच्या प्रश्नाने. १९५५ पासून अल्जिरियात असलेल्या फ्रेंच सैनिकांना वसाहत वाचविण्यासाठी स्थानिक मुस्लिमांशी नागरी युद्धाने सामना द्यावा लागत होता. द गॉलच्या मताने अल्जिरिया हे फ्रान्सच्या गळ्यातील लोढणे होते. अल्जिरियाच्या प्रश्नावर फ्रान्सला जगात मोठ्ठीच नामुष्की सहन करावी लागत होती. परंतु तरीही फ्रेंच राज्यकर्ते आणि जनता अल्जिरिया सोडायला तयार नव्हते. सीरिया, इंडोचीन, ट्युनिशिया, मोरोक्को, सुएझ या प्रत्येक वसाहतीत फ्रान्सला पराभव सहन करावा लागला होता. त्यामुळे आता अल्जिरियात तरी आपले मूळ सोडायचेच नाही अशा निकरावर फ्रान्स आले होते.

फ्रेंच राजकारण्यांची राज्य चालविण्याची असमर्थता अल्जिरिया प्रश्नात अधिकच प्रकर्षाने दिसून आली. अल्जिरियात वसाहत करणाऱ्या गोऱ्या फ्रेंचांना आणि सैन्याला अल्जिरिया फ्रान्सच्या बाहेर नको होता. गोऱ्यांचे स्थानिक मुस्लिम आफ्रिकनांशी हाडवैर झाले होते. त्यांच्यांत आपापसांत मारामाऱ्या सुरू झाल्या

होत्या. लष्करी आणि उजवे गट यांनी फ्रेंच सत्ता अल्जिरियात शाबूत ठेवण्यासाठी कुठल्याही प्रयत्नांत कसूर करायची नाही असा निश्चयच केल्याने अत्याचारांना ऊत आला होता तरी अल्जिरियन राष्ट्रीय चळवळ दबत नव्हती.

अल्जिरियातील हा संघर्ष व वैफल्य लवकरच फ्रान्समध्येही पसरले. गटागटांतील संघर्ष, मंत्रिमंडळांची अनिश्चितता, पोलिसांचा बेभरवसा सारे शिगेला पोचले होते. अराजकतेच्या गर्तेकडे फ्रान्स वेगाने गडगडत चालल्याचे स्पष्ट दिसत होते. परंतु, या सर्वांत समाधानाची गोष्ट म्हणजे फ्रान्सची आर्थिक सुबत्ता विलक्षण वाढली होती.

आणि १९५८ साली क्रांतीची ठिणगी पडली. फ्रेंच मंत्रिमंडळ अल्जिरियन बंडखोरांशी स्वातंत्र्याचा करार करण्याच्या बेतात आहे अशी चिन्हे अल्जिरियातील गोऱ्या फ्रेंचांना आणि लष्कराला दिसू लागली होती. अचानक अल्जीयर्समधील गोऱ्यांनी एके दिवशी फ्रेंच सरकारच्या विरोधात निदर्शने सुरू केली. निदर्शनांचे रूपांतर दंगलीत आणि दंगलीचे बंडात झाले. फ्रेंच लष्कर प्रथम संभ्रमात पडले. बंड दडपून टाकण्याचा लष्कराने प्रयत्न तर केला नाहीच, पण एक-दोन दिवसांच्या अवधीतच लष्कराने आपली सारी शक्ती फ्रेंच क्रांतिकारकांच्या बाजूने लावली.

झाले. त्यानंतर ही क्रांती फार काळ टिकलीच नाही. अल्जिरियन फ्रेंच जनरल सलाम याने पॅरिसला फोन करून मंत्रिमंडळाला सरळ बजावले, " जनरल द गॉलला सत्तेवर परत बोलवा. " स्वत:च्याच अधिकाराची पूर्ण खात्री नसलेल्या दुर्बळ फ्रेंच मंत्रिमंडळाला लष्कराची ही मागणी मान्य करण्यावाचून गत्यंतर नव्हते.

**बोलावणे.....**

' अर्धनिवृत्तीत ' वेळ घालविणारा जनरल चार्ल्स द गॉल याच क्षणाची वाट पाहात होता. अगदी काही महिन्यांपूर्वीच त्याने जाहीरपणे सांगितले होते की, " लवकरच मला राष्ट्राचे बोलावणे येईल अशी खात्री आहे. खरे म्हणजे ही हाक मागच्या वर्षीच यायला हवी होती. " त्यामुळे फ्रेंच पुढाऱ्यांचा ताफा मे १९, १९५८ रोजी जनरल द गॉलला भेटायला गेला तेव्हा तो म्हणाला,

" माझ्या मायभूमीच्या सेवेसाठी मी केव्हाही तयार आहे. "

आणि जनरल द गॉल या वेळी सर्वांनाच हवा होता. त्याचे जुने विरोधक सोशॅलिस्ट यांनाही त्याशिवाय दुसरे कुणी सत्तेवर यायला नको होते. अल्जिरियातील लष्कराला तो हवा होता. कारण, राजकारण्यांची लुडबूड बंद पाडून अल्जिरियन लढा जिंकण्याची तो कसोशीने खटपट करील असे लष्कराला वाटत होते. फ्रान्समधील राजकारण्यांनाही तोच हवा होता. कारण क्रांतिकारी लष्कराला लगाम घालण्याचे सामर्थ्य त्याच्याच अंगी असल्याचे त्यांना वाटत होते. जवळ जवळ सर्वांनाच आणि परस्परविरोधी कारणांसाठी जनरल द गॉलच सत्तेवर हवा होता. या वेळी, द गॉलवर खरोखरच नेतृत्व लादण्यात आले होते. मुख्य म्हणजे त्याने स्वत: क्रांतीत कुठलाच भाग घेतला नव्हता. त्यामुळे तर त्याचे महत्त्व फारच वाढले.

द गॉल महत्त्वाकांक्षी असला तरी त्याने आपल्या पायी चालून आलेल्या या लोकविलक्षण संधीचा दुरुपयोग मुळीच केला नाही. शुद्ध हुकूमशाहीचा त्याला तिटकारा होता आणि लोकशाही मुळाची राज्यपद्धती त्याला हवी होती. पूर्वीप्रमाणेच पक्षोपपक्षांच्या संघर्षाच्या भोवऱ्यात सतत गटांगळ्या खात राहणारे गणराज्यही त्याला नको होते. त्यामुळे त्याने स्वतःला काही खास अधिकारही मागून घेतले.

द गॉल कायद्याने सत्तेवर आला आणि त्याने आतापर्यंत बहुशः कायद्यानेच राज्य केले. फ्रान्सच्या सर्व गटांनी त्याची अपरिहार्यपणे एकमुखी निवड केली असल्याने आता तो म्हणेल ती फ्रान्सची पूर्वदिशा होणार होती. सत्तेवर येताच त्याने एक नवी घटना तयार करून तीत अध्यक्ष व त्याचे सरकार यांना जादा अधिकार देऊन लोकसभेला फार निकृष्ट अधिकार दिले. त्याने स्वतःला तर काही मर्यादित काळातही जवळजवळ सर्वाधिकार मागून घेतले होते. पण इतके असूनही जनरल द गॉल एक सर्वंकष हुकूमशाह बनेल ही निरीक्षकांची भीती खोटी ठरली. आणि लोकशाहीचा शत्रू म्हणून ज्याच्याविषयी प्रथम प्रचार झाला तो द गॉल शेवटी फ्रेंच लोकशाहीचा त्राता म्हणून गौरविला जाऊ लागला.

जनरल द गॉलने केलेली घटना फ्रेंच जनतेने प्रचंड बहुमताने मान्य केल्यावर त्याला चार महिन्यांसाठी सर्वाधिकार देण्यात आले. या चार महिन्यांच्या काळात त्याने ३०० कायदे आणि नियम काढून फ्रेंच जीवनाच्या बहुतेक कोपऱ्यात हात घालून अनेक सुधारणा घडवून आणल्या. याच कालावधीत त्याच्या मंत्र्यांनी फ्रँकचे साडेसतरा टक्क्यांनी अवमूल्यन करून किंमती स्थिर केल्या. अर्थव्यवस्था सुधारली आणि युरोपियन कॉमन मार्केटमध्ये स्पर्धा करण्याची पात्रता फ्रान्समध्ये आणली. " आता फ्रान्सचे होणार तरी कसे ? " असे चितायुक्त सुस्कारे टाकून फ्रान्समध्ये कधी अराजक माजते या अपेक्षेने फ्रान्सकडे नजर लावून बसलेल्या ब्रिटन व इतर युरोपियन राष्ट्रांना तर जनरल द गॉलच्या या किमयेने पार चकित करून टाकले.

**फ्रान्सची उभारणी**

युरोपियन व आंतरराष्ट्रीय राजकारणांतही जनरल चार्ल्स द गॉलने आपले वैशिष्ट्य, आपला आग्रह आणि आपले व्यक्तिमत्त्व कायम राखले. सर्वांना शिखर परिषद हवी होती. जनरल द गॉलचा त्याला सक्त विरोध होता. बर्लिन प्रश्नाबाबत विचारविनिमय करण्यास सर्व गट तयार होते पण द गॉल मौन पाळून होता. अणुचाचणी बंदीच्या करारावर सारी राष्ट्रे सह्या करीत होती, तेव्हाच आफ्रिकन राष्ट्रांच्या आरडाओरडयास न जुमानता त्याने सहारामध्ये फ्रेंच अणुगोंबचा स्फोट केला. नाटो या लष्करी संघटनेशी फ्रान्स बांधले गेले होते तरी त्याने आपले नाटोशी नाते अतिशय थंड ठेवले. संयुक्त राष्ट्रसंघाविषयीचा आपला तिरस्कार तर तो लपवीतही नव्हता. फ्रान्सचे गतवैभव पुनरुज्जीवित करणे, फ्रान्सच्या सामर्थ्याची जगाला जाणीव करून देणे ही त्याची जुनीच उद्दिष्टे कायम होती

आणि त्यासाठी व राष्ट्रहितासाठी त्याची सारी धडपड चालू होती. फ्रान्सला दुय्यमत्व येईल अशा कुठल्याही युरोपियन संघराज्याच्या योजनेवर त्याचा विश्वास नव्हता. पश्चिम जर्मनीशी त्याने मैत्री करून युरोपियन कॉमन मार्केटमध्ये फ्रान्सचे ज्या ज्या तऱ्हेने हित करता येईल ते ते प्रयत्न केले. ब्रिटनला जर कॉमन मार्केटमध्ये यायचे असेल तर फ्रान्सच्या हितसंबंधांच्या आड येणार नाही अशा फ्रान्स घालील त्या अटींवरच यावे लागेल असा त्याने आग्रह धरला. एका बाजूला नाझी आणि कम्युनिस्टांशी व दुसऱ्या बाजूला फ्रान्सला प्रथम दर्जाचे राष्ट्र मानायला तयार नसलेल्या अँग्लो–अमेरिकनांशी असा दोन्ही बाजूंना द गॉलने आपला लढा सुरू केला.

फ्रेंच वसाहतींच्या धोरणात द गॉलने मोठीच कल्पकता दाखविली. फ्रेंच राज्यातील साऱ्या वसाहतींना फ्रेंच राज्यातून ताबडतोब फुटून निघण्याचे किंवा राज्यातच राहण्याची मोकळीक त्याने दिली. फक्त गिनी फुटून निघाले.

अल्जिरियाच्या प्रश्नाला तर त्याने मोठ्या मुत्सद्देगिरीने हात घातला. अल्जिरियावर त्याने अशी काही संदिग्ध वक्तव्ये करण्यास सुरुवात केली की, दोन्ही विरोधी गटांना तो आपल्याच बाजूने बोलतो आहे असे वाटे. परंतु, ५–६ महिने निघून गेले तरी अल्जिरियात फ्रेंच विजयाची चिन्हे दृगोचर होईनात तेव्हा लष्कराला आणि वसाहतवाद्यांना शंका येऊ लागली. अल्जिरियन मुस्लिमांना त्याने शांततेची आवाहने करण्यास सुरुवात केली. अल्जिरियातील वर्णभेद आणि दारिद्र्य यांवरही त्याने कडाडून हल्ला चढविला. क्रांतिकारकांचा नेता जनरल सलान याला त्याने हळूच अल्जियर्सपासून दूर केले आणि लष्कराची साफसफाई करण्यास सुरुवात केली. दहशतवाद्यांना मृत्यूच्या शिक्षा ठोठावल्या आणि अल्जिरियातील बंडखोरांशी बोलणी करण्याविषयी तो उघड बोलू लागला आणि शेवटी हळूच अल्जिरियनांच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काला त्याने मान्यताही देऊन टाकली.

लष्कर आणि उजव्या गटाच्या तोंडचे यामुळे पाणीच पळाले. ज्या कारणासाठी त्यांनी क्रांती घडवून द गॉलला सत्तेवर आणले होते त्यालाच द गॉलने त्यांच्या अपेक्षेविरुद्ध सुरुंग लावला होता. त्यामुळे जानेवारी १९६० मध्ये अल्जिरियात आणखी एक क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न झाला.

परंतु, द गॉल हटला नाही. त्याने फ्रेंच नभोवाणीवरून लष्कराला उद्देशून भावनात्मक, परंतु तर्कशुद्ध असे एकच आवाहन केले आणि क्रांती कोसळून पडली. १९६१ च्या एप्रिलमध्येही द गॉलच्याविरुद्ध लष्करी कट करण्याचा काही जनरल्सनी प्रयत्न केला. पण सैन्याने त्या बाबतीत पाठिंबाच न दिल्याने तोही फसला.

दुसऱ्याच महिन्यात शांततेची बोलणी सुरू झाली. "इतिहास ओळखून आपण अल्जिरियाच्या बाबतीत बोलणी केलीच पाहिजेत" अशी घोषणाच द गॉलने दिली. बोलणी करण्यास जनरल द गॉल स्वत:चा जीव धोक्यात घालून अल्जीयर्सला

आला. तेव्हा अल्जिरियात सर्वत्र गोऱ्यांची व मुस्लिमांची दंगल माजून सर्रास खून पडत होते. आणि ज्या जनरल सलानने लष्करी क्रांती करून जनरल द गॉलला सत्तेवर बोलाविले होते, त्याच्याच अनुयायांनी द गॉलला ठार करण्याचे अयशस्वी प्रयत्नही केले. सलानला अटक झाली. त्याची मृत्यूची शिक्षा थोडक्यात हुकली. लाखो भीतिग्रस्त गोऱ्या अल्जिरियनांनी फ्रान्समध्ये स्थलांतर केले आणि शेवटी अल्जिरिया स्वतंत्र झाला. या अल्जिरियन आणिबाणीच्या काळात जनरल द गॉलला जिवावरच्या अनेक संकटांना आणि वृत्तपत्रे व राजकारण्यांच्या कठोर टीकेला खंबीरपणे तोंड द्यावे लागले. तावून निघालेल्या सोन्याप्रमाणे द गॉलचे मोल फ्रान्स-मध्ये अधिकच वाढले, पण त्याचबरोबर त्याचे शत्रूही वाढले.

आता त्याने आपल्या युरोपविषयीच्या कल्पनांना आकार देण्यास सुरुवात केली. १९६२ मध्ये त्याने पश्चिम जर्मनीला भेट दिली. युरोपियन संघराज्याच्या कल्प-नांचा त्याने सतत उपरोध केला. त्याच्या मते फ्रान्स युरोपात सामील होणे शक्यच नव्हते. उलट ऐतिहासिक फ्रान्सच्या अवतीभवतीच युरोप बांधायला हवा असे त्याचे मत होते.

१९६३ मध्ये फ्रँको–जर्मन तहावर सही करून द गॉलने पश्चिम जर्मनीशी आपले संबंध कायम करून टाकले. परंतु, त्याच वेळी युरोपियन कॉमन मार्केटमध्ये ब्रिटनच्या प्रवेशाच्या अर्जावर नकाराधिकार वापरून ब्रिटनला सपशेल तोंडघशी पाडले. एकदा ब्रिटनने कॉमन मार्केटमध्ये प्रवेश केला की ब्रिटन त्याचे मुक्त बाजारात रूपांतर करण्याची संधी साधील व त्यामुळे फ्रान्सच्या व्यापारावर अनिष्ट परिणाम होईल असे द गॉलला वाटते. शिवाय, एकदा ब्रिटन आत घुसले की, आपल्याबरोबर अमे-रिकनांचेहि वजन आणील असेही त्याला वाटते.

ब्रिटनने अणुशस्त्रांच्या बाबतीत अमेरिकेचे अवलंबन अगोदरच पत्करले आहे. तसेही अवलंबन द गॉलला नको आहे. फ्रान्सजवळ फ्रेंच अण्वस्त्रेच असावीत. उधार आणलेली नकोत आणि युरोप युरोपियनच राहावे त्यावर अँग्लो–अमेरिकनांचा प्रभाव नको असे द गॉलला सतत वाटते व त्यासाठी त्याचे प्रयत्न चालू असतात.

द गॉलच्या प्रयत्नांनी फ्रान्सच्या परराष्ट्रीय धोरणाची आता साऱ्या जगात दखल घ्यावी लागत आहे. मेक्सिको आणि लॅटिन अमेरिकेत नुकतेच त्याने केलेले दौरे, रशिया आणि इतर कम्युनिस्ट राष्ट्रांशी त्याने केलेले आर्थिक करार कम्युनिस्ट चीनला त्याने दिलेली मान्यता आणि भूतपूर्व फ्रेंच वसाहतींना त्याने दिलेली भर-पूर आर्थिक मदत यांमुळे जागतिक राजकारणात द गॉलची प्रतिष्ठा भलतीच वाढली आहे.

त्याच्या सात वर्षांच्या अध्यक्षपदाच्या काळात फ्रान्सची सुवत्ताही बरीच वाढली. या काळात फ्रान्सचे राष्ट्रीय आणि सरासरी उत्पन्न २५ टक्क्यांनी वाढले आहे.

१९६२ मध्ये द गॉलने फ्रेंच घटनेत एक महत्त्वाचा बदल घडवून आणला. त्या-

नुसार फ्रेंच गणराज्याचा अध्यक्ष काही निवडक लोकांनी निवडावयाच्या ऐवजी साऱ्या फ्रेंच जनतेच्या मतावर निवडून यावयाचा असतो. त्यामुळे लोकमतांच्या बळावर हुकूमशाही स्थापण्याचा आरोप जनरल द गॉलचे अनेक टीकाकार त्याच्यावर करीत असले तरी अशा प्रकारची राज्यव्यवस्थाच फ्रान्सला योग्य आहे, असे आता सर्वांचे मत बनत आहे.

जनरल चार्ल्स द गॉलची प्रतिष्ठा वाढावी किंवा त्याला अजूनही मान मिळतो तो भविष्यातील हालचाली अचूक हेरून दूरदृष्टीने धोरण आखण्याच्या त्याच्या गुणांमुळे त्याची दूरदृष्टी आश्चर्यकारक आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या आधी त्यानेच सैन्याच्या यांत्रिकीकरणाचा सल्ला दिला होता आणि त्याच्याच कल्पनांच्या आधारावर हिटलरच्या चिलखती पॅन्झर डिव्हिजन्स तयार झाल्या होत्या.

१९४६ साली फ्रान्समधील पक्षीय भांडणांना ऊत आला होता, तेव्हा द गॉलनेच सांगितले की, शासनाचे स्थैर्य टिकविण्यासाठी अधिक सत्ता हाती असलेला असा प्रबळ शासकच फ्रान्सला हवा. तेच पुढे खरे ठरले.

आणखी सात वर्षे द गॉल फ्रान्सच्या सत्तास्थानी आहे. तो जोवर आहे, तोवर फ्रेंचांना आपल्या राजकीय स्थैर्याची निश्चिती आहे. पण तो गेल्यानंतर पुढे फ्रान्सचे काय, हा प्रश्नच आहे. द गॉल म्हणतो, प्रश्न अगदी साधा आहे. मी गेल्यावर फ्रान्सने आणखी एक द गॉल शोधावा.

• • •


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

# जगातील दहा

*सर्वश्रेष्ठ कलाकृती कोणत्या ?*
*सर्वश्रेष्ठ कथाकार कोणते ?*

## *मॉमची निवड*

**टॉलस्टॉय :** वॉर अँड पीस, **बाल्झॅक :** ओल्ड मॅन गोरिओत, **जेन ऑस्टेन :** प्राइड अँड प्रेज्युडिस्, **फ्लॉबर्त :** मदाम बोव्हारी, **एमिली ब्राँटे :** वूदरिंग हाइटस्, **हेन्री फील्डिंग :** टॉम जोन्स, **चार्ल्स डिकन्स :** डेव्हिड कॉपरफील्ड, **दोस्तोवस्की :** ब्रदर्स कारामाझाव, **स्तेंधाल :** दि रेड अँड दि ब्लॅक, **हर्मान मेलव्हिल :** मॉबी डिक.

चालू शतकातील श्रेष्ठ कादंबरीकार सॉमरसेट मॉम यांनी जागतिक वाङमयातील या दहा कलाकृतींची 'सर्वश्रेष्ठ' म्हणून निवड केलेली आहे व त्यांवर सरस भाष्ये लिहिली आहेत.

ही भाष्ये लिहिताना मॉमने या थोर कलाकारांच्या चरित्र-चारित्र्याची पार्श्वभूमीही मोठ्या विचक्षण रसिकतेने रेखाटली आहे.

मॉमच्या पारदर्शक प्रतिभेने चित्रित केलेली ही चरित्र-भाष्ये मनस्वी चित्तवेधक व विचारप्रवर्तक आहेत. चरित्र आणि साहित्य यांजमधील परस्पर संबंधांवर आधारलेली मॉमची ही ललितभाष्ये जागतिक वाङमयात अपूर्व ठरली आहेत.

**या पैकी टॉलस्टॉय व त्याच्या 'वॉर अॅण्ड पीस' या कादंबरीवरील मॉमचे भाष्य 'माणूस'मध्ये लवकरच प्रसिद्ध होत आहे.**

अनुवादक : प्रा. माधव मनोहर

कथा

# रामचंद्र फाटक

## भिडू

कसलातरी जोरात आवाज झाला, त्याबरोबर हातातला पेपर टाकून मी ताड-कन् व्हरांड्यात उभा राहिलो. आमच्या घरासमोरचा रस्ता फारसा रहदारीचा नाही. दगडाच्या खाणीकडून येणारे ट्रक आणि इतर बंगल्यांतली थोडीफार वाहतूक यांशिवाय दुसरा आवाज येतच नसे. त्यामुळे हा आवाज चांगलाच जाणवला. बाहेरचे गेट उघडून मी रस्त्यावर गेलो. ' बेगर्स होम 'ची पांढऱ्या रंगाची गाडी झाडाला थडकून एका अंगावर कलंडली होती. माझ्या मागोमाग घरातला माळी धावत बाहेर आला. आम्ही एकमेकांकडे नुसते पाहिले आणि पुढे झालो. गाडीचा पुढचा भाग पार चिंबून गेला होता. मागच्या दारातून एक म्हातारी भिकारीण अर्धवट आत अर्धवट बाहेर अशी लोंबकळत होती. तिच्या पायाखाली ७–८ वर्षांचा एक अर्धनग्न मुलगा पालथा पडला होता. अंगावर रक्त पसरलं होतं अन् त्याच्या शेजारी एक घट्टाकट्टा भिकारी कण्हत होता. जरा स्वच्छ वाटला म्हणून मी त्याच्याकडे गेलो. माळ्याने मुलाला धरले. त्या भिकाऱ्याची मी मान उचलली. डोक्यावरून रक्ताचा ओघळ वाहत होता. खाकी फाटका कोट अन् निळ्या तांबड्या रंगाची लुंगी. काना-भोवती टापशीसारखं एक फडकं गुंडाळलेलं होतं. वरचे केस वाळलेल्या खुरट्या गवतासारखे होते. फडकं रक्तानं माखलं होतं. तोंड उघडून तो काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करीत होता. काळ्याभोर बोटभर वाढलेल्या दाढीतून त्याचे दात मात्र कमालीचे स्वच्छ वाटले. काळ्याकुट्ट अंधारातून प्रकाशाची तिरीप दिसावी तसे. हळू-हळू त्यानं आपला हात फाटक्या कोटाच्या खिशात घातला अन् अर्धवट माझ्याकडे पाहात हाताची मूठ पुढं केली. कुतूहलानं मी हात पुढं केला माझ्या हातावर थोडी जड वस्तू ठेवली. अन् चमकलो. सोन्याचं लॉकेट होतं ते. मी पाहतच राहिलो. तेवढ्यात ट्रक येऊन थांबली. पटापट माणसे बाहेर पडली. बेगर्स होमची ॲम्ब्युलन्सही खणखणत आली. मी चटकन् उठलो अन लॉकेट खिशात टाकलं. धान्याची पोती

उचलावी तसं अॅम्ब्युलन्सची माणसं एकेकाला उचलून आत टाकत होती. उबग आली मला. माणसंच आहेत ती पण भिकारी...

काही न बोलता मी आत आलो. माळ्यानं पाण्याचा पाईप हात धुण्यासाठी धरला. मी रक्त धुवत होतो.

" नरसूच आहे साहेब...ड्रायव्हर " माळी.

" हं. " मी काहीच बोललो नाही.

" मी मागंच सांगितलं व्हतं साहेब. दारूच्या नशेत हे भंगड आपण मरणार अन् दुसऱ्यालावी मारणार. " त्याचं बोलणं चालूच होतं. मला काहीच सुचत नव्हत. मी चालू लागलो.

" साहेबऽ" मी थोडा थांबलो.

" काय रे ? "

हातातला पाईप हलवीत तो खाली पाहू लागला.

" काय म्हणतोस ? " मी पुन्हा विचारलं.

" काय न्हाई साहेब " अन् त्यानं तोंड वळवलं. मी पण जास्त खोदून विचारलं नाही.

खुर्चीत बसून मी ते लॉकेट खिशातून काढलं. तोळ्या-दीड तोळ्याचं तरी असावं. मध्यभागी ढबू पैशाएवढा गोल होता त्यावर तांबड्या रंगाचं स्वस्तिक होतं. मला देण्यात त्याचा काय हेतू असावा ? काहीच कळेना. चोरून आणलं का ?...

माझ्या बंगल्याला लागूनच बेगर्स होमचं मोठं आवार होतं. भिंत समाईकच होती म्हणा ना. गॅलरीइतकी तरी ती उंच होतीच. गॅलरीत उभं राहिलं की, सगळं आवार स्पष्ट दिसायचं. उजव्या बाजूला पांढरा चुन्याचा रंग दिलेली लांबलचक इमारत होती. त्याला काटकोनातच निरनिराळी व्यवसायकेंद्रे होती. इतक्या लांबवर नजर पोहोचतच नसे. या सबंध मोठ्या आवाराचे मधल्या जाड

***" मोठ्यांत बी भिकारी असत्यालच की साहेब. सापडलो तर आम्ही. मोठा साहेब मात्र सुसाट मोकळा ...."***

***भिडूनं हे ऐकवून माझ्या ज्ञानाचा एक दरवाजा खुला केला ...***

काटेरी उंच कुंपणानं दोन भाग केले होते. डाव्या हाताला स्त्री-विभाग होता. उजव्या बाजूला पुरुष विभाग होता. दोन्ही बाजूंना अर्धी अर्धी येईल अशी पिवळ्या रंगाची एक दुमजली मोठी इमारत सुपरिटेंडेंट व दवाखाना यांना दिली होती. गॅलरीत उभं राहण्याचा माझा चाळाच झाला होता. राखाडी रंगाचे कपडे घातलेले भिकारी काम करत. मध्येच भांडत. गाणी म्हणत. गम्मत जम्मत वाटे पाहावयास. पण आज दोन–तीन दिवस माझी नजर एकाच व्यक्तीला शोधत होती. अन् ती दिसत नव्हती. बागेत खुर्च्या टाकून सुपरिटेंडेंट २–४ लोकांशी गप्पा मारताना दिसत होता. एक इसम पोलिसांपैकी वाटत होता.

एक दिवस पत्नीबरोबर मी गॅलरीत उभा होतो. लांबवर मला तो दिसला. बहुतेक तोच असावा. कारण त्याच्या डोक्याला पांढऱ्या रंगाचं बँडेज बांधलं होतं. मी हात वर केला. पत्नीनं प्रश्नार्थक नजरेनं माझ्याकडे पाहिलं. मी काहीच बोललो नाही. त्याला माझी खूण कळली असावी. डुलत डुलत तो भिंतीजवळ आला. एका हातात खुरपं अन् दुसऱ्या हातात तारेचा पंजा होता. गुळगुळीत दाढी केल्यामुळं त्याचा चेहरा स्वच्छ पाटीसारखा दिसत होता. वर पाहून तो हसला. काळ्या पाटीवर खडूनं रेघ ओढल्यासारखं वाटलं मला.

" काय रे, बरं आहे का आता ?"

" व्हय साहेब, पन् ती म्हातारी खलास, पोराचा हात उसाच्या कांडक्या गत मोडला बघा. " मान हलवीत तो सांगत होता " अन् साहेब, नरश्या तर जागल्या जागीच खतम् झाला. "

माझ्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरं त्यानं एकदम दिली होती. काहीतरी विचारायचं म्हणून मी विचारलं,

" नाव काय तुझं ? "

" भिडूच म्हनत्यात समदेजन " पुन्हा मुंडी हालली.

" काम काय दिलं तुला ? "

" ह्येच आपलं, झाडं लावा, जमीन उकरा. दुसरं काय येनार साहेब आम्हास्नी." हातातल्या खुरप्याची चाळवाचाळव चालू होतीच.

" साहेब काय म्हणाले रे ? " पत्नी आळीपाळीनं आमच्याकडे बघत होती.

" सुपरी व्हय ?_त्येला काय वो मेली तर मेली. मागचा खकाटा तर कमी झाला. दुसरं काय ? " सुपरी याच नावानं सुपरिटेंडेंटला सर्व भिकारी ओळखत असत. मला आणि पत्नीला हे माहीत होतं. इतकंच काय त्याच्या बायकोलासुद्धा सुपरीबाई याच नावानं ओळखलं जात होतं. सुपरीबाईकडे गॅस आणला, गोदरेज कपाट आणलं; फ्रीझ आणला. असं पत्नीच नेहमी सांगत असे. उंच हडकुळ्या काळ्या काडीचा चष्मा लावणाऱ्या ढगळ मॅनिला घालणाऱ्या त्या गृहस्थाच्या चेहऱ्यावर मात्र सुपरीचं तेज मात्र नव्हतं.

" साहेब..." हळूच त्यानं हाक मारली अन् क्षणभर पत्नीकडे पाहून त्यानं मान घातली अन् खुरप्याशी चाळा करू लागला.

" काय रे ? " मी पुढं झुकून विचारलं.

" काय न्हाय साहेब. पण..." मान जोरात हलवीत तो म्हणत असताना जेवणाची घंटा झाली तसं तो मानेनेच जातो म्हणून डुलत डुलत चालू लागला.

सोन्याचं पिवळं लॉकेट मला अजून टोचत होतं. पत्नीला यातलं मी काही-एक सांगितलं नव्हतं. दुसऱ्या दिवशी सकाळी मी गॅलरीत उभा होतो. लांबवर तुरळक राखी रंग फिरत होते. आणि माझं लक्ष काटेरी कुंपणाकडे गेलं. कोणा बाईबरोबर तो बोलत होता. गडद निळ्या रंगाची साडी नेसलेली काळीसावळी पण बांधेसूद वाटली मला. २०-२५ वर्षांची असावी. एक हात अन् एक पाय कुंपणावर ठेवून तो तावातावानं बोलत होता. ती खाली मान घालून उभी होती. त्याचे हातवारे चालले होते. तिनं कमरेला हात घालून काहीतरी वस्तू काढली अन् त्याच्या हातात दिली. तो एकदम दूर सरकला. नुसता आवाज चढलेला ऐकू आला. बोलणं कळलं नाही. ती वस्तू टाकून तो झपझप निघून गेला.

संध्याकाळी तो दिसल्यावर मी त्याला जवळ बोलावलं. काहीतरी सोक्षमोक्ष लावणं भाग होतं.

" त्या कोपऱ्यातल्या शेवग्याच्या झाडाखाली ये. " मी जिना उतरून चालू लागलो. शेवग्याच्या झाडापाशी १–२ विटा काढून पूर्वीपासून एक भोक पडलं होतं माझ्या बाजूनं. मी ते तारेनं बंद केलं होतं. एका हाताने झाडाला रेलून वाकून त्याच्याकडे पाहिलं. तो कुतूहलानं माझ्याकडे पाहात होता.

" भिडू."

" जी. "

" किती वेळा आलास या तुरुंगात ? "

" ४–५ येळा आलो, गेलो. " मान हलवीत तो सांगत होता.

" पण येथून बाहेर जाता येत नाही ना ? " एकदम लॉकेटबद्दल विचारणं जमलंच नाही.

" साहेब ते खरं. पण, आमी येतो काम झालं की, जातो. "

" म्हणजे ? ..."

" साहेब मोठ्या लोकास्नी बी आमची गरज लागतीच. "

" पण त्या लॉकेटचं काय करायचं ? " मी एकदम विचारलं.

" ठेवा तुमापाशीच न्हायतर घाला पोराला. "

" मी नाही वापरणार ते. कोठून आणलंस ते ! "

" मी सांगू नये. तुमीबी विचारू नये. मी खरं सांगितलं तर माझ्याशी बोलनार नाय तुमी. "

" पण कोठून आणलंस ते तर सांग. चोरीचं तर नाही ?"

" व्हय. " मान हलवीत तो म्हणाला.

" काय ?" मी चमकलो.

" व्हय साहेब, चोरीचा माल हाय त्यो पन् माझ्यासाठी नाय."

" मग ? माझ्यासाठी ?" मी चिडून ओरडलो.

" न्हाय. सुपरीसाहेबासाठी."

" ते कशाला ?"

" धंदा हाय आमचा." मी चांगलाच घोटाळ्यात पडलो. हे काहीतरी निराळंच दिसतंय.

" म्हणजे ?"

" साहेब, अजून समजंना ?" मला लहान मुलासारखा तो समजत होता.

" सुपरीसाहेबांना त्ये द्यायचं अन् कमिशन हाणायचं. धंदा हाय. मोठ्यातबी भिकारी असत्यातच की ! सापडलो तर आमी, मोठा साहेब सुसाट मोकळा. भिकारी म्हणून आमास्नी त्यो माल इकता येत नाय पण पोटासाठी करायचं."

" सुपरी चोरीचा धंदा करतो?" अजूनही मी लहान मुलासारखा प्रश्न विचारला.

" मी, नरश्या दोघं–तिघं हाय त्यात. बाहेर जायाचं माल घेऊन पुना परत यायाचं."

मी सुन्न झालो. गॅस, गोदरेज, फ्रिझ, अन् त्यातला ढगळ मॅनिल्याचा सुपरी मला समोर दिसू लागला.

" भिडू " मी खालच्या आवाजात विचारलं.

" जी......"

" माल घेऊन जा अन् दे त्या सुपरीला."

" न्हाय साहेब," जोरजोरात मान हलवीत तो बोलू लागला " त्याला न्हाय देणार. माझं मागचं पैसं बी न्हाय दिलं त्यानं. नरश्या मेला अन् मला बी सोडत न्हाय म्हणाला."

" का ?"

" घाबरलंय आता त्ये, पैशाची बी रग आलिया. बिन्नीला बी दटावतो. घरी कामाला ये म्हनतो." आपण एकदम भलतंच बोललो असं वाटून लाजून त्यानं मान खाली घातली.

" ही कोण बिन्नी ?"

" हाये अशीच " लाजत किंचित हसला.

" म्हणजे सकाळी तू भांडलास ती ?"

" व्हय ! तुमी पायलं जणू ?"

" हं ! बायको तुझी ?" मी विचारलं.

" न्हाय साहेब, आपली वळख हाय ?"

" पण, उगाच काय ?" पुन्हा मी तो विषय काढला.

" आठवण म्हणून ठेवा गरिबाची, साहेब जातो. आता गेलो न्हाय तर सुपरी बोंबलल माझ्या नावानं.

" भिडू......भिडू !" मी हाक मारल्या पण तो गेला होता. राग आला त्याचा. भिकाऱ्याची भीक माझ्याकडेच राहिली. संध्याकाळी बाजारात जाऊन लॉकेट मोडलं.

सकाळी चहा घेताना माळी पळत आला.

" साहेब–साहेब."

" काय रे ?" कप ठेवत मी विचारलं.

" त्यो–त्यो भिडू मेला साहेब."

" आँ " मी ताड्दिशी उठलो.

" खरं? "

" तर वो आताच त्याला बाहेर काढून इस्पितळात नेत्यात."

" पण झालं काय ? " मी जिना चढत त्याला विचारलं.

" काय ठाव न्हाय. पन् इख खाल्लं म्हणत्यात. माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला.

गॅलरीत उभा राहिलो. ॲम्ब्युलन्स गेटबाहेर पडत होती. सुपरी खाली मान घालून घराकडे येत होता. राखी तुकडे हालत होते. माझ्या डोळ्यांसमोर कालचा बागेत गप्पा मारणारा सुपरी आला.

दोन दिवसांनी एक मनिऑर्डर ' बेगर्स होम ' च्या नावानं पाठवली.

खालच्या स्लीपमध्ये लिहिलं,

" सत्कार्य करणाऱ्या संस्थेस अल्पशी भेट–"

अज्ञात भिडू



# ‘ राजा शिवछत्रपती ’

## मु द्र ण प्र श स्ती

राजा शिवछत्रपती–लेखक श्री. ब. मो. पुरंदरे या ग्रंथाचे नशीब काही औरच आहे.

पहिली आवृत्ती १९५९ मध्ये कसलाही गाजावाजा न होता हळूच प्रसिद्ध झाली आणि वाचकांनी ती उचलायला सुरुवात केली. या आवृत्तीची किंमत त्या वेळी रु. ३० असल्याने कोठेही ‘ अभिप्रायार्थ ’ हे शिवचरित्र न पाठविण्याचा निर्णय ‘ राजहंस प्रकाशना ’ ला नाइलाजाने घ्यावा लागला. तरी पण एक दिवस पाहतो तो आचार्य अत्रे यांनी अग्रलेखात भरघोस परामर्ष घेतलेला ‘ मराठा ’ चा अंकच पुढे आला. काही दिवस लोटले आणि असेच दिल्लीहून एका डाकेने ‘ पु. लं. ’चे लेखकाला ते ‘ सुप्रसिद्ध ’ पत्र आले. आणि त्यातूनच पु. ल.–पुरंदरे यांच्या मैत्रिपर्वाला आरंभ झाला. एव्हाना चरित्रग्रंथाची पहिली मोठी आवृत्ती संपून दुसरी रु. १६ किंमतीची स्वस्त आवृत्तीही हातावेगळी होत आली होती व पुन्हा तिसरी सचित्र आवृत्ती काढण्याचे विचार सुरू झाले होते. (महाराष्ट्र शासनाचे चरित्र विभागाचे पहिले पारितोषिक या ग्रंथाला लाभले हाही असाच एक बहुमान )

पैशाची तंगी नेहमीप्रमाणेच होती. परंतु पैशाशिवाय काम अडत नाही हा अनुभवही गाठीशी होता. तिसऱ्या आवृत्तीच्या छपाईला पुण्याच्या ‘ आनंद मुद्रणालया ’त सुरुवात झाली. मुद्रक हौशी, प्रकाशक लहरी-

काम सुरू होते. फक्त पुढे सरकत नव्हते एवढेच. कागदाच्या निवडीसाठी प्रकाशकाबरोबरच मुद्रक मुंबईतील बड्या बड्या कागद व्यापाऱ्यांच्या दुकानातून नमुने पाहात हिंडत असतो का ? नमुना पसंत पडल्यावर (त्यावर छपाईचे काम करून पाहिल्यानंतर) व्यापाऱ्याशी भावाशी घासाघीस मुद्रक करील का ? पण श्री. दादा जोशी यांनी हे सगळे केले ते शिवचरित्राच्या प्रेमापोटी. आता छपाई चालू असताना खटके हे उडतातच. 'उशीर' हा मुद्रण व्यवसायाचा निदान आपल्याकडे तरी स्थायीभावच असल्याने तो याही वेळी अनुभवास आला यात विशेष ते काय ? 'कॉपी नाही' ही दादा जोशींची ओरड आणि 'दुसरीच कामे चालू आहेत, उगीच कॉपीच्या नावाने ओरड चालविली आहे. कॉप्यांची चवडच्या चवड त्यांचे जवळ शिल्लक आहे' ही पुरंदऱ्यांची तक्रार ग्रंथाची छपाई संपली तरी चालूच राहिली. पण शेवटी नेहमीच्या प्रथेनुसार घाईगडबडीत छपाई एकदा आटोपली व मोठ्या मुश्किलीने मुंबईच्या प्रकाशन समारंभासाठी (३ मे १९६५) ५।२५ प्रती तयार झाल्या. पहिली प्रत उघडली आणि या सर्व तणातणीचे, श्रमाचे, हौसेचे चीज झाल्याचे समाधान वाटले. प्रकाशन समारंभ आटोपल्यावर तेथल्या तेथेच उपस्थितांपैकी अनेकांनी छपाईचे मनःपूर्वक कौतुक केले. छपाई कशी —स्वच्छ, सुबक, डौलदार ! पु. लं. चीही मान डोलली. Bloody Printer ही विरुदावली नेहमीच सोसणाऱ्या मुद्रणव्यवसायिकांना असे निर्भेळ कौतुकाचे क्षण किती मोलाचे वाटतात हे त्या व्यवसायाशी थोडाफार संबंध असणाराच समजू शकेल.

पण हे लोकांनी केलेले अनभिज्ञ कौतुक वेगळे व तज्ज्ञांची परीक्षा वेगळी. हे शिवचरित्र यंदा छपाई कलाविशारदांच्या परीक्षेतही उत्तीर्ण झाले. ही मुद्रकाच्या दृष्टीने विशेष अभिमानाची गोष्ट आहे. 'महाराष्ट्र मुद्रणपरिषद' ही मुद्रण व्यावसायिकांची संघटना प्रतिवर्षी उत्तम मुद्रणांतील विविध प्रकारांमध्ये स्पर्धा लावून विजेत्यांना ताम्रपट व प्रशस्तीपत्रे देत असते. यंदा 'पुस्तक छपाई' प्रकारात 'राजा छत्रपती'च्या उत्कृष्ट मुद्रणाबद्दल पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक 'आनंद मुद्रणालया'स मिळाले. रसिकमान्यतेवर तज्ज्ञांच्या मान्यतेचे शिक्कामोर्तब झाले. दादासाहेब व माधवराव जोशी या बंधुद्वयाचे अभिनंदन. दादासाहेब व



नांदेड येथे भरलेल्या 'महाराष्ट्र मुद्रण परिषदे'च्या १५ व्या अधिवेशनात नामदार श्री. वसंतराव नाईक यांच्या हस्ते 'आनंद मुद्रणालय' पुणे या संस्थेतर्फे श्री. यशवंत तथा दादा जोशी ताम्रपट स्वीकारीत आहेत.

माधवराव ! पुढची आवृत्ती अशीच सुरेख काढा व जमल्यास (!) लवकर द्या. पुढची आवृत्ती काढण्याचा योग येईल असे वाटते. कारण तुम्ही छापलेली ही तिसरी आवृत्ती वर्ष संपायच्या आतच संपतही आली.

—परिचित

# जिवंत 'डोह'

"मळयाच्या वाटेने सळसळत गेलेली तल्लख पिवळी नागीण...जोंधळयांतून जाताना धारदार पात्याने फाटलेला लिलीचा डोळा...पाणंदीतून जाताना, जळत्या उन्हात मधेच वाटेवर येऊन धुंद झालेले तांबडेभुरे मुंगसाचे जोडपे. त्या नराचे लुकलुकत्या डोळयांनी वळून पाहाणे. त्याच्या एवढयाशा नाकावर चमकणारे घामाचे लहान लहान थेंब. तांबडगोंडाच्या कडयावरून कृष्णेचे मोठेच्या मोठे पात्र पलीकडे ओलांडून जाणारे मोर...त्यांचे उन्हातले गर्द नितळ निळे पंख...परसदारच्या

दूर्वांचे किरणांनी चमचमणारे हिरवेसोनेरी तुरे तोऱ्यात कुरतडत जाणारे पांढरेशुभ्र मांजर..." (मनातल्या उन्हात.)

एक ऊन्ह म्हटले तरी, श्री. श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या बालपणीच्या संवेदना-स्मृतींना ते इतक्या रूपांनी चिकटूने बसलेले आहे. असेच पाणी, वानरे, सुसरी, वाघळे आणि त्यांच्या भोवतीचा निसर्ग. आणि या साऱ्या आठवणींना जागे करण्याचा, त्या अगदी जेवढ्यास तेवढ्या शब्दांनी पकडण्याचा, बालपणीचे रूप-रंगाने संवेदनांत राहू आलेले जग त्याच्या फुलपाखरी पंखावरच्या रंगच्छटांत स्वतःची भर न घालता किंवा त्या रंगांना ढका न लावता कागदावर उतरवायचा प्रयत्न म्हणजे श्रीनिवास विनायक कुलकर्णींच्या ललितलेखांचा हा संग्रह, ' डोह.'

बालपणींचे अतिसंवेदनाशील मनाने आणि तल्लख इंद्रियवृत्तींनी टिपलेले अनुभव जसेच्या तसे पकडायचा प्रयत्न या लेखसंग्रहात दिसतो. बालपणाबद्दल लिहिलेले असूनही उगीच त्या गेलेल्या रम्य दिवसांबद्दल उसासे टाकणे, भावुकतेने बोलणे यात टाळलेले दिसते. ' काय तो काळ, कशी ती माणसे, आता तसले काही होणे नाही ' असा ' ते हि नो दिवसा गताः ' चा सुस्कारा नाही. बालपणी आपण कसे हूड किंवा विशेष संवेदनाशील होतो, इतरांच्यापेक्षा फार ' अन्तर्मुख ' होतो, असे काहीही लेखकाला पटवून द्यायचे नाही, वाचकांची सहानुभूती किंवा शाबासकीही मिळवायची नाही. त्याला फक्त न्यायचे आहे त्यांना आपल्या त्या विलक्षण जिवन्त अशा जगात.

बालपणी पाहिलेल्या निसर्गातले सुंदर तेवढेच सांगेन, किंवा निसर्ग निर्घृण असतो हे वाचकांना पटवून देईन अशा भूमिकेवरून लेखकाने लेखन केलेले नाही. निसर्ग जसा त्याला बालपणी दिसला, तसा तो त्याने प्रौढपणी रंगवला. भर उन्हाच्या मोरीच्या तोंडातून दिसणाऱ्या ' चिवचिवत्या ' प्रकाशापासून तो वानरांतला नर नवजात नर–पिलांना कसा खाली आपटून मारीत असे किंवा सुसरीची नवजात पिले कशी कावळ्याच्या भक्ष्यस्थानी पडत ते सारे लेखकाने सांगितलेले आहे. काळोख्या रात्री नदीकाठी कंदील घेऊन पोचवायला आलेल्या माणसाच्या हातातल्या दिव्याची रेघ कशी पाण्यावर उमटे ते त्याने बारकाव्याने पाहिलेले आहे, तसे नदीच्या पुराचे पाणी गावात कशी एकच धांदल उडवून देई तेही त्याने आठवायचे टाळलेले नाही.

आणि हे सारे बालपणीचे अनुभव लेखकाने प्रौढपणीच्या भाषेत सांगितले असले तरी त्या अनुभवांचा अनघडपणा जसाच्या तसा ठेवण्यात त्याने यश मिळवलेले आहे. बालपणी पाहिलेले सारेच उमजते असे नाही. काही उमजते, काही उमजतच नाही, तर काहींचा काही विचित्रच अर्थ मनाने लावलेला असतो. या विचित्रात भीतीचा भाग पुष्कळदा असतो, हे सारे लेखकाने टिपलेले आहे. या उमजण्या न उमजण्याच्या संदर्भात ' शब्दांच्या संध्याकाळी ' हा अप्रतिम लेख वाचून पाहण्या-

जोगा आहे. प्रौढ जगातल्या शब्दांचे बालमनाला भावलेले विचित्र अर्थ, त्यांनी उत्पन्न झालेला गोंधळ, भीती यांचे सुरेख चित्रण या लेखात आहे.

श्री. कुलकर्णींना बालपणी जे निसर्गविषयक अनुभव आले, तेच सगळ्यांना आलेले असतील असे नाही; पण त्यांनी रंगून सांगितलेल्या त्या विश्वाबद्दल वाचता-वाचता सहसंवेदनेचे आपलेही सुप्त, अर्धसुप्त बालपण जागे होऊ लागते, समजेचे हुंकार देऊ लागते. हा मोठा सुखद अनुभव !

सजावटीसाठी 'पद्मा' नी काढलेली डिस्नेलँडमधल्यासारखी चित्रे या लेखांचा सूर त्यांना पकडता आला आहे हे स्पष्टपणे दाखवून देतात.

कुठल्याही 'तत्त्वज्ञाना' च्या आहारी न जाता काढलेल्या या संवेदनाचित्रांबद्दल श्री. कुलकर्णींचे मनःपूर्वक अभिनन्दन !

**सरिता पदकी**

[ डोह : श्रीनिवास विनायक कुलकर्णी : मौज प्रकाशन गृह : किंमत सहा रुपये. ]


# श्री. ब. मो. पुरंदरे

*यांची नवी ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध झाली*




**मूल्य तीन रुपये**

***राजहंस प्रकाशन***

*४१९ नारायण, पुणे २*

# लेखक, संपादक, प्रकाशक मेळावा

२६ जानेवारी : गतवर्षापासून पुण्यात या दिवशी लेखक, संपादक, प्रकाशक यांचा एक दिवसाचा मेळावा आयोजित करण्यात येत आहे. फर्ग्युसन कॉलेजच्या आवारात यंदा हा मेळावा २६ जानेवारीस भरला होता. दुपारी १२ ला सुरू झालेला कार्यक्रम रात्री ८॥ ला संपला. यासाठी, संस्था स्थापन करण्यात आलेली नाही ही या घटनेची अत्यंत चांगली बाजू यापुढे राहावी ! या मेळाव्याला अध्यक्ष नको, मागला अहवाल नको, हिशेबांची कटकट नको, निमंत्रणाचे अवडंबर नको, अशी मूळ कल्पना होती. गतवर्षी या गोष्टी अट्टाहासाने टिकवल्या. यंदा त्या आपसुक टिकल्या गेल्या.

व्यवहारातला अनुभव असा आहे की, आपण एकमेकांकडे गप्पा मारायला न बोलावताही जातो; परंतु, लग्नाचे किंवा समारंभाचे निमंत्रण नसले तर ओळखीच्या घरीही जात नाही. म्हणूनच या मेळाव्याला खास निमंत्रणे कुणाला करू नयेत.व्यवहार म्हणून जागा—वेळ व समारंभाच्या खर्चाची तरतूद कळवणे आवश्यक आहे व तेवढे केले पाहिजे. यातही जेवढे तोंडी परस्परांत कळू शकेल, तेवढे कळवावे. अशक्य तेथे टपाल हशील निराळे ठेवावे.

म्हणूनच, या संमेलनाला केवळ वर्गणी धाडून प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची गरज नाही, असा विचार करू नये. पैसे महत्त्वाचे नसून, यात प्रत्यक्ष भाग घेणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक धंद्यात हल्ली मानमान्यतेच्या खुळचट कल्पनांचे तण माजले आहे; याला छेद जावा असे वाटत असेल तर एखादा दिवस तरी, ही सर्व अवजड ओझी खाली उतरून लेखकांनी, प्रकाशकांनी, संपादकांनी एकत्र येण्यात अहमहमिका दाखवली पाहिजे.

चिखलफेक वर्षभर चालतेच. एखादे दिवशी चेंडूफेक करावी. प्रतिष्ठेची सावली नेहमीचीच असली तर एखादे दिवशी उन्हात उतरावे. वर्षभर लेखणी हातात धरणारांनी एखाद्या दिवशी बॅट हाती धरावी. अमक्याचे तोंड पाहू नये, तमक्याशी बोलू नये असे वर्षभर वाटत असते. एकाद दिवशी मनाची ही धाव आवरून चार धावा काढाव्यात, यासाठी क्रिकेटच्या सामन्यांचे आयोजन पहिल्या वर्षी केले गेले. दुसरा खेळ खेळता येणार नाही, असे नाही. रस्सीखेच खेळता येईल, लंगडी घालता येईल, एकत्र येण्याचा आग्रह आहे. इतर कशाचा नाही.

## नवे काही : जुने सर्व

यंदाच्या वर्षी निमंत्रणे धाडण्यात काही घोटाळे झाले असतील; पहिला घोटाळा असा सांगण्यात आला की, गतवर्षी ज्यांना निमंत्रणे पाठवली, त्यांना यंदा गेली नाहीत. नसतील गेली ! ज्यांना गेल्यावर्षी निमंत्रणे पाठवली त्यांनी यंदा आपण होऊन कुणाजवळ चौकशी करायला काय हरकत होती ? मला वाटते, औपचारिकपणा टाळला तरच या मेळाव्याचे महत्त्व आहे.

यंदाच्या मेळाव्यात ३५–३६ लेखक, संपादक, प्रकाशकांनी भाग घेतला. पुण्याच्या मानाने ही संख्या फार नाही; परंतु पुण्याची ' प्रकृती ' लक्षात घेता लहानही नाही. संपादकांपैकी अनंत अंतरकर, मुकुंदराव किर्लोस्कर, प्रकाशकांपैकी पंडित कुलकर्णी, ' ज्ञानराज प्रकाशन 'चे जोशी यंदा प्रथमच आले. गतवर्षापैकी नव्वद टक्के व्यक्ती हजर होत्या.

क्रिकेटच्या सामन्यानंतर, या वर्षी चित्रपटाचे आयोजन होते. पुण्यात Film Cultoval centre सारखी उत्कृष्ट पाश्चात्य चित्रपट दाखवणारी संस्था आहे, ही गोष्ट पुष्कळांना प्रथमच कळली असेल. चित्रपटाचेच आयोजन दरवर्षी करावे, असे नाही. परंतु, खेळानंतर एखादा कार्यक्रम असा असावा, की ज्यात लेखिकांनाही भाग घेता येईल. असा प्रयत्न पुढील वर्षी करण्यास हरकत नाही.

या संमेलनाला हजर राहिल्याने निष्कारण वेळ गेला, अशी भावना एकाही संपादकाची, लेखकाची, प्रकाशकाची झाली नसेल अशी खात्री आहे. दुपारभर उन्हात धावण्यातही गंमत असते, असा अनुभव प्रत्येकाला आला. यापेक्षा संमेलनाचा अधिक काही हेतू असू नये.

येथे साहित्यविषयक चर्चा नाही. मग संमेलन लेखक, प्रकाशक, संपादक यांपुरते मर्यादित का ? मग डॉक्टर, वकील, पुढारी यांनाही बोलवा असे काहीजण म्हणतात ! याला उत्तर असे की काही साधर्म्य असल्याशिवाय कुणी एकत्र येणारच नाहीत. शिवाय, माणसे भेटली म्हणजे बोलणे चालूच असते. यावर तिथे बंधन नाही. फक्त हे साहित्यसंमेलन नाही, एवढाच आग्रह असावा. साहित्यसंमेलनांतून साहित्याची चर्चा होते. परंतु जमलेल्या लोकांत साहित्यिकांचे प्रमाण किती असते ? साहित्याच्या प्रेमाखातर आपण एकत्र जमलो आहोत, एवढीच ओढ अशा संमेलनाला पुरेशी आहे.

यंदाचे वर्षी श्री. दि. बा. मोकाशी व माधव कानिटकर यांनी या संमेलनाचे आयोजन व्यवस्थित केले, याबद्दल त्यांचे अभिनंदन. पुढील वर्षी या मेळाव्याची जबाबदारी श्री. मधुसूदन अकलूजर व पंडित कुलकर्णी यांनी स्वीकारली आहे. संमेलनाचा अनौपचारिकपणा कायम राखून पुढील वर्षी या कार्यक्रमाचे आयोजनही यशस्वी होईल, यात शंका नाही.

– मूळ संयोजकांपैकी एक



# आक्रमक यष्टिरक्षक जॉर्ज डकवर्थ

शिरीष कणेकर

गेल्या काही महिन्यांत इंग्लिश क्रिकेटला एकामागून एक, असे जबरदस्त हादरे बसले. चांगले 'सेट' झालेसे वाटणारे डोंगराएवढाले क्रिकेटपटू अकस्मात 'बाद' झाले–धावबाद व्हावेत तसे! त्या सर्वश्रेष्ठ गोलंदाजाने–काळाने एका 'डेडली स्पेल' मधे भराभर विकेटस् काढल्या. हॉब्ज, हॅमंड, हिच फ्रीमन आणि आता डकवर्थ! मास्टर म्हणून ओळखला जाणारा सर जॅक हॉब्ज, कव्हर ड्राइव्ह ह्या आजकाल दुर्मिळ झालेल्या फटक्याचा राजा वॉल्टर हॅमंड, 'बचेंगे तो और भी लडेंगे' वृत्तीचा हिच, सीझनमध्ये तीनतीनशे विकेटस् काढणारा वामनमूर्ती हिच् फ्रीमन आणि ह्या यादीत नुकताच समाविष्ट झालेला 'अपील' सम्राट जॉर्ज डकवर्थ यांच्या निधनामुळे क्रिकेटची अपरिमित हानी तर झालीच; प्रेस–बॉक्सचीही रयाच गेल्यासारखी झाली. त्यांना इंग्लिश क्रिकेटचा अभिमान होता आणि इंग्लिश क्रिकेटलाही त्यांचा अभिमान वाटत असे. इंग्लिश क्रिकेटचे रोपटे ह्यांनीच जोपासले, वाढवले, त्याचा वृक्ष झाल्याचे पाहण्यात कृतार्थता मानली. विस्डेनच्या पाना-पानावर यांची नावे सुवर्णाक्षरांनी कोरलेली आहेत.

जॉर्ज डकवर्थच्या मृत्यूबद्दल अनेकांनी अनेक प्रकारे दुःख व्यक्त केले. नेव्हिल कार्डस्च्या शब्दांत सांगायचे तर म्हणता येईल की, डकवर्थच्या आगमनामुळे स्वर्गाचा संघ अधिकच बलवान झाला.

### यष्टीमागील सफाई

Even if he scores a 'duck' every time he goes in to bat he is 'worth' his place for his keeping alone."

डकवर्थच्या नावावर शाब्दिक कसरत करीत एका टीकाकाराने केलेले हे विधान शंभर टक्के सत्य होते. केवळ फलंदाजीच्या जोरावर ज्याचा इंग्लिश संघात समावेश होऊ शकला असता, असा लेस्ली एम्ससारखा तुल्यबळ प्रतिस्पर्धी असतानासुद्धा डकवर्थ चोवीस कसोटी-सामन्यांत खेळला ही एकच गोष्ट त्याची यामागील कर्तबगारी सिद्ध करण्यास पुरेशी आहे. यॉर्कशायर आणि इंग्लंडचा माजी द्रुतगती गोलंदाज बिल बोज म्हणतो,

" मी ज्यांच्याबरोबर खेळलो, त्यांत डकवर्थ हा सर्वोत्कृष्ट यष्टिरक्षक होता. तो यष्टिमागे असला की, एखादा जादा क्षेत्ररक्षक असल्यासारखे वाटे. शिवाय तो गोलंदाजांना नेहमीच उत्तेजन देत असे."

यॉर्कशायरचा बोज (यॉर्कशायर–लँकेशायरमधील तेढ जगप्रसिद्ध आहे.) लँकेशायरच्या डकवर्थची एवढी स्तुती करतो यात बोजचा दिलदारपणा दिसतो; तर डकवर्थचे यष्टिमागील कौशल्य दिसते.

डकवर्थ ओल्डफील्ड किंवा स्ट्रडविकपेक्षा उंच होता; पण गलेलठ्ठपणामुळे पाच फूट सात इंच उंचीची ही मूर्ती बुटकी वाटे. त्याच्या गरगरीत गव्दुलपणामुळे अनेकांनी–विशेषतः फलंदाजांनी–त्याच्या चपलतेबाबत गैरसमज करून घेतला होता. पण लवकरच त्यांना त्याबाबत पश्चात्ताप करण्याची पाळी येई.

यष्टीपुढील डकवर्थ व यष्टीमागील डकवर्थ यांत खूपच फरक होता. फलंदाजी करताना बोजड आणि सुस्त वाटणारा स्थूल डकवर्थ यष्टिरक्षण करताना विजे-सारख्या हालचाली करीत असे. जणू दोन वेगळ्याच व्यक्ती होत्या त्या. त्याला फूटबॉलची उपमा चांगली शोभली असती. तो होताही तसाच गरगरीत आणि उडायचाही तसाच टणटण ? प्रेक्षकांना वाटे की ह्याच्या शरीरात हाडेच नसावीत. 'इंग्लंडचा सर्वोत्कृष्ट यष्टिरक्षक' ठरण्याचा मान इव्हान्सला मिळालाय. पण द्रुत-गती गोलंदाजी घेण्याच्या बाबतीत डकवर्थ इव्हान्सला हार गेला नसता. द्रुतगती गोलंदाजी 'घेण्याचे' त्याचे कसब और होते. लारवुड, टेट, बोज, ॲलन, हॅमंड आणि गिअरी यांसारख्या व अशाच आणखी कितीतरी द्रुतगती गोलंदाजांनी खच्चून भर-लेल्या इंग्लिश संघाला डकवर्थ हे एक वरदानच वाटत असल्यास नवल नाही. लँकेशायरमध्ये स्थायिक झालेला ऑस्ट्रेलियाचा महान द्रुतगती गोलंदाज टेड मॅक्डो-नाल्ड डकवर्थला ओल्डफील्डच्या बरोबरीने लेखीत असे. मॅक्डोनाल्डची नेत्रदीपक गोलंदाजी व तीवरील डकवर्थचे नयनरम्य यष्टिरक्षण हे लँकेशायरच्या सामन्याचे खास आकर्षण असे. बेडसर–इव्हान्ससारखीच डकवर्थची कसोटी सामन्यात मॉरिस टेटशी जोडी जमली होती. टेटच्या गोलंदाजीवर डकवर्थ इतर यष्टिरक्षकांप्रमाणे मागे न राहता यष्टीला खेटून उभा राहत असे. त्यामुळे, टेटची गोलंदाजी जास्तच प्रभावी ठरे. टेटचे मास्क कटर्स खेळताना डकवर्थचे अस्तित्व फलंदाजाला अस्वस्थ करी. झेल डकवर्थ गोलंदाज टेट किंवा यिटीचीत डकवर्थ गोलंदाज टेट हे समीकरण

सुरेख जमले होते. उगाच नाही टेटने "मी पाहिलेला सर्वोत्कृष्ट यष्टिरक्षक" या शब्दांत डकवर्थचा गौरव केला.

१९२३ साली तो प्रथम लँकेशायरकडून खेळला. पुढल्याच वर्षी त्याने इंग्लिश संघात जागा पटकावली. पाच देशांविरुद्ध खेळलेल्या २४ कसोटी–सामन्यांत त्याने एकूण ६४ विकेटस् घेतल्या. २८–२९, ३१–३२ व ३६ साली अनुक्रमे चॅपमन, जार्डिन व ॲलन यांच्या नेतृत्वाखाली डकवर्थ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर गेला. २८ साल त्याला फारच चांगले गेले. त्या मोसमात त्याने १०७ विकेटस् (७७ झेलबाद व ३० विटिचीत) काढल्या व लगेच त्याची ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाण्यासाठी निवड झाली. मेलबोर्नवर सहा विकेटस् घेऊन त्याने विक्रम केला.

३७ साली वयाच्या ३६ व्या वर्षी तो निवृत्त झाला. लँकेशायरकडून खेळताना त्याने ९२१ विकेटस् घेतल्या. तो संघात असताना लँकेशायरने पाच वेळा चँपियन-शिप जिंकली. तो एकूण ४९२ सामने खेळला व त्यात त्याने १०९५ विकेटस् मिळवल्या.

"औझॅ ऽऽट ?"

ऑस्ट्रेलियाचा ओल्डफील्ड आणि डकवर्थ हे समकालीन खळाडू; पण दोघांच्या स्वभावात व यष्टिरक्षणाच्या पद्धतीत जमीनअस्मानचा फरक ! ओल्डफील्ड शांत, साधा आणि मवाळ; तर डकवर्थ आक्रमक, आक्रस्ताळी खटयाळ. ओल्डफील्डच्या यष्टिरक्षणात अकृत्रिम सफाई होती, पण देखावा नव्हता, डौल नव्हता. त्या मानाने डकवर्थ मलताच भपकेबाज ! दोघेही आपापल्या संघात प्रिय होते. पण डकवर्थला खरी प्रसिद्धी मिळवून दिली, त्याच्या कानठळ्या बसविणाऱ्या अपिलाने. अंपायर बहिरा आहे, असे समजून डकवर्थने भसाड्या आवाजात केलेले "औझॅ ऽऽट" थेट प्रेक्षकांपर्यंत पोहोचत असे. तेही "हो ऽऽ" करून त्याला दाद देत असत. तो मैदा-नावर उतरताच प्रेक्षक "औझॅ ऽऽट" असे ओरडून त्याचे स्वागत करीत.

ओल्डफील्डचे अपील जेमतेम अंपायरला ऐकू जायचे. तो तोंडाने म्हणायचा "हाऊ इज दॅट" पण त्याचा आवाज आणि चेहरा काही वेगळाच दर्शवायचा. जणू तो फलंदाजाची क्षमायाचनाच करायचा ! जणू त्याला म्हणायचे असायचे–" माफ कर हं, असलं कृष्णकृत्य आणि तेही तुझ्या पाठीमागे करणं मला बिलकुल शोभलं नाही. पण काय करणार रे ! धंदाच पडला तसा. बराय, मग भेटूच आपण. आणि हो ! संभाळून जा हो ! नाही, पॅव्हिलियनच्या पायऱ्या निसरड्या झाल्यायत म्हणून म्हणतो......"

अपील ह्या शब्दाचा अर्थ 'अत्यंत कळकळीची विनंती' असा डिक्शनरीत दिलेला आहे हे डकवर्थचे अपील ऐकून खरे वाटत नसे. त्याचे 'अपील' अपील नसायचेच मुळी. तो निर्णय असायचा. फलंदाजाच्या चुकीबद्दल दिलेली ती सजा असे. जणू त्याला म्हणायचे असायचे–" आउट ! आउट ! मी सांगतो तू आउट आहेस. मी

इथं धडधडीत जिवंत असताना तू क्रिज सोडून पुढे जातोस याचा अर्थ काय ? भोग आता आपल्या कर्माची फळे. आउट ! अंपायरकडे पाहायची जरुरी नाही. मी सांगतोय नं ! आउट......"

एकदा मात्र गंमत झाली. त्याला सवाई डकवर्थ भेटला. खुद्द डकवर्थ हा किस्सा खूप रंगवून सांगत असे.

लँकेशायर लीगमधल्या एका सामन्यात डकवर्थ व पतौडीचे नबाब (सध्याच्या नबावांचे वडील) खेळत होते. एक तरुण खेळाडू फलंदाजी करीत होता. त्याच्याविरुद्ध अनेक अपील्स करण्यात आली. कमीत कमी चार वेळा तरी तो खेळाडू नक्कीच बाद होता. अखेर पतौडीने स्लिपमध्ये त्याचा झेल घेतला व अपील केले. पण अंपायरने पुन्हा 'नॉट आउट' असे उत्तर दिले. नंतर थोड्या वेळाने डकवर्थने त्याचा झेल घेतला. चेंडू हवेत उंच उडवून डकवर्थ खेकसला.

"औझॅऽऽट ? "

"नॉट आउट ! " अंपायर तितक्याच जोरात ओरडला.

लागोपाठ इतकी 'अपील्स' नाकारणारा अंपायर डकवर्थ त्या दिवशी प्रथमच पाहत होता. अखेर त्याच्याने राहवेना. त्या अंपायरशी जाऊन त्याने खोटया विनयाने विचारले—

"तो पोरगा तुमचा नातेवाईक आहे वाटते ?"

"हो. मुलगाच आहे तो माझा !" अंपायर शांतपणे उत्तरला.

"मग बरोबर आहे." डकवर्थ मानभावीपणे म्हणाला.

"आतापर्यंतच्या अपीलसबद्दल मी तुमची माफी मागतो, बर का !"

"छे छे ! माफी कशाबद्दल मागता ? तुम्ही तुमच कर्तव्य करताय्, मी माझ करतोय् !" डकवर्थच्या कानाशी तोंड नेत अंपायरने गौप्यस्फोट केला, अहो, त्याची आई म्हणजे आमचं कुटुंब—आज मुद्दाम त्याचा खेळ पाहायला आलंय्."

"अस्सं होय ? मग चालू द्या तुमच काम !" सहानुभूतीने अंपायरकडे पाहत डकवर्थ म्हणाला.

त्या अंपायरच्या मुलाने त्या दिवशी शतक काढले.

### मिस्किल स्वभाव

क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर त्याने मॅनेजर, स्कोअरर व क्रिकेट-समीक्षक ह्या भूमिका उत्तम प्रकारे पार पाडल्या. इथेही तो लोकप्रिय ठरला. ५० साली भारतात आलेल्या राष्ट्रकुल संघाचा तो मॅनेजर होता. क्रिकेट व क्रिकेट पटूंवरील त्याच्या मतांना किंमत होती. त्याची मते सडेतोड असत, तर लिखाण मार्मिक असे. त्याचा मिस्किल विनोद प्रसंगी चिमटे काढीत असे. त्याला भारतीय क्रिकेटविषयी आस्था होती.

५९ साली इंग्लंडविरुद्ध पहिल्या कसोटी सामन्यात भारताचा संघ, १६७ धावात

गारद झाला. इंग्लिश टीकाकारांनी टीकेची झोड उठवली, परंतु इंग्लंडही गडगडले. पन्नासच्या आत त्यांचे चार गडी परतले. सामन्यात उशीरा आलेल्या डकवर्थने चेहऱ्यावर शक्य तितका भावडा भाव आणून आपल्या सहकाऱ्यांना विचारले,

"फॉलो ऑन टाळायला अजून किती धावा पाहिजेत ?"

चौथ्या कसोटी सामन्यात बेगने अप्रतिम शतक ठोकले. त्याबाबत डकवर्थने लिहिले. "......त्याला बाद करायचा एकच मार्ग इंग्लिश गोलंदाजापुढे होता व अखेर त्याच मार्गाने तो बाद झाला–धावबाद !"

इंग्लंड–ऑस्ट्रेलिया सामन्यात जिम् लेकर भरात येऊन गोलंदाजी करीत होता. ओनीलला त्याने खिळवून टाकले होते. प्रेस–बॉक्समध्ये हजर असलेला एक भारतीय समीक्षक म्हणाला, "मला वाटतं आमचा गुलाम अहम्मद लेकरपेक्षा श्रेष्ठ होता."

वातावरण काहीसे तापले. बऱ्याच जणांच्या भुवया कपाळात घुसल्या अन् जिभा वळवळू लागल्या.

"बरोबर आहे त्यांचं म्हणणं !" ह्या डकवर्थच्या उद्‌गारांनी सारे थंड पडले.

३० साली लीडस् येथे ब्रॅडमनने एका दिवसात ३०० धावा ठोकल्या. त्याबाबत डकवर्थ म्हणतो–

"टेटच्या पहिल्याच चेंडूवर ब्रॅडमनची वास्तविक दांडी जायची ! कसा वाचला कोणास ठाऊक ! चेंडू स्टंपच्या इतक्या जवळून गेला की, तो अडविण्याचं देखील मला ध्यान राहिलं नाही. आणि त्यानंतर माझी गरजच भासली नाही. मी यष्टिरक्षण न करता पॅव्हिलियनमध्ये बसलो असतो तरी चालले असते."

त्याच कसोटी मालिकेत एका सामन्यात डकवर्थने ब्रॅडमनला ८२ धावांवर जीवदान दिले. ब्रॅडमनने २८७ धावा काढल्या, तेव्हादेखील तो बाद नव्हताच ! पण डकवर्थच्या "औझॅऽऽट ?" ला घाबरून की काय अंपायरने बोट वर केले.

नंतर कोणीतरी डकवर्थला हटकले–

"पण जर माहीत होतं की तो नॉटाऊट आहे तर मग तू अपील केलंसच का?"

"किती धावा काढल्या त्यानं ?" डकवर्थ.

"२८७."

"खूप झाल्या की मग !"

एक महान यष्टिरक्षक, तत्पर व्यवस्थापक, उत्कृष्ट स्कोअरर, मार्मिक टीकाकार या विविध भूमिका त्याने उत्कृष्टपणे वठविल्या आणि क्रिकेटची बहुमोल सेवा केली. त्याच्या निधनाने [ १४ जानेवारी १९६६ ] इंग्लिश क्रिकेटची तर हानी झालीच, पण भारताचा एक सच्चा, सहृदय मित्र गेला.

● ● ●

# रहस्यपूर्ण राजकीय गुन्हा

## पाश्चिमात्य वृत्तपत्रातून सध्या गाजत असलेले बेन बर्का प्रकरण

" पार्सल आले आहे. तावडतोब या. "

टेलिफोनवरील त्या शब्दांत गेल्या दहा वर्षांतील एका अत्यंत खळबळजनक आंतरराष्ट्रीय राजकीय गुन्ह्याचे रहस्य दडलेले होते. मोरोक्कोचे गृहमंत्री जनरल औफकिर यांना पॅरिसहून हा सांकेतिक संदेश आला होता. यातील ' पार्सल ' म्हणजे मोरोक्कोतील ' नॅशनल युनियन ऑफ पॉप्युलर फोर्सेस ' या सरकारविरोधी जहाल पक्षाचे नेते बेन बर्का होते. फ्रेंच गुप्तहेर संघटनेतील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने त्यांना पळविण्याचा कट यशस्वी झाला होता. प्रथम ते `पत्ता आहेत, एवढीच बातमी प्रसिद्ध झाली; पण त्यांना पळवून ठार करण्यात आले असावे असे विश्वसनीय गोटातून सांगण्यात येते. ही घटना घडली २९ ऑक्टोबर १९६५ ला. पण फ्रेंच अध्यक्षीय निवडणूक पार पडेपर्यंत ती अत्यंत दक्षतेने गुप्त राखण्यात आली. निवडणुकीपूर्वी या प्रकरणांचा रहस्यस्फोट झाला असता तर द गॉल यशस्वी झाले असते की नाही याबद्दलही शंका व्यक्त करण्यात येते.

या घटनेचा अजून पूर्ण तपास झालेला नाही; पण हाती लागलेल्या धाग्यादोऱ्यांवरून हा कट कसा शिजला, याचा बराचसा उलगडा होतो.

### औफकिर-बर्का वैमनस्य

मोरोक्कोचे गृहमंत्री जनरल औफकिर आणि बेन बर्का यांचे राजकीय वैमनस्य बरेच जुने आहे. दहा-बारा वर्षांपूर्वी मोरोक्को ही फ्रेंचांची वसाहत असताना बेन बर्का ' फ्रेंचाचा एक नंबरचा शत्रू ' मानले जात होते. त्या वेळी औफकिर मोरोक्कोतील फ्रेंच सेनेत तरुण, उत्साही अधिकारी होते. स्वातंत्र्यानंतर बेन बर्का यांची नॅशनल कन्सल्टेटिव्ह असेंब्लीचे चेअरमन म्हणून नेमणूक करण्यात आली. साम्राज्यवाद्यांचा सहकारी म्हणून बदनाम झालेल्या औफकिरला मात्र स्वातंत्र्यात काही वर्षे आपली प्रगती करणे कठीण गेले. १९५९ साली बेन बर्का इस्तिकलाल पक्षातून फुटून त्यांनी ' नॅशनल युनियन ऑफ पॉप्युलर फोर्सेस ' हा स्वतःचा स्वतंत्र पक्ष काढल्यावर मात्र सत्तेचा समतोल बदलू लागला. औफकिर यांचे महत्त्व व सत्ता याच काळात पुनः वाढू लागली. सेनेत महत्त्वाचे स्थान त्यांनी मिळविले होतेच. याशिवाय एस्. डी. ई. सी. ई. या फ्रेंच गुप्त हेर संघटनेशी त्यांचे संबंध होते. त्या

संघटनेच्या मोरोक्को विभागाचे त्यांना प्रमुख म्हणून नेमण्यात आले होते. तसेच १९६० मध्ये खुद्द मोरोक्कोच्या गुप्तहेरदलाचे नियंत्रण त्यांनी स्वत:कडे घेतले. त्यांची राजकीय सत्ता वाढत वाढत आता एवढी वाढली आहे की, खुद्द राजालाही त्यांच्या प्रभावाची भीती वाटते असे म्हणतात.

याउलट बेन बर्का स्वदेशात फार थोडा काळ असत. परदेशांतूनच ते आपल्या चळवळीची सूत्रे हलवीत. दोनदा त्यांना त्यांच्या गैरहजेरीत देहांताची शिक्षा झाली. यापैकी एक शिक्षा १९६३ साली झाली. मोरोक्कोच्या प्रमुख सत्ताधारी नेत्यांचा खून करण्याच्या प्रयत्नात शेख अल अरब या दहशतवादी नेत्यास लाच दिल्याचा त्यांच्यावर आरोप होता. ज्यांच्या खुनाचा प्रयत्न होणार होता, त्या नेत्यांच्या यादीत औफकिर यांचे नाव पहिले होते.

बेन बर्का यांना प्रत्यक्ष पळविले, त्यापूर्वी निदान सहा महिने आधी हा कट शिजू लागला. १९६३ च्या कटाबद्दल पकडलेल्या अनेक राजबंद्यांची मुक्तता राजे हसन यांनी २ एप्रिल १९६५ मध्ये केली, पण बेन बर्का यांना सोडले नाही. पण पुढे देशापुढील बिकट आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी व्यापक पायावर सरकारची उभारणी करण्याचा विचार ते करू लागले. त्यांतूनच बेन बर्का यांना मोरोक्कोत परत बोलावण्याची सूचना पुढे आली. फ्रँकफूर्ट येथे राजे हसन यांचे दूत व बेन बर्का यांची गुप्त भेट झाली. आपणास पकडण्यासाठी तर हे जाळे टाकण्यात आलेले नाही ना, अशी शंका बेन बर्का यांना आली. त्यांनी मोरोक्कोतील आपल्या सहकाऱ्यांना याचा अंदाज घेण्याच्या सूचना दिल्या. या घटनेने जनरल औफकिर मात्र अस्वस्थ झाले. बेन बर्का यांना मंत्रिमंडळात घेतले तर आपल्याला त्यात स्थान राहणार नाही हे-त्यांना उघड दिसू लागले. बेन बर्का यांना पळविण्याचा कट यातून शिजला.

बेन बर्का यांना पळविण्याचा पहिला प्रयत्न मे १९६५ मध्ये झाला. फिलिप बर्नियर हा पत्रकार व बेन बर्का यांचा चांगला परिचय होता. मोरोक्कोच्या गुप्तहेरदलाचा एक वरिष्ठ अधिकारी मिलहुद चतौकी बर्नियरला भेटला. अल्जिअर्समधील आशिया-आफ्रिका परिषदेचे वेळी ' बेन बर्काशी आमची गाठ घालून द्या ', अशी कामगिरी त्याने बर्नियरवर सोपविली व त्यासाठी त्याला चार लाख नवे फ्रँक (२९,३८९ पौंड) देऊ केले; पण परिषदच रद्द झाल्याने हा प्रयत्न फसला.

### चित्रपटनिर्मितीच्या जाळ्यात पकडले

बर्नियरच्याच दुसऱ्या एका योजनेमुळे मात्र बेन बर्का यांना पळविण्यात जनरल औफकीर यांना यश आले. बेन बर्का यांच्या राजकीय कार्यासंबंधी एक चित्रपट काढण्याची सूचना बर्निअरने केली. बेन बर्कावर पाळत ठेवून त्यांना पळवायला ही चांगली संधी आहे, हे जनरल औफकिरच्या लोकांनी हेरले. सतरा मेस चतौकी व खास पोलिस प्रमुख टलिमी पॅरिसला गेले. तेथे एलिसी पार्क हॉटेलमध्ये त्यांनी फ्रेंच

गुप्तहेर संघटनेतील अँटनी लोपेझची भेट घेतली. लोपेझने जॉर्जेस फिगाँला गाठावे. चित्रपटासाठी भांडवल पुरविण्यास आपण तयार आहोत, अशी बतावणी करून फिगाँने बेन बर्का यांना भेटावे असे ठरले. बर्निअरने फिगाँ यास २ सप्टेंबरला कैरोस नेले. तेथे फिगाँने बेन बर्का यांची भेट घेतली. चित्रपटाच्या दिग्दर्शकाला भेटण्यासाठी ऑक्टोबरात पॅरिसला येण्याचे बेन बर्का यांनी मान्य केले.

ठरल्याप्रमाणे बेन बर्का २५ ऑक्टोबरला पॅरिसमध्ये आले व ज्या हॉटेलात भेट व्हावयाचे ठरले होते तेथे गेले. अझेमोरी हा इतिहासाचा विद्यार्थी चित्रपट-सल्लागार म्हणून त्यांच्याबरोबर आला होता. बेन बर्का आले, की त्यांना पळवायचे या उद्देशाने जनरल औफकिर यांचे हस्तक शेजारच्या हॉटेलात आलेलेच होते. बेन बर्का यांनी सहज शेजारच्या हॉटेलातील खिडकीकडे पाहिले तोच त्या हस्तकांपैकी सुचौ बेन बर्का यांच्याजवळ आला. त्याने आपले वॉरंटकार्ड दाखविले आणि बर्का यांना आपल्याबरोबर चलण्यास सांगितले. चौघा हस्तकांनी चाळीस सेकंदांत बर्का यांना मोटारीतून आणखी एका हस्तकाच्या घरी नेले. तेथूनच चतीकीने जनरल औफकिर यांना मोरोक्कोस फोन केला, " पार्सल आले आहे. ताबडतोब या. " औफकिर दुसऱ्या दिवशी आले. नंतर बेन बर्का यांना ७ किलोमीटर अंतरावरील लोपेझच्या घरी नेले. पळविणाऱ्या हस्तकांनी आपल्या कामगिरीची बिदागी (७५,००० पौंड) मागितली. ते निघून गेले. औफकिर ३१ ऑक्टोबरला मोरोक्कोस परतले.

बेन बर्का यांना पळविल्यानंतर आठ दिवस फ्रेंच पोलिसांनी काहीही हालचाल केली नाही. फ्रान्सचे ग्रहमंत्री रॉजर फ्रे यांनी ५ नोव्हेंबरला अध्यक्ष द गोल यांना ही घटना कळविली. फ्रेंच पोलीस व गुप्तहेरांचा या गुन्ह्यात हात होता, हे मात्र त्यांनी गुप्तच ठेवले. नंतर तपासाची चक्रे जोराने फिरू लागली. लोपेझ व त्यांच्या दोन साथीदार पोलिसांना अटक करण्यात आली.

## आणखी एक रहस्यमय मृत्यू

या घटनेचे रहस्यमय धागे एवढ्यातच संपत नाहीत " बेन बर्का यांना ठार केलेले मी पाहिले, " अशा अर्थाची फिगाँच्या जबानीवर आधारलेली मुलाखत ' ल एक्सप्रेस ' पत्रात प्रसिद्ध झाली. फिगाँने त्याचा नंतर इन्कार केला. त्याचा तपास करीत पोलीस त्याच्या खोलीवर आले, तो त्या खोलीत त्याचे प्रेतच त्यांना पहायला मिळाले. डोक्यात एक गोळी घुसली होती व शेजारी पिस्तुल पडले होते. ही आत्महत्या की खून असा संशय यातून निर्माण झाला. फिगाँ आत्महत्या करण्याच्या मन:स्थितीत दिसला नाही; बिछान्याशी आढळलेले पिस्तुल फिगाँचे नव्हते, अशी माहिती काही मिनिटे आधी त्याला भेटलेल्या एका फोटोग्राफरने सांगितली. दुसरे असे की या पिस्तुलास सायलेन्सर नव्हता. त्याने स्वत:वर गोळी झाडली असेल तर आवाज यायला हवा होता; पण त्या इमारतीत कोणालाही आवाज ऐकू आला

नाही ! रहस्यस्फोटाच्या भीतीने फिगाँचा खुन करण्यात आला असावा, असा संशय व्यक्त करण्यात येत आहे. फिगाँ या गुन्ह्यातील महत्त्वाचा साक्षीदार ठरला असता.

या घटनेने फ्रान्स व मोरोक्कोचे संबंध बिघडले. दोन्ही देशांनी एकमेकांचे वकील परत बोलावले. मोरोक्कोचे गृहमंत्री जनरल औफकिर यांच्याविरुद्ध फ्रान्सने आंतरराष्ट्रीय पकडवारंट काढले आहे. फ्रेंच गुप्तहेरदलाचे प्रमुख जनरल पॉल जॅक्युअर यांना बडतर्फ करण्यात आले. ही गुप्तहेरसंघटना आतापर्यंत फ्रेंच पंतप्रधान पॉपींडू यांच्या नियंत्रणाखाली असे, पण अध्यक्ष द गोल यांनी आता ती संरक्षणमंत्री मेस्मेर यांच्या नियंत्रणाखाली दिली आहे.

## □ केसाने गुन्ह्याचा शोध

'केसाने गळा कापला' असे आपण म्हणतो, पण केसाने गुन्ह्याचा शोधही लावता येतो. बोटाच्या ठशाप्रमाणेच केसाच्या ठशावरूनही गुन्ह्येगाराचे लिंग, व्यवसाय यांसंबंधी अंदाज बांधण्यात येतात. इंग्लंडमधील ऑल्डपेमेस्टन येथील अॅटॉमिक वेपन्स रिसर्च एस्टॅब्लिशमेंटमध्ये यासंबंधी संशोधन करण्यात येत आहे. संस्थेने बाराशे लोकांकडून केसांचे नमुने मागविले. त्यांचे वय, व्यवसाय यांसंबंधीही माहिती विचारली. केसांची शास्त्रीय दृष्टीने तपासणी केल्यावर बाराशे नमुन्यांपैकी फक्त चाळीस जणांच्या केसात गोंधळ वाटावा एवढे साम्य दिसून आले. न्युक्लिअर रिअॅक्टरमध्ये ठेवून या केसांचे पृथक्करण करण्यात आले व त्यांतील निरनिराळ्या रासायनिक घटकांची नोंद करण्यात आली. एक दशलक्ष भाग एवढ्या सूक्ष्म प्रमाणात एखादा घटक असला तरी त्याची नोंद येथे होते. तपासलेल्या नमुन्यांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांत सोनेरी केसाचे प्रमाण दुप्पट आढळले. एका माणसाच्या केसाचे नमुन्यात तांब्याचा अंश आढळला. हा माणूस तांब्याच्या भांड्यांना पॉलिश करणारा असावा, असा अंदाज त्यावरून बांधला आणि तो त्याने पाठविलेल्या माहितीशी ताडून पाहता खरा असल्याचे आढळले. याच पद्धतीने छपाईचे धंद्यातील माणसाबद्दल केलेला अंदाज खरा ठरला. बोटांच्या ठशाएवढ्या अचूकपणाने नाही पण गुन्हेगाराची बरीचशी अचूक माहिती मिळण्यास केसांचाही उपयोग होऊ शकेल, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांना वाटते.

●

# भिंतीच्या तुंबड्या

## सुधाकर राजे

### ● 'नॉन्व्हेज' राजकारण

कलकत्त्याहून निघणाऱ्या एका इंग्रजी साप्ताहिकात एका विद्वान् गृहस्थाने असे प्रतिपादन केले आहे की, "भारताचे राजकीय धोरण देशात अन् परदेशात बरेचसे निष्फळ ठरते याचे अर्धे खापर तरी एकाच गोष्टीवर फोडावे लागेल, आणि ती म्हणजे आपल्याकडची बहुतेक मंडळी शाकाहारी आहेत. " लाखाची गोष्ट ! मेंड्यांची पुचाट भाजी खाऊन पुचाट राजकारण करणाऱ्या या मंडळींनी निदान देशाच्या कल्याणासाठी तरी दर रविवारी मटन आणि मधून मधून 'मुर्ग मसालम्' खाल्ला पाहिजे, असे माझेही त्यांना आग्रहाचे सांगणे आहे. अहो, 'ब्रह्मांडा' ची विशाल कल्पना तरी आपल्या प्राचीन ऋषि-मुनींना कशी सुचली ? उत्तर एकच–ते रोज अंड्याचे ऑम्लेट खात असले पाहिजेत.

मात्र आपल्या हल्लीच्या सत्ताधिकारी मंडळींनी कुठल्या धोरणाच्या यशाच्या अंमल-बजावणीसाठी काय 'नॉन्व्हेज' खाल्ले पाहिजे हे त्यांना समजावण्यासाठी एखादा 'राजकीय आहारशास्त्रज्ञ' नेमावा लागेल. आपल्या परदेशविषयक धोरणाचे मुख्य सूत्र काय ? शांती. आणि शांतीचे प्रतीक काय ? कबूतर. अर्थात् परदेश-मंत्र्यांनी कबूतर खाल्ल्याशिवाय शांतिपूर्ण धोरणाचा पुरस्कार करणे त्यांना अशक्य आहे, हे ओघानेच आले ! आता देशातल्या जनतेबद्दल बोलायचे झाले तर गृह-मंत्र्यांनी कुठल्या लोकांसाठी बोकडाचे मटन अन् कुठल्या लोकांसाठी डुकराचे मटन खाल्ले पाहिजे, हे त्यांचे त्यांनीच ठरवावे. पण, मटन कुठलेही असले तरी कम्यु-निस्टांचा बंदोबस्त खिमा खाल्ल्याखेरीज होणार नाही, हे उघड आहे.

कोंबडीचे कालवण, तळलेले सरंगे अन् भाजलेले बोंबील असल्या खमंग गोष्टींना राजकारणात स्थान आहे की नाही ? मला वाटते लोकसभेतल्या रटाळ चर्चेला चव आणण्यासाठी त्यांचा निश्चित उपयोग होऊ शकेल. त्यातल्या त्यात प्रति-पक्षाला खरपूस टीकेत होरपळून काढायचे असेल तर रोस्ट चिकन सारखा अन्य उपाय नाही. शेवटी जहाल राजकारणासाठी एक जहाल उपाय सांगू ? –प्रधानमंत्री नरमांसभक्षक पाहिजे. चाऊ अन् माओची च्यावम्याव चटणी केली की, चीनचा प्रश्न एका बैठकीत नव्हे, एका घासात सुटेल.

● **बायकोचे बिल**

बायकोची किमत रुपये–आणे–पैंत ठरविण्याच्या उपद्व्यापला अर्थकारण म्हणायचे, की अनर्थकरण म्हणायचे हे सांगणे कठीण आहे ! पण, असा एक धाडसी प्रयत्न इंग्लंडातल्या काही अर्थशास्त्रज्ञांनी नुकताच केला आहे. दिवसातून तीन तास साफसफाई, तीन तास स्वयंपाक आणि एक तास कपडे धुणे, या कामांचा सध्याच्या दरांनी हिशेब लावला तर इंग्लिश बायको दर महिन्याला १४०० रुपयांचे काम करते व फ्रेंच बायको ११०० रुपयांचे काम करते, असे त्यांना आढळून आले आहे. हे आकडे पाहिल्यावर कुठल्याही चाणाक्ष पुरुषाच्या लक्षात पहिली गोष्ट येईल, ती म्हणजे मोलकरीण ठेवण्यापेक्षा लग्न करणे अधिक किफायतशीर आहे.

आता भारतात आपल्या सौ. चा असा हिशेब लावणारा पुरुषोत्तम आहे काय ? तो असलाच तर त्याला मात्र स्वयंपाक-पाणी, केरवारा, धुणी-भांडी इत्यादी प्रत्यक्ष कामगिरीच्या जोडीला काही अप्रत्यक्ष, पण महत्त्वाच्या कामगिरीचाही जमाखर्च मांडावा लागेल. उदाहरणार्थ, सौ. पुरुषोत्तम यांनी महिनाभर केलेल्या संसाराचे बिल पेश केले तर त्यात खालील गोष्टींचा अंतर्भाव होण्याची दाट शक्यता आहे.

१. काल रात्री बंड्याने गणित विचारले ते तुम्हांला आले नाही. तेव्हा " आता त्यांना त्रास देऊ नकोस पाहू " असे म्हणून तुमची अब्रू वाचवली. चार्ज ५० पैसे. (चार्ज माफक, कारण अब्रू माफक !)


२. शेजारच्या रमाबाईंनी आपला नवरा लेखक आहे, अशी फुशारकी मारली तेव्हा मी पण तुम्ही कविता करता, असे ठोकून दिले अन् तुमचे प्रेस्टीज वाढविले. चार्ज ५ रुपये.

३. तुम्ही रमीत नेहमी नेहमी हरता. म्हणून परवा खालच्या मजल्यावरचे शामराव तुम्हांला रमीला बोलवायला आले, तेव्हा तुमचे डोके दुखत आहे असे सांगून त्यांची बोळवण केली आणि तुमचे कमीत कमी १० रुपये वाचविले. चार्ज १० रुपये.

४. त्या दिवशी सौभाग्यवस्तुभांडारवाले म्हणाले, आता ' शिवशंभो ' साड्या जुन्या झाल्यात अन् नवीन ' हरहरमहादेव ' साड्या आल्या आहेत. कित्ती कित्ती छॉन आहेत म्हणे, पण मला मेलं जमलेच नाही जायला अजून. म्हणजे तुमचे पैसे वाचले. चार्ज २५ रुपये. (आता एक तारखेनंतर नक्की जाईन, तेव्हा चार्जच्या जोडीला साडीचे २५ रुपये पण देऊन ठेवा गडे !)

हे असे सगळे संसाराचे गणित पाहिले की, हिंदुस्थानी बायको कुठल्याही इंग्लिश किंवा फ्रेंच बायकोपेक्षा अधिक ' किमती ' आहे याबद्दल तमाम नवऱ्यांची खात्री पटेल.

● ● ●



# प्रा. टेप्लिझ
# आणि
# हिंदी—मराठी चित्रपट

शरद गोखले

प्रा. जे. टेप्लिझ हे पोलंडच्या लोडझ येथील फिल्म अॅकेडमी या संस्थेचे प्राचार्य आहेत. आंतरराष्ट्रीय चित्रपट क्षेत्रामध्ये ते पहिल्या प्रतीचे चित्र-टीकाकार समजले जातात.

श्री. टेप्लिझ यांचा जन्म १९०९ साली झाला. प्रथमपासूनच त्यांना चित्रव्यवसायासंबंधी आकर्षण होते. गेली ३५ वर्षे ते चित्रपटविषयक लिखाण करीत आहेत. १९३५ ते ३७ या काळात त्यांनी इंग्लंड व इटली या देशातील चित्रपट व्यवसायाचा सखोल अभ्यास केला.

दुसऱ्या महायुद्धानंतर पोलंडच्या चित्रव्यवसायाची जी पुनर्रचना करण्यात आली त्यामध्ये श्री. टेप्लिझ यांचा फार मोठा वाटा आहे.

१९४८ नंतर त्यांनी चित्रपटाच्या विविध अंगांचे शिक्षण घेणाऱ्या तरुण पिढीला मार्गदर्शन करण्यास सुरुवात केली. शास्त्रशुद्ध शिक्षण देणाऱ्या फिल्म अॅकॅडमी'चे नेतृत्व आज त्यांच्या हाती आहे. या संस्थेतून आज पोलंडमध्ये प्रथम श्रेणीचे समजले जाणारे ए. मन्क, वायडा, आर. पोलन्सकी हे दिग्दर्शक त्यांचे मार्गदर्शनामुळे पुढे आलेले आहेत.

प्राचार्य टेप्लिझ हे आंतरराष्ट्रीय चित्र-संग्रह संस्थेचे गेली १७ वर्षे अध्यक्ष आहेत. चित्र इतिहासातील त्यांच्या थोर कामगिरीबद्दल १९५७ मध्ये त्यांना डॉक्टरेट देण्यात आली. 'हिस्ट्री ऑफ दी फिल्म आर्ट', 'एनकौन्टर विथ द टेनथ् म्युस,' व 'ए स्टडी ऑफ् फिल्म अॅण्ड टी. व्ही. इन अमेरिका' हे त्यांचे ग्रंथ अत्यंत

अभ्यासपूर्ण आहेत. याखेरीज पोलीश, फ्रेंच व इटालियन भाषेमध्ये त्यांनी वेळोवेळी लिखाण केलेले आहे. युनेस्को या संस्थेसाठी त्यांनी भारतीय चित्रव्यवसायाचे स्वरूप स्पष्ट करणारा लेख लिहिलेला आहे.

असंख्य देशांमधील चित्रपट व्यवसायाचे विविध प्रश्न व चित्रपटांच्या तांत्रिक अंगांचे शास्त्रशुद्ध शिक्षण, हे त्यांचे खास आवडीचे विषय आहेत. सुमारे तीस लहान–मोठ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांना त्यांनी परीक्षक म्हणून काम केले आहे.

भारत–पोलंड सांस्कृतिक देवाण-घेवाण योजनेखाली ते भारतात आले व मुंबई, मद्रास व कलकत्ता या प्रमुख चित्रनिर्मितीकेंद्रांना त्यांनी भेट दिली. मात्र पुणे येथील ' फिल्म इन्स्टिट्यूट ' मध्येच त्यांचे दीर्घ काळ वास्तव्य होते. त्यांच्या या वास्तव्याचा फायदा घेऊन मी ' माणूस ' साठी त्यांची खास मुलाखत घेतली.

मी : भारतीय चित्रपट व्यवसायासंबंधी आपले काय मत आहे ?

प्रा. टेप्लिझ म्हणाले, " या विषयावर निश्चित मत देणे कठीण आहे. मात्र पाश्चात्यांच्या व आमच्या चित्रपटव्यवसायापेक्षा तुमच्या चित्रपट व्यवसायाचे स्वरूप अत्यंत भिन्न आहे. "

मी : हा फरक जरा अधिक स्पष्ट करता का ?

टेप्लिझ : पाश्चात्य राष्ट्रातील प्रेक्षक हा सुसंबद्ध चित्रपट पाहण्यासाठी आलेला असतो, तर मला असे आढळून आले आहे की, भारतीय प्रेक्षक चित्रपटाकडून नृत्य, नाट्य, संगीत, विनोद, गुन्हेगारी, या अनेक गोष्टींची अपेक्षा करीत असतो. त्यामुळे येथील निर्माते या सगळ्याचा समतोल राखताना दिसतात. आमचा प्रेक्षक मात्र अशा चित्रपटांचे स्वागत करणार नाही तुम्ही. खऱ्या अर्थाने ज्याला ' भारतीय सिनेमा ' म्हणता तो आम्हाला माहीतच नाही. कारण विविध महोत्सवातून केवळ श्री. सत्यजित रे यांचीच चित्रे आम्हाला दाखवली जातात. त्यामुळे येथील व्यावसायिक चित्रपट (Commercial cinema) पाहून माझी फार निराशा झाली.

मी : आपण येथे कोणते चित्रपट पाहिलेत ?

टेप्लिझ : माझ्या येथील वास्तव्यात मी रोज सरासरी दोन चित्रपट पहात आहे. आरजु व गुमनाम ही हिंदी चित्रे मी नुकतीच पाहिली.

मी : धंद्याच्या दृष्टीने यशस्वी ठरलेली ही चित्रे आहेत. तुमची या चित्रपटांबद्दल काय प्रतिक्रिया आहे ?

टेप्लिझ : दोन्ही चित्रपटांमध्ये मला आढळलेला प्रमुख दोष म्हणजे कमालीची अवास्तवता. आता ' आरजू ' च एक उदाहरण पहा. त्यातील नायकाचा एक पाय अपघातामध्ये तुटलेला आहे. परंतु ही गोष्ट तो घरातील इतरांपासून दीर्घकाळपर्यंत लपवून ठेवतो. वास्तवतेमध्ये हे कितपत शक्य आहे ?

त्यांच्या प्रश्नावर मी काहीच उत्तर देत नाही हे पाहून ते पुढे म्हणाले, " आता

'गुमनाम' च घ्या. रहस्य व गुन्हेगारी यांत गुंफलेली ही कथा. यामध्ये नृत्ये व गाणी यांना जागाच नाही. परंतु प्रत्यक्षात मात्र नृत्य व गाणी यातच चित्रपटाची मोठी लांबी खर्च करण्यात आलेली आहे. मला आश्चर्य हे वाटते की, भारतीय प्रेक्षक ही आत्यंतिक अवास्तवता सहन तरी कशी करतो ? "

बाजू सावरण्याचे दृष्टीने मी सांगितले की, आमच्या चित्रपटांचा बहुसंख्य प्रेक्षक अडाणी आहे व अत्यंत गरिबालाही परवडू शकेल व आकर्षण वाटेल अशी एवढी एकच करमणूक आमच्याकडे आहे. परंतु माझी मते त्यांना पटली नाहीत.

टेप्लिझ : माझ्या मते ही अवास्तवता आहे, याची तुम्हाला जाणीवच नसते. कारण रामायण महाभारतातील कथातून आढळणारी अवास्तवता मान्य करण्याचे तुम्हाला बाळकडूच मिळालेले असते. म्हणूनच या चित्रपटांना केवळ श्रमजीवी नव्हे तर बुद्धिजीवी वर्गाचाही मोठा आश्रय मिळतो.

टेप्लिझ यांचे हे विश्लेषण मला मानवले नाही.

मी विचारले, " बायबल मध्ये काय कमी अवास्तवता आहे ? तरी त्यावरील अनेक चित्रे तुम्ही उत्कृष्ट म्हणून मान्य करता. उदा. 'टेन कमांडमेंट्स' मध्ये अशा स्वरूपाची अवास्तवता आढळत नाही काय ?"

टेप्लिझ : केवळ विशिष्ट विषयाचे संदर्भातच ही अवास्तवता पाश्चात्य प्रेक्षक मान्य करील. परंतु तुमच्या सामाजिक अथवा गुन्हेगारी चित्रातून आढळणारी अवास्तवता मात्र आमच्या चित्रातून अजिबात आढळणार नाही.

" एकंदरीत या चित्रांबद्दल आपलं फारसं चांगलं मत झालेलं दिसत नाही. " मी.

टेप्लिझ : तसेच काही नाही, दोन्ही चित्रांची तांत्रिक बाजू पुष्कळच समाधानकारक आहे. मात्र केवळ तांत्रिक बाजू प्रथम श्रेणीची ठेवून जर कथामूल्यांकडे दुर्लक्ष झाले तर चित्रपट संपूर्ण यशस्वी ठरणार नाही. तर या दोन्ही बाजूंची कामगिरी उत्कृष्ट असेल तरच चित्रपटाचा दर्जा उंचावेल.

या विषयावरच बोलत बसल्यास उगाचच शब्दजंजाळात अडकून पडू असे वाटल्याने मी विचारले, " आमच्या प्रादेशिक भाषातील चित्रे तुम्ही पाहिलीत का ?"

टप्लिझ : 'साधी माणस', 'मल्हारी मार्तंड', ही तुमची मराठी चित्रे मी पाहिली व हिंदी चित्रांपेक्षा मला ती अधिक वास्तववादी व कलापूर्ण वाटली. आमच्या चित्रपट–विषयक कल्पनांशी थोड्याफार प्रमाणात का होईना, पण या चित्रपटांत आढळणारी विचारधारा जुळते. श्री. सत्यजित रे यांची चित्रे त्यातील जिवंत व्यक्तिरेखा व कमालीची वास्तवता यामुळे आम्हास आवडतात. मी पाहिलेल्या हिंदी चित्रांपैकी श्री. बिमल रॉय यांची चित्रे समाधानकारक वाटतात. श्री. शांताराम यांचा 'दो आंखे बारह हाथ' ही मला परिणामकारक वाटला.

हिंदी चित्रपट समजणे त्यांना अवघड जात असावे असे वाटल्याने मी सहज चौकशी केली, " हिंदी चित्रे तुम्हाला शंभर टक्के कळतात का ? "

टेप्लिझ : "गेली चाळीस वर्षे अनेक भाषातील असंख्य चित्रपट मी पाहिले आहेत. परंतु म्हणण्याजोगी भाषेची अडचण मला जाणवली नाही. एक तर चित्रपट पाहण्यापूर्वी मी कथा-विषय समजावून घेतो. आणि विशिष्ट आडाखे बांधून मी चित्रपट समजावून घेऊ शकतो. शिवाय चित्रपटात भाषेपेक्षा चलच्चित्रांनाच अधिक महत्त्व आहे असे मला वाटते."

**पोलिश चित्रपट**

मी : "तुमच्या देशामध्ये सामान्यत कोणत्या विषयांवरील चित्रपट निघतात ?

टेप्लिझ : दुसऱ्या महायुद्धात आमच्या देशाची जी सर्व बाजूंनी हानी झाली, ती आम्ही अजून विसरू शकलो नाही, त्यामुळे आमच्या चित्रपटांपैकी शेकडा ५५ टक्के चित्रे युद्ध विषयास वाहिलेली असतात. मात्र त्यामध्ये फक्त युद्ध विषयच हाताळले जात नसून युद्धानंतर निर्माण झालेले सामाजिक प्रश्न, युद्धाबाबत मुलांमध्ये आढळणारी उत्सुकता, युद्धाबाबतच्या विविध मानसिक प्रतिक्रिया इ. अनेक उपविषयही चित्रपटांसाठी निवडले जातात.

मी : ज्यावेळेस एखाद्या चित्रपटास तुम्ही उत्तम म्हणता, त्या वेळेस तुम्ही त्यास कोणत्या कसोटया लावता ?

माझ्या प्रश्नावर एकदोन मिनिटे त्यांनी शांतपणे विचार केला व नंतर ते म्हणाले, "सामान्यत: कलावंताची कलेशी असणारी एकनिष्ठता, निर्मितीपद्धत व विषयातील एकसूत्रीपणा, यांच्या कसोटीवर मी चित्रपट घासून पाहतो. त्याचप्रमाणे कोणताही चित्रपट पाहण्यापूर्वी त्या विशिष्ट चित्रपटांकडून तुम्ही ज्या अपेक्षा करता त्या किती प्रमाणात पूर्ण होतात यावरही चित्रपटाचा दर्जा अवलंबून आहे.

मी : टेलिव्हिजन पाश्चात्य राष्ट्रांना काही नवीन नाही. परंतु आमच्याकडे मात्र टी. व्ही. अजून आलेला नाही. पण त्याचे आगमनानंतर तो मारक ठरेल काय ?

टेप्लिझ : नजीकच्या भविष्यकाळात भारतात टी. व्ही. येणे जवळजवळ अशक्य आहे. निदान त्याचे स्वरूप स्पर्धा करण्याइतके व्यापक राहणार नाही. परंतु ज्यावेळी टी. व्ही. चा मोठ्या प्रमाणावर प्रसार होईल, त्यावेळीही त्यापासून चित्रपटास त्रास न होता उलट फायदाच होईल.

मी : फायदा ? आणि तो कसा काय ?

टेप्लिझ : आमच्याकडील टी. व्ही. च्या अनुभवावरून मी त्यास खिलाडू स्पर्धक (Healthy compititor) मानतो. घर बसल्या टी. व्ही. ची करमणूक उपलब्ध झाल्यावर चित्रपटांबाबत प्रेक्षक अधिक विचारी बनेल. घरातून बाहेर पडा, रांगेत उभे राहा, तिकीटे रिझर्व करा व दोन–अडीच तास चित्रपट बघा. या गोष्टी तो पूर्वीइतक्या सहजपणे करणार नाही. म्हणजेच त्याला या गोष्टी करताना जो त्रास होईल, तो सहन करून जाण्याइतका चित्रपटाचा दर्जा चांगला आहे का, यासंबंधी प्रेक्षक अधिकच विचार करू लागतील. आणि प्रेक्षकांच्या मनामध्ये निर्माण होणाऱ्या

चित्रपट दर्जासंबंधीच्या या विचारांकडे निर्मात्यांना व दिग्दर्शकांना दुर्लक्ष करून चालणार नाही. मग दर्जेदार चित्रांच्या मागणीप्रमाणे तसा पुरवठा त्यांना करावा लागेल; शिवाय टी. व्ही. मध्ये इतरही काही दोष आहेत. अत्यंत छोटा पडदा व आजूबाजूचे घरगुती वातावरण यामुळे आपली करमणुक होत आहे अशी भावनाच प्रेक्षकाचे मनात मूळ धरू शकत नाही व चित्रपटांकडे तो पुन्हा आकर्षित होतो. चित्रपट कलावंताबाबत असणारे व्यक्तिगत आकर्षणही टी. व्ही.मुळे कमी होऊ शकत नाही असा आमचा अनुभव आहे.

## अनुबोधपट

मी : "आमच्या अनुबोधपटासंबंधी (Documentaries) तुमची मते काय आहेत ?"

टेप्लिझ : याविषयासंबंधीची माझी मते कदाचित तुम्हाला कटू वाटतील, परंतु अनुबोधपटाबाबत तुमची अवस्था पूर्ण लांबीच्या चित्रपटांपेक्षाही केविलवाणी आहे. मी सुमारे पस्तीस भारतीय अनुबोधपट पाहिले आहेत. परंतु राधाकृष्ण अथवा खजुराहो, यासारखा एखाददुसरा अनुबोधपटच उल्लेखनीय वाटला. या क्षेत्रांत तुम्हाला अजून फारच आघाडी मारली पाहिजे."

चहा झाला होता. माझी वेळही संपत आली होती. परंतु तरी मी त्यांना विचारले, "आमच्या व्यावसायिक चित्रपटांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने तुम्ही काय सूचना करू इच्छिता ?"

श्री. टेप्लिझ : सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रेक्षकांमध्ये सदभिरुची निर्माण करणे ही आहे. निर्मात्यांचे बाबतीत मी असे म्हणेन की, त्यांनी या व्यवसायाकडे केवळ अर्थोत्पादनाचे दृष्टीने पाहू नये.

Film-making is neither a money speening industry nor only a piece of art. It is something beyond that; to me, and to film-makers in our country it is the most powerful media of social education.

(चित्रनिर्मिती म्हणजे पैसे कमावण्याचा कारखाना नव्हे. त्याचप्रमाणे तो फक्त कलेचा एक नमुनाही नव्हे. तर ते याहीपेक्षा अधिक आहे. माझ्या व आमच्या देशातील चित्रनिर्मात्यांच्या मते चित्रपट हे समाजशिक्षणाचे सर्वात प्रभावी साधन आहे.) म्हणूनच प्रत्येक चित्रपटनिर्मात्याचे मनात ही जाणीव असणे, व त्याच्या चित्रपटामध्ये ती कोठे ना कोठे तरी आढळणे अत्यंत जरूर आहे.

● ● ●

[ 'देश – विदेश' पृष्ठ ५ वरून चालू ]

शस्त्रास्त्रे पाकिस्तानने नुकतीच मिळविली आहेत. भारत-पाक युद्धात झालेली हानि भरून काढायची, एवढेच नव्हे तर आपले सर्वांगपूर्ण लष्करी सामर्थ्यही वाढविण्याचा पाकने जोराचा प्रयत्न चालविला आहे. अमेरिका व ब्रिटनने अजून आपली लष्करी मदत पूर्ववत चालू केली नाही तरी नुकतीच एक बातमी अशी आहे, की सौदी अरेबियाच्या मध्यस्थीतून पाकिस्तानला ब्रिटन अमेरिकेतर्फे सुमारे ११३ कोटी रुपयांची युद्धसामग्री लवकरच मिळणार आहे. सौदी अरेबिया ही सामग्री ब्रिटन अमेरिकेपासून पैसे देऊन विकत घेणार असून ती परस्पर पाकिस्तानला विकण्याची दाट शक्यता असल्याचे वर्तमान आहे. सौदी अरेबिया व ब्रिटन-अमेरिका यांचा करार गेल्या डिसेंबर मध्येच झाला असून या युद्धसामग्रीत स्वनातीत जेट विमाने, जमिनीवरून अवकाशात सोडण्याचे अग्निबाण, (मिसाइल्स) रडार यंत्रे आदींचा भरपूर समावेश आहे.

पाकिस्तान जर आपले शस्त्रास्त्र बळ असेच वाढवीत राहिला तर ताश्कंद कराराला अर्थच उरणार नाही. दोन राष्ट्रांमधील सर्व झगडे शांततेच्या मार्गाने बोलणी करून मिटवावयाचे ठरल्यानंतर ही वाढ कशाला ? भारताला चीन आहे तसा तर पाकिस्तानला कुणी शत्रूहि नाही की ज्याच्याविरुद्ध ही शस्त्रास्त्रवाढ असावी. यावरून निष्कर्ष एकच निघतो. पाकिस्तानची ही शस्त्रास्त्रवाढ भारताविरुद्धच असली पाहिजे. वाटाघाटींच्या मार्गांनी प्रश्न सुटले नाही तर शस्त्रबळावर ते सोडविण्याचे आपले जुने खूळ पाकिस्तान अद्याप धरून बसले असले पाहिजे.

## ☐ सेनादल आणि हाजीपीर

आणि अशी जर पाकिस्तानची पावले पडत असतील तर हाजीपीर वगैरे महत्त्वाची ठाणी खाली करण्याचा निर्णय कितपत योग्य होता ? सेनादलाने याला सहजासहजी मान्यता दिली, हे खरे कां ? सेनादलांत यासंबंधी असंतोष असल्याच्या वार्तांचा संरक्षणमंत्र्यांना इन्कार करावा लागला, याचा अर्थच काहीतरी विरोधी सूर सेनावर्तुळात निघत असावेत. भारत पाक संघर्ष संपल्यावर लगेच सेनापती चौधरी यांना दोन वर्षांची मुदतवाढ मिळाल्याची वार्ता प्रसिद्ध झाली होती. आता ते जून महिन्यात निवृत्त होत आहेत असे कळते. हा बदल का करण्यात आला असावा ? सेनादलाच्या हाजीपीरसंबंधीच्या भावना तीव्र असणे स्वाभाविकच आहे. दि 'रिपोर्टर' या सुप्रसिद्ध अमेरिकन नियतकालिकाचे वार्ताहर श्री. एडमंड टेलर यांनी भारत-पाक युद्धानंतर लगेचच काश्मीर आघाडीला भेट दिली होती. त्यांनी लिहिलेल्या लेखाचा अनुवाद दि. १९ डिसेंबर १९६५ च्या 'रविवार

केसरी 'त प्रसिद्ध करण्यात आला होता. या अनुवादात श्री. टेलर लिहितात–

" हाजीपीर खिंडीजवळ भारतीय सैनिकांनी वास्तुशास्त्रातला एक विलक्षण चमत्कार घडविल्याचे मी पाहिले. नऊ हजार फूट उंचीवर त्यांनी रस्ता तयार केला आहे. हा रस्ता पूर्वीच्या युद्धबंदीरेषेच्या किमान आठ नऊ मैल पलीकडे आहे. मी हिंदी अधिकाऱ्यांना विचारलं, " हा रस्ता तुम्ही तयार केलात खरा, पण तो आहे शत्रूच्या हद्दीत ! आणि समजा तुम्हाला तो त्यांच्या हवाली करावा लागला तर तुम्ही काय करणार ? " त्या अधिकाऱ्यान नकारार्थी अशी काही मान हलविली, की त्यातच मी सर्व काही उमगलो. त्याचेही बरोबरच होते. प्रयत्नांची पराकाष्ठा करून बांधलेला तो रस्ता भारताच्या ताब्यात राहिला तरच भारतीय फौजा उरी-पूंच विभागातून येणाऱ्या पाकसैनिकांवर–टोळीवाल्यांवर जरब ठेवू शकतील. त्यांना अटकाव करू शकतील......

एक दिवस जम्मूमधल्या ' कास्मो ' हॉटेलात मी असाच मद्य घेत बसलो होतो. समोरच एक शीख अधिकारी बसला होता. छांबजोरियन विभागातून तो नुकताच रजेवर म्हणून परत आला होता. मी अमेरिकन आहे हे त्यानं ओळखलं आणि माझ्याकरिता मद्याची ऑर्डर दिली. त्याला संभाषण हवं होतं हे मी ताडल. जरा गंमत करावी म्हणून मी विचारलं, " काय, आम्ही भारताला दिलेली पॅटन टँक्स कशी वाटतात तुला ? " त्यानं माझा भाव ओळखला असावा. सफाईदार इंग्रजीत तो उत्तरला, " वा: वा: फारच छान. पण पॅटन टँक्स म्हणजे पाकिस्तानकडून आम्ही हिरावून घेतली तीच ना ? फारच फर्स्ट क्लास आहेत ती ! "

संभाषणाच्या प्रारंभीच बर्फ मोडायचं असतं म्हणतात, ते या लहानशा देवघेवीत मोडलं म्हणताच मी त्याला विचारलं, ' समजा सुरक्षासमितीनं आपल्या प्रस्तावानुसार पाच ऑगस्टपूर्वीच्या जागी परत जाण्याच्या दृष्टीने तुम्हाला जिंकलेला –निदान त्यातला काही भाग सोडून द्यायची गळ घातली तर ? "

तो काहीसा गंभीर झाला. पण लगेच म्हणाला, " ते नाही जमायचं. युनोलासुद्धा ते कठीण जाईल. "


" पण समजा तुझ्या सरकारनंच देशाच्या हिताचा म्हणून तसा काही निर्णय घेतला तर ? "

तो पुन्हा हसला आणि चटकन बोलून गेला, " त्या परिस्थितीत आम्हाला ते सरकारच बदलावं लागेल........."

हा विचार अतिरेकी आहे, तूर्त त्यावर भाष्य नको, पण सेनेच्या मन:स्थितीची काहीशी चाहूल त्यामुळे लागते, म्हणून तो मुद्दाम येथे दिला आहे.

● ● ७

## संगीत खुर्ची....




'शंकर्स वीकली'च्या सौजन्याने

MANOOS (Fortnightly) : 15 Feb. 1966 : 40 Paise : Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



Parkerson/srp/12

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. श्री. ग. माजगावकर